प.पू. स्वामी श्री सवितानंद अमृत महोत्सव

स्मरणिका

॥ सविता अर्घ्य ॥

अनुक्रमणिका

भाग १

स दा सर्वदा योग तुझा घडावा

भाग २

वि स्मरणाचे स्मरण

भाग ३

ता रिणी दुर्गसंसारसागरस्य

भाग ४

अ र्घ्य

भाग १

सदा सर्वदा योग तुझा घडावा

१. शुभारंभ ०१
२. उत्तम मार्गदर्शक ०६
३. स्वामीजींचे स्वामीपण १४
४. कुशल सोनार १६
५. स्पष्ट वक्ता २२
६. संकट मोचक स्वामीजी २५
७. नाठाळाचे माथी हाणू काठी ३१
८. श्रोत्यांची कुवत ३८
९. का गुदमरसी आत कुढूनी? ४२
१०. वेगळे व्यक्तित्व ४६
११. वेगळा दृष्टिकोन ४९

शुभारंभ

गुरुर्ब्रह्मा गुरूर्विष्णु गुरूर्देवो महेश्वरा: ।
गुरू:साक्षात परब्रह्म तस्मै श्रीगुरूवे नम: ।।

साधक जन हो, गुरूमाऊलीचे स्मरण करून आणि माँ भगवतीच्या चरणांचे स्मरण करून ही स्मरणिका लिहायला सुरूवात करते. आश्रमातल्या वास्तव्यामुळे गुरुमाउलीस अगदी जवळून बघण्याचे सद्‌भाग्य मला लाभले. ही माझी पात्रता नाही की मी त्यांच्या गुणांचा लेखाजोखा शब्दांच्या माध्यमाने कागदावर उतरवू शकेन. त्यांना पूर्णपणे समजू शकणे माझ्या सामान्य बुद्धीच्या आवाक्याच्या बाहेरची गोष्ट आहे. ते ''अगणित गुणगणभुषित'' आहेत असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. प्रत्येक वेळी त्यांच्या गुणांचा वेगळाच पैलू डोळ्यासमोर येतो.

मुमुक्षु साधकांना, ज्यांना अध्यात्माविषयी खरोखर ओढ आहे अशा साधकांना फोनवरून केलेला उपदेश किंवा आध्यात्मिक रहस्य मी वेळोवेळी ऐकले आहे. त्या सत्संगातून पलिकडील साधकाला पडलेल्या प्रश्नांची नेमकी उत्तरे मिळतात आणि हा उपदेश ऐकून अडखळलेला साधक पुन्हा वाटचाल करायला लागतो आणि ही धन्यता स्वामीजींच्या मुखावर स्पष्टपणे दिसते आणि गुरूमाऊली मला म्हणते, **''सरू, ईश्वरप्राप्तीसाठी धडपडणाऱ्या जिवाला योग्य रस्ता दाखवणे हेच आमच्या जीवनाचे ध्येय आहे, संन्यास घेण्याचे सार्थक आहे.''**

समोर बसलेल्या व्यक्तीच्या कुवतीनुसार उपदेश करण्याची स्वामीजींच्या खुबीचे वर्णन कुठल्या शब्दात करायचे? उच्चशिक्षित असो की अशिक्षित, त्यांचा व्यवसाय, शिक्षण, नोकरी विचारण्याचा स्वामीजींचा हेतू हाच असतो की सत्संग समजुन पचवु शकेल, समोरच्या व्यक्तीला त्याच्याच फुटपट्टीने मोजायचे आणि मग तास दोन तास खिळून बसणारी माणसे मी पाहिली आहेत.

– गुरूमाऊलीची सरू

१. निस्पृहता

आश्रमाची एक साधिका नेहमीच म्हणते, ''ज्ञानेश्वरी वाचताना जेव्हा जेव्हा ज्ञानीपुरूषाची लक्षणे, असंग, स्थितप्रज्ञ वगैरे संबंधी ओव्या वाचतांना मला प्रकर्षाने स्वामीजींची आठवण येते. त्यांची सोज्वळ मुर्ती डोळ्यासमोर येते. वाटते या ओव्या स्वामीजींना यथार्थपणे लागू पडतात'' तर आश्रमाचा दुसरे साधक योगेशला त्याचे वडिल डॉ. मुकुंद बार्शीकर एकदा म्हणाले, ''योगेश तुझे हे स्वामीजी कलियुगाला लायक नाहीत.'' हातच्या कंकणाला आरसा कशाला? आता पुढील घटना वाचुन स्वामीजींचे अंगभूत गुण अधिक स्पष्ट होतील.

एकदा आश्विन नवरात्रात आश्रमाशी श्रद्धा प्रेमाने जुळलेले मुंबई सांताक्रुझचे निवासी श्री. श्रीपाद प्रभुदेसाई स्वामीजींना भेटायला आले होते. त्यांनी स्वामीजींसमोर नम्र निवेदन केले की,'' स्वामीजी मला माझ्या मामांकडून वारसाईत सहा लाख रूपये मिळाले आहेत. या पैशांचा सदुपयोग झाला पाहिजे. आम्ही निर्णय घेतला की हे पैसे आपल्या चरणी अर्पण करू या.'' हे ऐकून स्वामीजींच्या मुखकमलावरील भाव यत्किंचीतही बदलले नाहीत. क्षणाचाही विलंब न करता अगदी शांत आणि तटस्थपणे स्वामीजी त्यांना म्हणाले, ''आश्रमावर आता कोणतेही निर्माण कार्य करायचे नाही की कोणताच असा मोठा खर्चही नाही, ज्यात आम्ही ही रक्कम वापरू शकू आणि समजा जरी आश्रमावर काही काम असते तर एवढी रक्कम आम्ही कोणा एकाकडून कधीही स्विकारली नाही. राहिली गोष्ट रोजच्या खर्चाची. ती तरतूद तर माँ भगवती आपोआप करते. आतापर्यंत तिने आम्हाला कुठल्याही प्रकारची ददात भासू दिली नाही''.

स्वामीजींनी आम्हाला या पैशांची आवश्यकता नाही असे म्हटल्यावर प्रभुदेसाई आग्रह करू लागले. त्यावर स्वामीजी म्हणाले, ''जर तुम्हाला हे पैसे नको असतील तर आपण या पैशांचा सदुपयोग करुया.'' स्वामीजींनी प्रभुदेसाईंना सुचविले की, आपण वेगवेगळ्या सहा संस्थांना, ज्या वंचित लोकांना आश्रय देणाऱ्या असतील, जिथे या पैशांचे चीज होईल तिथे हे पैसे दान करूया आणि ते पण तुमच्या हस्ते आम्ही फक्त हजर असू.'' केवढा हा मोठेपणा. प्रभुदेसाईंनी ते मान्य केले आणि स्वामीजींच्या मार्गदर्शनानुसार विविध क्षेत्रात काम करणाऱ्या वेगवेगळ्या सहा संस्थांना प्रत्येकी एक-एक लाख रूपये दिले. या संस्थेपैकी एक संस्था नगर-शिर्डी रोडवरील 'माऊली' ही संस्था, त्या संस्थेत स्वामीजी प्रभुदेसाईंना घेऊन गेले. नगरचे नामांकित वैद्य ज्यांना स्वामीजींबद्दल खूप प्रेम, आदर, श्रद्धा आहे ते श्री. लक्ष्मीकांत कोर्टीकर व सौ. वर्षा कोर्टीकर पण सोबत होते. 'माऊली' संस्थेतून परतल्यावर स्वामीजी नगरला याच दंपतीकडे गेले. त्यांनी स्वामीजींचे पाद्यपूजन केले आणि दक्षिणा म्हणून हातावर २५ हजाराचा चेक ठेवला. स्वामीजींनी प्रश्नार्थक चेहऱ्याने दोघांकडे पाहिले. त्यावर ते दोघे प्रसन्नतेने हसत म्हणाले,'' स्वामीजी आज आमच्या लग्नाचा पंचविसावा वाढदिवस आहे, म्हणून हा पंचवीस हजाराचा चेक.'' अशाप्रसंगी स्वामीजींची विनोदबुद्धी व्यक्त होते. स्वामीजी हसत म्हणाले, ''तुमच्या लग्नाच्या पन्नासाव्या वाढदिवसाला पण हजर राहण्याचा आम्हाला योग येवो.'' सर्व जण खूप हसले. मग शांतपणे स्वामीजी म्हणाले, आता लागलीच आम्हाला आश्रमासाठी या पैशांची गरज नाही. एक गोष्ट येथे जाणीवपूर्वक सांगावीशी वाटते की, गुरूमाऊलीने उद्या कामास येतील या भावनेने कधी पैशाची तरतुद केली नाही. त्यांनी संग्रह कधी केला नाही मग ते पैसे असो की वस्तू. ही त्यांची निस्पृहता मी अनेकदा स्वत: अनुभवली आहे. स्वामीजी त्यांना म्हणाले, ''तुमच्या या पंचविस हजारात आम्ही पांच हजार टाकतो

सोलापूरहून तेथल्या प्रसिद्ध चादरी शंभर नग मागवू आणि आपण आता ज्या 'माऊली' संस्थेत गेलो होतो तेथे आश्रयाला ऐंशी नव्वदच्या आसपास भगिनी आहेत त्यांना हिवाळ्यात कामास येतील. ते दोघेही आनंदाने तयार झाले. ***ऐसी कळवळ्यांची जाती। करी लाभाविण प्रिती ।।***

स्वामीजींची पुस्तके वाचुन पुण्यातील एक अतिशय नामांकित व्यक्ती खूप प्रभावीत झाली. त्यांनी स्वामीजींना प्रेमपूर्वक, आग्रहाचे घरी येण्यास निमंत्रण दिले. दुसऱ्या दिवशी स्वामीजी रमेश भागवत यांना घेऊन त्यांच्या घरी गेले. अल्पोपहार आणि चहा झाल्यावर ते सज्जन हात जोडून स्वामीजींना म्हणाले, स्वामीजी छोटीशी सेवा कृपया स्वीकार करा आणि त्यांनी आपल्या धर्मपत्नीस हाक मारली. त्यांची पत्नी एका सुशोभित तबकात काही रक्कम घेऊन स्वामीजींसमोर आली. स्वामीजी म्हणाले आम्ही स्वत:हून घेतलेला नियम आहे की पूर्वपरिचय नसतांना प्रथम भेटीत आम्ही कोणाची कांही सेवा स्विकारत नाही मग ती रक्कम छोटी असो की मोठी. आज तुम्ही तुमच्या गृहस्थधर्माचे पालन करीत आहात. आपण आमंत्रित करून अथवा स्वत:हून आपल्या घरी आलेले संन्यासी, यती, ब्राह्मण आणि लहान मुले यांना रिकाम्या हाताने पाठवायचे नसते आणि त्या सनातन संस्कृतीच्या मर्यादेचे भान ठेवण्यासाठी आमचा नियम थोडा बाजूला ठेवून ही भेट स्विकारतो. नंतर ते सज्जन नम्रतेने म्हणाले, ''स्वामीजी जास्त नाही पण या पाच लाख रुपयांचा स्विकार करावा''. स्वामीजी म्हणाले, ''अहो एवढ्या पैशांचे आम्ही काय करणार? आम्ही अकिंचन फकीर आहोत. आमचा स्वत:चा असा काही खर्चही नाही. त्यामुळे या पैशांची आम्हाला काय आवश्यकता?'' ते सज्जन विनयाने म्हणाले, ''स्वामीजी तुम्हाला योग्य वाटेल तेथे तुम्ही हे पैसे दान द्या अथवा कोणत्याही चांगल्या कार्यात वापरा. पण कृपया स्विकार करा.'' स्वामीजींनी त्यांच्याकडे पाहात विचारले, ''तर मग आत्ताच आम्ही गरजू व्यक्तींपर्यंत हे पैसे पोहोचवतो तुमची कांही हरकत नाही ना?'' ते म्हणाले, ''तुम्हाला योग्य वाटेल ते करा स्वामीजी.''

स्वामीजींनी लागलीच सरदेसाई दंपतीला फोन केला. फोन त्यांच्या पत्नी सौ. निलिमाताईंनी घेतला. स्वामीजी निलीमाताईंना म्हणाले, ''बेटी तुझा प्रश्न सुटला, आज गजाननला रमेश भागवतांच्या ऑफिसमध्ये पाठवून दे आणि त्यांच्याकडून एक लाख रूपये घेऊन जा.'' निलिमाच्या भावाला खूप मोठा अपघात झाला होता. कवटीच्या हाडाचा तळहाता एवढा तूकडा उडून रस्त्याच्या बाजूला पडला होता. एवढा भयंकर अपघात झाला होता. त्याला पुण्यातील एका सेवाभावी ट्रस्टच्या दवाखान्यात दाखल केले होते. खूप मोठे ऑपरेशन करावे लागणार होते. सरदेसाईंच्या ओळखीचे एक डॉक्टर होते. त्यांच्या प्रयत्नाने बिलात बरीच सवलत मिळाली तरी एक लाख रू. भरावे लागणार होते. दोघे पती-पत्नी त्याच चिंतेत होते. पैशांची जमवाजमव कशी करायची? कारण त्यांची स्वत:ची आर्थिक स्थिती नव्हती की ते एवढी रक्कम भरू शकतील कांही नातेवाईकांना फोन पण केले होते. ही सगळी चर्चा आदल्या दिवशी स्वामीजींसमोर झाली होती. पण कुठल्या नातेवाईकांकडून हवा तसा प्रतिसाद मिळाला नव्हता. स्वामीजी निलिमाताईंना म्हणाले, बेटी तू काल रात्री चिंता करीत होतीस आणि आज सकाळी भगवतीने तुझी चिंता दूर केली. निलिमाताईंना तर कानावर विश्वासच बसेना आपण स्वप्नात तर नाही ना असे त्यांना झाले. स्वामीजींनी फोन ठेवला आणि रमेश भागवत यांना म्हणाले, ''बाकीच्या चार लाखांची अशी अशी व्यवस्था करायची आहे.'' रमेश भागवत आणि ते सज्जन स्वामीजींकडे विस्मयाने बघतच राहिले. पांच लाखांपैकी पांच रूपये पण स्वत: जवळ ठेऊन न घेणारा अवलिया आत्ताच्या युगात आहे आणि तेही अवघ्या पांच मिनिटांत मणभर द्यायला कणभरही विचार न करणारे स्वामीजी अवलिया नाहीत तर काय? स्वामीजींचे गुरूदेव (स्वामी शक्तिबालक परमहंस) त्यांना म्हणायचे, 'सवितानंद तुझे साधु नही तुझे संत होना है।' दुसऱ्याचे कष्ट बघून, विषादात सापडलेला माणुस बघून ज्यांचे हृदय कळवळते, ते संतहृदय. आश्रमातल्या ताई मला म्हणायच्या, ''अग सरू ते पक्के फकिर आहेत. समोरच्या

व्यक्तीने जर मागितले तर ते नेसते वस्त्र पण सोडून त्याला द्यायला कमी करणार नाहीत.''

स्वामीजी औरंगाबादला प्रवचनाला गेले असता तेथे एक सज्जन ज्यांनी पूर्वी स्वामीजींचा त्यांच्या पुस्तकांमुळे सत्कार आयोजित केला होता ते निलंगेकर स्वामीजींना म्हणाले, ''या महिन्यात माझ्या एका फिक्स डिपॉझिटची मुदत पूर्ण होत आहे. त्याचे साडेतीन लाख रू. येतील. ते तुम्हाला द्यायची इच्छा आहे. कृपया स्विकार करा. वरीलप्रमाणेच स्वामीजींनी ती रक्कम घेण्यास स्पष्ट नकार दिला. आम्हाला गरज नसतांना एवढ्या पैशांचे करणार काय? त्यावर ते गृहस्थ म्हणाले, स्वामीजी तुम्ही असे करा ही रक्कम तुमच्या नांवाने बँकत फिक्स करा आणि त्याच्या व्याजातून आश्रमाचा भोजनादी खर्च चालवा. स्वामीजी त्यांच्याकडे वेधक नजरेने पाहात म्हणाले, श्रीमानजी आज आम्ही सत्तरीत पोहचलो. ज्या भगवतीने आम्हाला (आणि आश्रमात वेळप्रसंगी येणाऱ्या साधकांना) गेली ७० वर्षे खाऊ घातले. तिच्यावर आम्ही अविश्वास करू? ती भगवती आम्हाला काय म्हणेल? तिचे वचन आहे. **त्वामाश्रितां न विपन्नराणाम त्वामाश्रिता ह्याश्रयतां प्रयन्ति।** ... नाही हे आम्हाला शक्य नाही. त्यावर ते गृहस्थ म्हणाले, ठिक आहे स्वामीजी, पण तुम्ही या रकमेचा स्विकार करून तिचा योग्य तसा विनियोग करावा. माझी एवढीच हार्दिक इच्छा आहे की, माझ्या आईच्या नांवाने कोठेतरी कोणालातरी भोजन मिळावे. स्वामीजी म्हणाले हा कांही मोठा प्रश्न नाही. आमच्या आश्रमाशी जुळलेले काही सज्जन डोळ्यांचा एक मोठा दवाखाना चालवतात. त्यात गरिबांची ऑपरेशन विनामुल्य होतात. शिवाय त्यांची एक दिवस मुक्कामाची व्यवस्था, भोजनादी सर्व सुविधेसह करतात. आम्ही त्या दवाखान्यासाठी ही रक्कम फिक्स करतो. ही गोष्ट त्यांनी स्विकारली. स्वामीजी आश्रमावर परतले. त्याचवेळी मुंबईहून आणखी एका साधकाने एक लाख रूपये पाठविले. स्वामीजी त्यांच्याशी पण बोलले आणि नंतर त्या रकमेत आश्रमातून पन्नास हजार ची भर घालुन पांच लाख रू. पूर्ण करून भोजनादी खर्चासाठी त्या दवाखान्यासाठी बँकेत फिक्स केले. आहेत किनई अगदी जगावेगळे स्वामीजी?

स्वामीजी आश्रमावर असतांना एकदा पुण्याहून एका इंजिनिअरींग महाविद्यालयाच्या प्राध्यापिकेचा फोन आला. त्या म्हणाल्या, स्वामीजी मी तुमची सगळी पुस्तके वाचली म्हणून तुमच्या मार्गदर्शनासाठी फोन केला. मला पुण्यातील एका व्यक्तीकडून (त्यांनी नांव पण सांगितले) दिक्षा घ्यायची आहे आणि त्यासाठी त्यांनी दहा हजार रूपये मागितले आहेत. दिक्षा घेण्यासाठी एवढी रक्कम खरचं द्यावी लागते का? मी त्यांच्याकडून दिक्षा घेऊ का? तिने शंका व्यक्त केली. स्वामीजी त्यावर उत्तरले, त्यांच्याकडून किंवा अजुन कोणाकडून दिक्षा घ्यायची की नाही हे तुमचे तुम्हाला ठरवायचे आहे. तो तुमचा प्रश्न आहे. आम्हाला आमच्या गुरूमहाराजांनी एवढेच सांगितले आहे की, दिक्षा घेण्यासाठी फक्त दोनच गोष्टी लागतात. घेणाऱ्याच्या मनांत समोरच्या (ज्यांच्याकडून दिक्षा घ्यायची आहे) व्यक्तीबद्दल पूर्ण श्रद्धा की यांच्याकडून माझे कल्याण होईल आणि देणाऱ्यांच्या मनात समोरच्या (घेणाऱ्या) व्यक्तीबद्दल करूणा की, या जीवाचे कल्याण होवो. श्रद्धा आणि करूणा या दोनच गोष्टींची दिक्षेसाठी आवश्यकता असते. येथे पैशांचा संबंध येतोच कोठे? त्यावर त्या बाई उत्तरल्या ठिक आहे. स्वामीजी मी यावर शांतपणाने विचार करीन. बरे तुम्ही अलिकडच्या काळात पुण्यास कधी येणार आहात का? स्वामीजी उत्तरले हो, पुढच्याच महिन्यात. त्याविषयी अजुन कांही बोलणे झाले. त्या प्राध्यापिका स्वामीजींच्या पुणे मुक्कामात स्वामीजींना भेटायला आल्या होत्या. स्वामीजी पुण्याहून परतल्यावर एके दिवशी त्या बाईंचा पुन्हा फोन आला आणि त्या म्हणाल्या, स्वामीजी मला हरियाणा सरकारकडून एक प्रस्ताव आला आहे की, तेथील इंजिनिअरींग डिप्लोमाच्या कोर्ससाठी अमुक विषयाच्या अभ्यासक्रमाचे पुस्तक लिहून द्यावे. मी तो प्रस्ताव स्विकारला आहे. त्यासाठी मला सरकारकडून तीन ते चार लाख रू. मानधन मिळणार आहे आणि माझी इच्छा आहे की ती रक्कम तुमच्या चरणी अर्पण करावी. स्वामीजी तुम्ही कोठेही योग्य

ठिकाणी वापरा. स्वामीजी म्हणाले, ठिक आहे ताई आम्ही रक्कम स्विकारली असे समजा पण येथे पाठवू नका. तुमच्या कॉलेजमध्ये शिकणारे गरीब आणि गरजू विद्यार्थी आहेत त्यांच्यासाठी खर्च करा, ते पदवीधर झाले तर आम्ही समजू आम्हालाच ती रक्कम मिळाली. त्या बाई अगदी आश्चर्यात पडल्या पण त्यांनी स्वामीजींना तसे वचन मात्र दिले.

एके दिवशी मुंबईहून (नवी मुंबई) आश्रमाच्या दिक्षित साधकाचा श्री. भास्कर नाईक यांचा स्वामीजींना फोन आला. त्यांच्या आवाजातून आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत होता. म्हणाले, ''स्वामीजी, आम्ही केस जिंकली. कोर्टाने आदेश दिला की आम्हा लोकांना कामावर घ्यायचे आणि आतापर्यंतचा पगार पण द्यायचा. सुमारे २० लाख रूपये तरी मिळतील. याच्या मागची पार्श्वभूमी अशी की, भास्कर नाईक मुंबईच्या एका कंपनीत नोकरीस होते. खाजगी कंपनी. मालकाने पूर्वसूचना न देता कंपनी अचानक बंद केली. सकाळी कामगार कामावर गेले, पाहतात तर कंपनीच्या गेटला कुलूप आणि सिक्युरिटीच्या नावाखाली काही गुंड सुरक्षा करण्यासाठी बाहेर उभे. तेव्हा कामगारांना कळले आजपासून कंपनी बंद. सगळे रस्त्यावर आले. पुढचे भविष्य काय? आभाळच फाटले. सगळ्यांच्या डोळ्यापुढे अंधेरी आली. सगळी हकीकत पण हळूहळू बाहेर आली आणि शेवटी कामगार युनियनने कोर्टात केस दाखल केली. त्यात युनियनचा विजय झाला. कारखाना बंद करणे बेकायदेशीर जाहीर केले. कारखाना पुन्हा सुरू करण्याचा व सर्व कामगारांना परत कामावर घेण्याचा आदेश दिला आणि तीन वर्षापासून कारखाना बंद होता त्या काळातील पूर्ण पगार पण द्यायचा हुकूम दिला. स्वामीजींना हे सगळे माहित होतेच. केसचा निकाल कामगारांकडून लागला हे ऐकून स्वामीजींनी आनंद व्यक्त केला आणि स्वामीजी पुढे म्हणाले, हे बघ भास्कर या वीस लाखातून कांही रक्कम आम्हाला/आश्रमाला देण्याचा तुझ्या डोक्यात जो विचार आहे तो काढून टाक. आम्हाला या वीस लाखांपैकी वीस रूपये पण नको. तू आता असे कर की या तीन वर्षाच्या खडतर काळात घर चालविण्यासाठी तुझ्या धर्मपत्नीने खूप मेहनत केली आहे. सुरूवात २/४ लोकांना घरपोच टिफीन पासून सुरुवात करून ते कार्यक्षेत्र वाढवले. रोजच्या ४०/५० लोकांचा स्वयंपाक करून टिफीन भरून पाठवित राहिली. तिच्या त्या मेहनतीमुळे तीन वर्ष घर चालले. तू आता तिच्या या श्रमाची, कठीण परिस्थितीत न डगमगता घरासाठी जे कष्ट उपसले त्या कष्टाची कदर करून तिच्या हौसेने तिला दिड-दोन लाखाचे दागिने करून दे आणि बाकी रक्कम सध्या बँकेत फिक्स कर. लक्षात ठेव हातातली रोकड रक्कम ओंजळीतल्या पाण्यासारखी असते. हळुहळू कधी संपेल कळणार सुध्दा नाही. तसे होऊ नये. सध्या तुमचे घर लहान आहे. मुलगा मोठा होत आहे. उद्या त्याचे लग्न झाल्यावर मोठा प्रश्न उभा राहील. त्यासाठी तू आत्तापासून एखादा चांगला फ्लॅट शोधायला सुरूवात कर आणि उरलेली रक्कम त्यात गुंतव वगैरे वगैरे. भास्कर नाईक दिग्मुढ होऊन ऐकता राहिला, माझ्यासारख्या एक सामान्य व्यक्तीबद्दल पण स्वामीजींना किती काळजी आहे. माझी आणि माझ्या कुटुंबाची पण, त्यांच्या जागी दुसरा कुणी असता तर मी सांगायच्या आधीच स्वत:हून म्हणाले असते एवढी रक्कम मिळाली ना ! छान! आत्ता आम्हाला एवढी रक्कम पाठवून दे. हे आमचे स्वामीजी तर वेगळेच, वीस रूपये पण पाठवू नको म्हणाले. उलट माझ्या भविष्याचा विचार करून खूपच चांगला सल्ला दिला. मला आनंद आणि सार्थ अभिमान वाटतो की असे निस्पृह स्वामीजी माझे गुरू आहेत.

गुरूमाऊलीच्या निस्पृहतेचा परिचय देणारा अजून एक प्रसंग, स्वामीजी गृहस्थाश्रमात असतांना त्यांच्या जन्मगांवी त्यांनी घर विकत घेतले होते, आईवडिलांसाठी. आईवडिलांच्या स्वर्गवासानंतर त्या घराची आता काही आवश्यकता उरली नाही. स्वामीजी तर संन्यासी, येथे गांवासाठी काही चांगले काम करणाऱ्या तरूण मुलांच्या मंडळाला बोलवून स्वामीजी त्यांना म्हणाले, हे घर आम्ही तुमच्या मंडळाला दिले. याची विक्री करून त्यातून मिळणारे पैसे गांवातल्या चांगल्या कार्यासाठी वापरा त्या घराची किंमत आली साडेचार लाख

रूपये. असंग स्वामीजींना त्याने काय फरक पडतो ते विरक्त झाले ते झाले त्यांच्यासमोर चार लाख ठेवले काय आणि चार करोड ठेवले काय काही फरक पडत नाही.

१९८१ ला संन्यास दिक्षा झाल्यापासून स्वामीजींनी महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश इतरही अनेक ठिकाणी शेकडो प्रवचने केली असतील. पण त्यांचे ब्रीद एकच, आम्ही संन्यासी आहोत ज्ञानदान हे आमचे कर्तव्यच आहे आणि अर्थाजन संन्याशाला तर निषिद्धच आहे म्हणून स्वामीजींनी प्रवचनाचे कधीच पैसे घेत नाहीत. अलिकडच्या पंधरा वर्षाच्या काळात स्वामीजींची पंधरा पुस्तके प्रकाशित झाली. पुन्हा वरील ब्रीद एकाही पुस्तकाचा एक पैसाही मानधन म्हणून घेतला नाही. इतकेच नव्हे पुस्तकाच्या प्रती पण मोफत घेतल्या नाहीत. आपलीच पुस्तके आपण विकत घेऊन काही लोकांना भेट दिली. पुस्तक प्रकाशन संस्थेकडून फुकट घेणे हे पण अप्रत्यक्ष रित्या मानधनच म्हणून स्वामीजींनी तसेही केले नाही. स्वामीजींच्या पुस्तकांमुळे स्वामीजींचा अनेक ठिकाणी सत्कार झाला. तेथे त्यांना चांगली रक्कम मानधन म्हणून दिली गेली. स्वामीजींनी कोठेही एक पैसा स्विकारला नाही. ती रक्कम तेथल्याच संस्थेला परत केली. या गोष्टी पण महाराष्ट्रातल्या वर्तमानपत्रात अनेकदा छापून आल्या. त्या वाचून महाराष्ट्राचे एक ज्येष्ठ आणि श्रेष्ठ प्रवचनकार दाजी पणशीकर एकदा एकाला फोनवर म्हणाले, अशी निस्पृह, त्यागी व्यक्ती मी माझ्या उभ्या आयुष्यात अजून दुसरी पाहिली नाही.

२. उत्तम मार्गदर्शक

पायी प्रवासात कांही वेळा स्वामीजी मुख्य रोडने न जाता पाय वाटेने, कच्च्या रस्त्याने, शेतातून, रानावनातून भटकायचे. अशीच एक संध्याकाळ त्यांना शिरपूर-शहादा भागातील एका खेड्यात घेऊन आली. स्वामीजी गांवाबाहेर शाळेच्या ओट्यावरच बसले. कोणीतरी गांवकऱ्याने पाहिले. विचारपूस करून गांवातील विठ्ठल मंदिरात नेऊन स्वामीजींची सगळी सोय लावून दिली. स्वामीजी मराठी बोलतात हे ऐकून त्याला खूप आनंद झाला. कारण लोकांची बहुदा समज अशी की साधुसंन्यासी म्हटले की ते हिंदीतूनच बोलणार. त्याने स्वामीजींना विचारले, महाराज रात्री आम्ही थोडे लोक येऊ? सत्संग प्रवचन कराल? स्वामीजी म्हणाले ''त्यात काय विचारायचे ते तर आमचे कामच आहे. ''रात्री बरीच मंडळी मंदीरात जमली. त्यांना समजेल अशा भाषेत स्वामीजींनी सत्संग केला आणि विचारले, कोणाला कांही शंका असेल तर विचारा. 'मला विचारायचे आहे'. एका मध्यम वयाच्या गृहस्थाने विचारले, ''महाराज, मी ध्यान करतो त्यांत मला असे अनुभव येतात आणि पुस्तकांत वाचावे तर वेगळेच कांही असते. कळत नाही की माझे अनुभव खरे की ग्रंथात दिले आहे ते खरे.'' स्वामीजी त्याच्याकडे वेधक नजरेने पाहात म्हणाले, ''भल्या माणसा तुला ध्यानच लागत नाही. ध्यान म्हणजे काय हेच तुला माहिती नाही. डोळे मिटून बसल्या बसल्या तुला झोप लागते त्याला तू ध्यान म्हणतो आणि स्वप्न पाहतो त्याला अनुभव म्हणतोस.'' हे ऐकताच तो माणुस चिडला. ''तुम्हाला काय माहित मला ध्यान लागते की नाही? ''होय ते आम्हाला कळते, तो आमचा विषय आहे., ध्यान समाधी हेच आमचे जीवन आहे म्हणून एवढ्या अधिकारवाणीने सांगतो आहोत. तो गृहस्थ चपापला, वरमला कांही वाद न करता निघून गेला. इतर सगळे लोक पण गेले. स्वामीजींना पूर्ण खात्री होती हा माणूस सकाळी पुन्हा भेटायला येणार.

सकाळी स्नानादितून निवृत्त होऊन पुजाऱ्याने आणलेला चहा पित असतांनाच तो गृहस्थ आला. पण स्वामीजींजवळ न येता पुजाऱ्याच्या घराच्या ओट्याशी बसला. स्वामीजींनी पण त्याला पाहून न पाहिल्यासारखे केले. स्वामीजी तेथून निघाले. पक्क्या रोडने न जाता शेतातून पायवाटेने जायला निघाले. स्वामीजी मंदिरातून निघाल्यापासूनच तो गृहस्थ पण अंतर ठेवून स्वामीजींच्या मागे मागे जाऊ लागला. गांव पार पडले स्वामीजी थोडे पुढे गेले. दोन्ही बाजुला छान हिरवळ, चांगली पीके स्वामीजी मजेत चालत होते. तो गृहस्थ आपल्या मागे येत असल्याची स्वामीजींना कल्पना होती. थोडे पुढे जाऊन आता आसपास कोणी नाही पाहून स्वामीजी थांबले, मागे वळले. त्या गृहस्थाला जवळ येऊ दिले आणि म्हणाले, ''भाऊ, तुम्हाला ध्यान छान लागते. तुमचे अनुभव पण बरोबर आहेत.'' ''काय?'' तो गृहस्थ जवळजवळ किंचाळला. काल तर तुम्ही सर्वांसमोर माझा पाणउतारा केला आणि आता हे सांगता आहात. स्वामीजी उत्तरले जे केले ते तुमच्या भल्यासाठी, हितासाठी केले. आम्हाला खेडेगांवातील लोकांची मानसिकता चांगली कळते. आता आम्ही जे तुम्हाला सांगतो आहोत ते काल सर्वांसमोर सांगितले असते तर आता तुम्ही आमच्या समोर उभे नसता तर घरी असता आणि सकाळपासून तुमच्या घरी लोकांचे येणे सुरू झाले असते. तुम्हाला नमस्कार करण्यासाठी आणि त्या नमस्काराने तुम्ही आंतून सुखावला असता. हळूहळू अहंकाराने तोंड वर काढले असते. आताशी कुठे खऱ्या अर्थाने तुमची साधना सुरू झाली आहे, ती पुढे जाण्याऐवजी लोकांकडून मिळू लागलेल्या मानसन्मानाने, प्रतिष्ठेने स्थगित झाली असती. तुमचे पतन झाले असते. त्या पतनापासून वाचविण्यासाठी काल आम्ही तसे नाटक केले आणि दुसरी गोष्ट तुमच्या बोलण्यावरून लक्षात येते की तुम्ही अजून कोणाला गुरू केले नाही.'' तो

गृहस्त उत्तरला नाही अद्याप तरी कोणाला गुरू केले नाही. गुरू करावासा वाटेल असा अजून कोणी भेटला पण नाही. ठिक आहे पण लवकर शोधा. एवढे बोलून स्वामीजी चालायला लागले. तो गृहस्थ शांतपणे गहन विचारात पडून जागच्या जागीच उभा आहे हे स्वामीजींना मागे वळून न पाहताही कळत होते. थोडे पुढे गेले. पुढे दोन रस्ते, आतापर्यंत स्वामीजींनी इतका पायी प्रवास केला आहे की, त्यांना रस्त्याचा चांगला अंदाज येतो. डावीकडचा रस्ता आपल्याला जेथे जायचे आहे तिकडे जातो आणि उजवीकडचा रस्ता पडीक जमीनीकडे जातो आहे हे लक्षात घेऊन स्वामीजी जाणुन-बुजून उजव्या रस्त्याच्या पायवाटेवरून जाऊ लागले. मागे उभा असलेला गृहस्थ आपल्याकडे एकटक बघतो आहे हे स्वामीजींना कळत होते. जसे स्वामीजी त्या पाऊलवाटेकडे वळले. त्याने हाक मारली, अहो महाराज थांबा थांबा असे म्हणत धांवतच स्वामीजींजवळ आला आणि म्हणाला, हा रस्ता तापीच्या दरडीकडे कऱ्हाडी कडे जातो. फार धोक्याची जागा आहे. ही जागा खूप उंच आहे, तापी खूप खोल वाहते आहे, जमीन ठिसूळ आहे, पाय घसरण्याची भिती. तो कळवळून सांगू लागला. स्वामीजी प्रसन्नतेने हसून त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाले, ''सद्गृहस्था येथल्या जमिनीवर पण रस्ता दाखवायला कोणीतरी मार्गदर्शक लागतो नाहीतर सरळ खड्ड्यात आणि तूं गुरू न करताच त्या आध्यात्मिक वाटेने निघाला आहेस ज्याची तुला काहीच माहिती नाही. तो रस्ता पुढे ईश्वराकडे नेईल की पतनाकडे?'' त्या माणसाच्या डोळ्यात अश्रू तरारले. खाली वाकून स्वामीजींना नमस्कार करीत म्हणाला, आजपर्यंत आयुष्यात असा कोणी भेटला नाही की ज्याला गुरू करून घ्यावा असे वाटेल आणि आज भेटले तर ते थांबत नाहीत आणि पुन्हा कधी भेट होईल की नाही तेही माहित नाही. हे बोलता बोलता त्याचा कंठ दाटून आला. थरथरत त्याने हात जोडले, डोळ्यात अश्रुधारा. स्वामीजींनी त्याला थोपटले आणि पुढच्या मार्गाने निघुन गेले.

खूप लोकांना रस्ता विचारण्याची पण लाज वाटते. आपण बरोबर आहोत ही जणू त्यांना खात्री असते आणि दुसरे कुणाला विचारण्यात कमीपणा वाटतो. पण त्यांना हे कळत नाही की, रस्ता चुकल्यावर आपण रस्त्यावर येऊ. मी अनेकदा गुरूमाऊलीसोबत कारने प्रवास केला आहे. शेजारी बसलेल्या चक्रधरला (स्वामीजी ड्रायव्हरला चक्रधर म्हणतात) स्वामीजी म्हणतात, ''विचारून खात्री करून घ्या हा रस्ता कुठे जातो नाहीतर आपण फेऱ्यात पडू. वेळ आणि पेट्रोल दोघांची नासाडी आणि एखाद्या पांथस्थाला विचाले तर त्याला धन्यवाद सांगायला गुरूमाऊली कधी विसरत नाही आणि अध्यात्मक्षेत्रातला गुरू तर एक सच्चे मार्गदर्शक त्यांच्याशिवाय प्रवासाला गती कशी येणार. येथे तर पदोपदी मार्गदर्शन लागते त्याशिवाय एक पाऊलही साधक पुढे टाकू शकत नाही.

स्वामीजी एकदा कराड (जि. सातारा) ला प्रवचनासाठी गेले होते. प्रवचन आटोपले, श्रोतृवर्ग जाऊ लागला. एक तरूण सुवासिनी हात जोडून विनंती करीत होती. ''स्वामीजी उद्या सकाळी माझ्याकडे या.'' स्वामीजी म्हणाले, ''मुली परिचय नसेल तेथे आम्ही जाणे टाळतो आणि आम्ही कोणत्याच सांसारिक अडचणी सोडवण्याला मदत करत नाही. अध्यात्म आणि साधनेशिवाय इतर विषयांची चर्चा करीत नाही. कशासाठी बोलवते आहेस आम्हाला?'' ती म्हणाली, ''स्वामीजी मी तुमच्याबद्दल सगळ ऐकून आहे. मला कुठलाच सांसारीक, वैयक्तिक प्रश्न विचारायचा नाही, तरी आग्रहाची विनंती की या. कारण उद्याच सांगेन.'' ज्यांच्याकडे स्वामी उतरले होते ते शिरीष जोशी म्हणाले, ''उद्या जाऊ आपण स्वामीजी, चांगली माणसं आहेत. मी ओळखतो. नाही म्हणून त्या मुलीला नाराज करू नका. स्वामीजी म्हणाले, 'ठिक आहे येतो उद्या.' दुसऱ्या दिवशी शिरीष जोशींबरोबरच स्वामीजी तिच्या घरी गेले. बसले आणि एक मध्यमवयीन दंपती स्वामीजींसमोर येऊन उभी राहिली. भावावेगाने थरथरणाऱ्या हातांनी हात जोडून वंदन केले. डोळे पाणावलेले आणि म्हणाले, स्वामीजी तुमचे फार मोठे उपकार आहेत आमच्यावर. त्यांचे ते बोलणे ऐकून आणि डोळ्यातील अश्रू बघून

स्वामीजी आश्चर्याने म्हणाले, कसले उपकार तुमची आमची तर ही पहिलीच भेट.'' तर ते म्हणाले, ''स्वामीजी तुमच्यामुळे आमचा मुलगा आम्हाला परत मिळाला.'' स्वामीजी विस्मयाने त्यांच्याकडे पाहात होते. तेवढ्यात ती मुलगी पण आली, तीची पण तीच अवस्था. ते गृहस्थ म्हणाले, ही माझी मुलगी येथे राहते. आम्ही कोल्हापूरात. मुद्दाम आलोत. मुलीने काल कळविले आम्हाला की तुम्ही कराडला आला आहात. त्यांना थोडे शांत होऊ दिले त्यानंतर त्यांनी जे सांगितले ते ऐकून स्वामीजींना एकदम मागच्या महिन्याचा प्रसंग आठवला.

त्यादिवशी स्वामीजी आश्रमावर एकटेच होते, सकाळची वेळ होती. स्वामीजी पाठ करत होते. बाहेरून कुणीतरी आवाज दिला. स्वामीजी उठून बाहेर दारात आले. बाहेर एक तरूण मुलगा उभा होता. आत बोलविले. रात्रभरच्या प्रवासाने त्याचे सकाळचे सगळेच कार्य बाकी होते. स्वामीजींनी आधी त्याची ती सगळी व्यवस्था करून दिली. मग स्वत:च चहा करून दिला. स्वामीजींनी त्या तरूणाचे येण्याचे प्रयोजन काय म्हणून विचारले. त्याने बोलायला सुरूवात केली, ''स्वामीजी मी आय.आय.टी.पवईमध्ये एम.टेक करीत आहे. मध्येच विवेकानंदांची बरीचशी पुस्तके वाचली आणि वाटू लागले की, मी एम.टेक करून काय मिळवणार? मानवी जीवनाचा उद्देश काय? इतर पुस्तके पण वाचली विचारांचा गदारोळ झाला. मी माझ्या गाईडला याविषयी विचारले, याविषयी तो स्पष्टपणे म्हणाला, ''हा माझा विषयच नाही, त्याबद्दल मी तुला काय मार्गदर्शन करणार? मग मी स्वत:च निर्णय घेतला. पवई सोडल. विवेकानंदांची पुस्तके वाचली होती म्हणून आधी कन्याकुमारीला गेलो तेथे कांही दिवस थांबलो, पण माझे लक्ष तेथे लागेना. सेवेचे ते उत्तम स्थान (क्षेत्र) आहे परंतु माझी आंतरिक तहान त्याने भागणार नव्हती. तेथून बेलूरला गेलो. तेथे कांही काळ राहिलो, तेथून पुढे हरिद्वार, ऋषिकेश, अनेक आश्रम, अनेक साधुसंन्यासी पण मला जे हवे ते कुठे मिळत नव्हते. परत पुण्याला गेलो. तेथे शिरीषदादा कवडेंचे नाव ऐकले. त्यांना भेटायला गेलो. मला तेथे बसायला सांगितले. तासाभरांत भेटतील असे सांगण्यात आले. येथे ग्रंथालय आहे कोणते तरी पुस्तक घेऊन वाचत बसा. मी पुस्तके पाहिली. एक पुस्तक हातात घेतले आणि पहिल्याच पानापासून झपाटल्यासारखे झाले. त्यानंतर त्याच स्वामीजींची आणखी कांही पुस्तके वांचली आणि ठरवले यांना भेटायचे आणि सरळ येथे आलो. तो तरूण बोलायचे थांबला. स्वामीजी म्हणाले, बाबा रे फोन करून तरी यायचे. आम्ही येथे नसतो तर? बऱ्याचवेळा आम्ही प्रवासात असतो. आज तुझे नशीब की आम्ही आश्रमावर आहोत' त्यावर तो युवक म्हणाला, मला फोनच्या माध्यमातून पण तुमचा पहिला संपर्क नको होता. सरळ डोळ्यांनी बघायचे, कानांनी ऐकायचे आणि अनुभवायचे होते समोर उभे राहून.

स्वामीजींनी विचारले, ''घरी कोण कोण आहे? आई-वडिलांचा मी एकच मुलगा. बहिणीचे लग्न झालं आहे. वडिल कोल्हापूरात एम.एस.ई.बी. मध्ये उच्चपदाधिकारी आहेत. आईवडिलांना सांगून घर सोडलं? 'नाही'. ते तुझी किती वाट पाहात असतील, तुला कोठे कोठे शोधत असतील, त्यांच्या तीव्र मानसिक वेदनांची तुला कल्पना तरी आहे का? अध्यात्म क्षेत्रात वाटचाल करण्यासाठी आईवडिलांची परवानगी न घेताच, न सांगताच, त्यांचे आशिर्वाद न घेताच निघालास. त्यांची तळमळ, तडफड तुला अध्यात्मात प्रगती करू देईल? त्यांना आधी सांगायचे होते. समजू शकतो ते नाही म्हणाले असते पण तू तुझ्या निर्णयावर दृढ राहिला असता तर केव्हातरी परवानगी मिळालीच असती. ''बर गृहस्थाश्रम स्विकारायचा विचार नाही? तो तरूण उद्गारला, नाही स्वामीजी मला संन्यास घ्यायचा आहे. स्वामीजींनी त्याच्या नजरेला नजर भिडवत विचारले, गृहस्थाश्रम न स्विकारण्यामागे स्वत:च्या पौरूषाबद्दल शंका आहे? स्वामीजी असा तीव्र वेधक, अनपेक्षित प्रश्न करतील याची त्याला कल्पनाच नव्हती. किंचित धारदार आवाजात स्वामीजींनी विचारले ''नाही स्वामीजी तसेही काही नाही'' तो उत्तरला. मग तुला संन्यास घेण्याइतके तीव्र वैराग्य झाले आहे असे तुला का वाटते? तो तुझ्या मनाचा भ्रम तर नाही ना? कसे तपासून बघितले? अजुन शिक्षण सुरू आहे म्हणजे

नोकरी केली नाही, पैसे कमविले नाही, पैसे न कमवताच पैशांचा आपल्याला लोभ नाही हे तू कसे ठरविणार? आज संसार न करताच या वयात बाहेर पडला आणि उद्या साधना गतिमान व्हायच्या आधीच कामविकार, वासनाविकार उफाळून आले तर मग काय करणार? मला कामजीवनात रस नाही हे अनुभव न घेताच कसे मानून घेतले? लग्न न करता संन्यास घेतलेले खूप संन्यासी नंतर घसरले आहेत किंवा कुंठीत झाले आहेत. धोबी का कुत्ता न घरका न घाटका अशी स्थिती आहे. शंभरातला एखादाच या गोष्टीपासून स्वत:ला सावरत पुढे साधना करू शकतो. त्यासाठी तीव्र वैराग्य जागावे लागते आणि विवेक जागृत व्हावा लागतो. बरं ते जाऊ दे. एक महत्वाची गोष्ट लक्षात ठेव, नीट लक्षपूर्वक ऐक तुला जर असे वाटत असेल की मी अध्यात्मसाधनेसाठी एखाद्या आश्रमात जाईन. तेथे पहाटे उठून ध्यानाला बसेन मग मला कोणीतरी चहा आणुन देईल. त्यानंतर पुन्हा साधना मग जेवायच्या वेळी कुणी बोलाविल वगैरे वगैरे. लक्षात ठेव जेथे तुझ्या कल्पनेप्रमाणे सोयी मिळतील तेथे तुला अध्यात्माचे, साधनेचे क, ख, ग पण शिकायला मिळणार नाही आणि जेथे साधनेचे, अध्यात्माचे रहस्य जाणायला मिळेल तेथे यातले कांहीही मिळणार नाही. उलट तेथे सगळीच कामे स्वत: करावी लागतील. आता तूं येथेच बघ. आम्ही एकटेच आहोत. तू आज अतिथी आहे म्हणून चहा करून दिला. उद्या आम्ही तुला सांगू लवकर उठ, कचरा काढ, चहा करून घे, भांडी घासून घे तर त्यावेळी तुला ते जीवावर येईल. तीव्र वैराग्य आणि विवेक नसेल तर तुला तुझे शिक्षण, तुझी पदवी, तुझी तीव्र बुद्धी आठवेल. मग ही कामे तुला हलकी वाटतील. आम्ही आमची गोष्ट सांगत नाही. जेथे कांही मिळायची शक्यता आहे तेथे असेच होईल. तुला ते देण्यासाठी, सुपात्र बनविण्यासाठी. तुला भीमसेन जोशींची कथा माहित आहे? सतत तीन वर्ष त्यांनी गुरूगृही सेवा केली. पाणी भरल, कचरा काढलां, भांडी घासली पण तीन वर्षात त्यांच्या गुरूने एकदाही विचारले नाही की, बाळ तुझे नांव काय? कशासाठी आला आहेस? तीन वर्षानी त्यांच्या पत्नीने त्यांना सांगितले तेव्हा त्यांनी भीमसेन जोशींना संगीत विद्या शिकवली. संगीत विद्येसाठी एवढी खडतर तपश्चर्या. हे तर अध्यात्मिक क्षेत्र आहे. आंतरिक शुद्धीसाठी, कांही प्राप्तीसाठीं सुपात्र व्हायला याहून अधिक कठीण तपस्या आहे. ज्यांना तपस्या न करताच थोडफार काही मिळाले, ते सहज स्वस्तात मिळालेल्या हिऱ्याची किंमत करु शकत नाहीत. कारण हिऱ्याची किंमत ओळखायला आधी ते शिकावे लागते नाही तर हातातून हिरा जातो पतन होते.

एवढे बोलून स्वामीजी त्याला म्हणाले, आता आम्ही तुला दोन महत्वाच्या गोष्टी सांगतो. येथून घरी जा. आईवडिलांना भेट. त्यांच्याजवळ ८-१० दिवस राहून आम्ही सांगतो तेथे मुरबाडला मुकुंद वल्लभांकडे जा. झी टी.व्ही. साठी सिरीयल करणारे विकास देसाई हे नांव ऐकले असेल तर ते हेच. सिनेमा, टी.व्ही. च्या चमकत्या दमकत्या आणि विषयवासनेने सतत खदखदणाऱ्या त्या वातावरणातून हा माणूस बाहेर पडला आणि मुरबाड तालुक्यात अगदी एका जंगलात भजन करायला जाऊन बसला. त्यांच्याजवळ निदान १५ दिवस तरी गैरसोयीत शांत चित्ताने, मजेने राहू शकतो का बघ? त्यांच्यापासून कांही शिक. तुझी जन्मपत्रिका पण असेल तर ती घेऊन जा. ते चांगले ज्योतिषी पण आहेत. तुझ्या पत्रिकेत संन्यासाचा योग आहे का ते पण बघतील आणि एवढे सर्व करून झाल्यावर तुला असे वाटले कीं आपल्याला आता शिकायचे नाही, गृहस्थाश्रम स्विकारायचा नाही, साधनाच करायची आहे, संन्यासच घ्यायचा आहे तर मग आईवडिलांना नमस्कार करून, त्यांची परवानगी घेऊन. कोल्हापूरहून येथे पायी यायचे अंगावरच्या एक जोड कपड्याशिवाय अजून एक जोड कपडा. असे फक्त दोन जोडी कपडे. एक टॉवेल, एक गीता एवढेच घेऊन निघायचे. खिशात एक पैसा नको, कोणाकडे पैसे मागायचे नाहीत, कुणी स्वत:हून दिले तरी घ्यायचे नाहीत. भूक लागली तर पोटापुरत खायला मागू शकतोस. एकवेळ भोजनाशिवाय दुसरे कांहीही स्वत:हून कोणाकडे मागायचे नाही. चहा नाही, नाश्ता नाही, दुसऱ्यांदा भोजन नाही. हे आपोआप कोणी दिले तर स्विकार, नाही म्हणायचे नाही, पण मागायचे नाही. असे करत येथपर्यंत चालत ये. या काळात तुझी तुच परीक्षा करशील तुला खरोखर किती वैराग्य झाले आहे,

अध्यात्माची किती ओढ आहे. अशा पद्धतीने येथे आलास तर तुझा स्विकार करू. तो तरूण परत गेला आणि त्याचे आईवडील आता समोर उभे होते. स्वामीजींनी विचारले, ''कोठे आहे तो आता? काय करतो?'' ते म्हणाले पवईला परत गेला. एम.टेक पुन्हा चालू केले.'' त्यांच्या स्वरात आनंद होता. आंतरिक समाधान होते. न सांगता घर सोडून निघून गेलेला एकुलता एक मुलगा परत आला याचे!

स्वामीजी, 'तुम्ही जसं सांगाल तस मी करेन! तुमचा निर्णय तुमचा शब्द अंतिम!' करसनभाई स्वामीजींना सांगत होते. सूरतमधील ख्यातनाम कन्स्ट्रक्शन कंपनी, लोकांच्या पूर्ण विश्वासाला पात्र ठरलेली कंपनी, सरगम बिल्डर्सच्या चार पाच भागिदारापैकी एक आणि कंपनीचे एम.डी. स्वामीजींबद्दल खूप आदर प्रेमभाव. स्वामीजींचे वाक्य त्यांच्यासाठी ब्रह्मवाक्य. 'बोला काय झाले?' स्वामीजींनी विचारले, करसनभाई म्हणाले, ''माझे सगळे नातेवाईक आणि गांवाकडचे लोक मला सारखे सांगत असतात की तुम्ही तर दोघेच आहात. बसून खाल्ले तरी संपणार नाही एवढे कमवले आहे. मग आता कशाला ही धांवपळ, हा डोक्याला ताप. सोडा सगळे आणि या गांवाकडे, सगळ्यांचा हाच आग्रह आहे. आता तुम्हीच सांगा मी काय करायचे? स्वामीजी म्हणाले, ''करसनभाई साधन भजन करणे हा तुमचा पिंड नाही. तुम्ही कर्मयोगी. घरी जाऊन हातात माळा घेऊन जप करणार का? गीता-भागवत-रामायण वाचत बसाल का? तो तुमचा स्वभाव नाही, ते तुम्हाला शक्य नाही. मग वेळ कसा घालविणार? येथे तुम्हाला वेळ पुरत नाही एवढे काम आहे आणि तेथे वेळ कसा घालवावा हे तुम्हाला कळेनासे होईल. खेडेगांवात ज्या तऱ्हेच्या गप्पा होत राहातात 'दुसऱ्याच्या घरची पंचायत' ते तुमच्या स्वभावात नाही. थोडा वेळ कोणाशी काही बोलाल की कंटाळून जाल. मग कोणीतरी हळुच म्हणेल चल पत्ते खेळू. वेळ घालविण्यासाठी तुम्ही हो म्हणाल, बसाल, चार आठ दिवस साधे पत्ते खेळता खेळता कधी जुगाराकडे वळाल हे तुम्हालाही कळणार नाही. खाली मन सैतानाचे घर. वेळ घालविण्यासाठी तुम्ही एक नवीन गोष्ट सुरू कराल. आज तुम्हाला एवढा व्याप सांभाळून पण कसलेच व्यसन नाही. तेथे? तेथल्या लोकांमध्ये राहून कळत नकळत एकेक व्यसन लागेल. शेवटी पतन. का पत्करता हा धोका? ठिक आहे तुम्हाला स्वत:ला तुमच्यासाठी पैशांची गरज नाही. पण हे का डोक्यात घेतले की स्वत:ला गरज असेल तरच पैसे कमवू. आता हे लक्षात घ्या आज तुमच्या कंपनीचे खूप मोठे नांव आहे सूरतमध्ये. त्यात मुख्य सिंहाचा वाटा तुमचा आहे. तुमच्या कामाचा व्याप एवढा आहे आणि सगळ्यांना तुमच्याबद्दल विश्वास, प्रेमभाव, आदर असा आहे की नाही म्हटले तरी आज चारशे परिवार तुमच्याशी जोडले गेले आहेत. बांधकाम कामगार, गवंडी, छत भरणारे लोक, कलरकाम, सुतारकाम करणारे, टाईल्सवाले, प्लंबर वगैरे. सगळे तुमच्याकडे एका कुटुंबासारखे एकत्र काम करतात. असे समजा या चारशे कुटुंबाचे पालनपोषण करण्याची जबाबदारी ईश्वराने तुमच्यावर सोपवली आहे आणि ती नीट पार पाडणे हेच तुमचे साधन-भजन आहे. माळा घेऊन जप करणे, ग्रंथ वाचणे, पूजापाठ ध्यान करणे हे तुमच्या रक्तात नाही. तुमचा कर्मयोग हीच तुमची साधना, हीच ईश्वरपूजा समजून, ईश्वराने आपल्यावर सोपवलेली जबाबदारी म्हणून हे काम करायचे आहे, स्वत:साठी नाही. यातून जी चार पैसे कमाई होईल ती घरी न्या असेही गरजेचे नाही. समाजाच्या अनेक क्षेत्रात, अनेक कामांत पैशाची गरज आहे. तेथे जनसेवेत खर्च करा. ***जनसेवा हीच ईश्वरसेवा*** समजून !

स्वामीजींचे हे बोलणे करसनभाईंना मनोमन पटले. त्यांनी व्यवसाय सोडून गावाकडे जाण्याचा विचार सोडला. कर्मयोग्यासारखे काम करत राहिले. आता नुकतेच करोना संकटकाळात ज्या संस्थेने रोजच्या दीड लाख पोळ्या त्याबरोबर वरणभात, भाजी-पोळी पुरवून हजारो गरजू कुटुंबांना सांभाळले ती सूरतमधील सेवा क्षेत्रात खूप मोठे नांव असलेली '**छायडो**' ही समाजसेवी संस्था करसनभाईंनीच स्थापन केली आहे. छायडो ही संस्था सूरतच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये काय काम करते हे स्वत: तेथे जाऊन बघण्यातच मजा आहे. त्यांच्या तिथल्या कामाबद्दल लिहायचे तर स्वतंत्र पान लिहावे लागेल.

वरील प्रसंगा आधी करसनभाईंनी आणखी एक सल्ला मागितला, म्हणाले स्वामीजी माझ्या जवळचे दूरचे सगळेच नातेवाईक आणि पूर्वीच्या मित्रमंडळीपैकी काही, आमच्या समाजाचे काही यातील प्रत्येकाला वाटते की मी त्यांच्या मुलांना काही काम द्यावे, माझ्याकडे नोकरीला ठेऊन घ्यावे. खरे तर अशा दहापैकी एखाद्याकडे नोकरीसाठी आवश्यक गुणवत्ता थोडीफार असते. बाकीच्यांजवळ तेही काही नसते, तरी अपेक्षा मात्र सर्वांची. बरे एकाला घेतले दुसऱ्याला नाही घेतले तर ती पण मनात अढी. कंपनी माझी एकट्याची नाही, अजून चार भागीदार आहेत त्यांना काय उत्तर द्यावे? त्रासून सोडल या सर्वांनी. स्वामीजी उत्तरले, ''करसनभाई यापैकी एकालाही नोकरीवर घेऊ नका, पात्र असला तरी घेऊ नका. अपात्राची गोष्ट दूरच, कारण तो तुमचा 'माणूस' म्हणुन ऑफिसमध्ये नोकरीला लागला तर तो थोड्याच महिन्यात ऑफिसमध्ये उद्दंडपणे वागेल. 'तुमचा माणूस' म्हणून कोणी बोलू शकणार नाही. केव्हाही येईल, केव्हाही जाईल. काम करेलच असेही नाही. त्यामुळे सगळ्या ऑफिसची शिस्त बिघडेल. इतरांना काम केले नाही म्हणून तुम्ही त्याला बोलला तर ते मनात म्हणतील, तो तुमचा नातेवाईक'' ऑफिसचे सगळे वातावरण खराब होईल. कोणी योग्य सुपात्र असेल तर त्याला तुमच्या ओळखीने दुसरीकडे कामाला लावा. स्वत:कडे नको. बाकीच्यांना सांगा घराकडे, गांवाकडे राबून धंदा व्यवसाय करा. त्यासाठी लागणारे भांडवल (दोन चार लाख जे लागेल ते) मी पुरवतो, पण एका अटीवर. तुम्हाला जो धंदा-व्यवसाय करायचा आहे त्याची नीट माहिती व्हावी, योग्य ते ज्ञान व्हावे म्हणून तो धंदा-व्यवसाय ज्याचा चांगला चालला आहे, त्याच्याकडे एक वर्ष काम करायचे; बिनपगारी करावे लागले तरी. धंदा-व्यवसायाची समज करून घ्यायची, वर्षभर कोठेही काम करा, मग माझ्याकडे या. (खर्चाचा अंदाज घेऊन) मी मदत करेन आणि गंमत सांगू सुंठीवाचून खोकला गेला आणि तेही कोणा नातेवाईकांना न दुखवता.

सतलासणा हायस्कूलचे प्राचार्य श्री. अरविंदभाई पटेल. असा शिक्षक, असा आचार्य आमच्या पाहण्यात नाही असे स्वामीजी कायम म्हणायचे. खरा शिक्षक, खरा आचार्य कोणाला म्हणायचे? असा प्रश्न जर कोणी स्वामीजींना केला तर स्वामीजींचे उत्तर एकच श्री. अरविंदभाई पटेल. सेवानिवृत्तीनंतर ते आपल्या खेडेगांवी परत गेले. हाडाचे कर्मयोगी, तेथे शेतात लक्ष घातले आणि एक दिवस स्वामीजींना अचानकच ती वाईट आणि दुर्दैवी बातमी कळाली की अरविंदभाई पटेलला कॅन्सर आहे. कसलेच कांही व्यसन नसलेले, अगदी सुस्वभावी शांत प्रकृतीचे, अतिशय संयमित जीवन, साधी राहणी उच्च विचारसरणी, खऱ्या अर्थाने मोठ्या मनाचा हा माणूस त्यांना कॅन्सर का व्हावा हे सगळ्यांना न उलगडलेले कोडे. त्यांच्या अनेक विद्यार्थी उत्तम यशस्वी डॉक्टर पण सगळे हतबल झाले. म्हणाले, सर तुमची ही कॅन्सरची गाठ छाती आणि पाठ यांच्या पोकळीत आहे. जागा अशी आहे की, ऑपरेशन करणे शक्य नाही. गोळ्या औषधाशिवाय दुसरा कोणताच उपचार करता येणार नाही.

स्वामीजींना हे सगळे कळताच पटकन हातातली सगळी कामे बाजुला ठेवून अरविंदभाईना भेटायला गेले. स्वामीजी आणि अरविंदभाई यांचे संबंध पण तसेच होते. रात्री निवांत गप्पा मारतांना त्यांच्याशी बोलतांना इतर कोणाला वाटले पण नसते की यांना कॅन्सर आहे. इतके शांत, धीरगंभीर मानसिक स्वास्थ्य टिकवुन गप्पा मारायचे. स्वामीजी त्यांना म्हणाले, अरविंदभाई कोणता घरमालक चांगला? सहा महिने आधी नोटीस देऊन सांगणारा की सहा महिन्यात घर खाली करून द्या. की रात्री अपरात्री दिवसा ढवळ्या केव्हाही येऊन आत्ताच्या आत्ता माझे घर खाली कर म्हणून सांगणारा? अरविंदभाई हसले आणि म्हणाले, तुम्हाला काय म्हणायचे ते मी समजलो स्वामीजी. तुमच्या तोंडून शब्द निघून गेले सहा महिने ते खोटे पडणार नाही हे इतक्या वर्षाच्या अनुभवाने सहवासाने मला माहित आहे. मी त्या मालकाची नोटीस स्विकारली समजा. उद्यापासूनच तयारीला लागतो. घर खाली करण्यासाठी आणि दुसऱ्या दिवसापासून सर्वच व्यवहारातून त्यांनी लक्ष काढून घ्यायला सुरूवात केली. मुला मुलींना जे कांही द्यायचे असेल ते दिले. स्वत:च्या हाताने आर्थिक व्यवहार पूर्ण केले.

सामाजिक व्यवहार पूर्ण केले. बोलणे आवश्यक तेवढेच. शांत आणि अंतर्मुख झाले. पण चेहऱ्यावर कोणत्याही वेदना नाही. शांत प्रसन्न चेहरा, सगळ्यांशी आपलेपणाने वागणे आणि एके दिवशी त्यांच्या खास मित्राला बोलवणे पाठवले; आणि म्हणाले, तुला सांगतो ते इतक्यात कोणाला सांगू नको परवा सकाळी मीच सांगेन सगळ्यांना. पण तुला सांगतो मी परवा संध्याकाळी म्हणजे ठीक बहात्तर तासांनी संध्याकाळी पांच वाजता जाणार. ही एकदोन कामे राहिली होती ती तू या दोन दिवसात पूर्ण कर. जड अंत:करणाने कांही न बोलता मित्र निघून गेला. तिसऱ्या दिवशी सकाळी मुलामुलींना, पत्नीला, सुनेला, नातवंडांना सगळ्यांना बोलवले. सगळ्यांना आशीर्वाद दिला आणि सांगितले मी आज संध्याकाळी पांच वाजता जाणार. सगळ्यांनी शांत राहायचं आहे. कोणीही रडायचं नाही. माझी कांहीही खाण्यापिण्याची इच्छा नाही पण तुम्हाला जर असे वाटत असेल की शेवटचे हे करून खाऊ घालू तर ते करून खाऊ घालू शकता, २/३ चमचे तोंडात टाकीन. मुलाला म्हणाले, स्वामीजींना नमस्कार सांग. आता मी दिवसभर कोणाशी कांही बोलणार नाही, जा आता सगळे. शांतपणे त्यांनी डोळे मिटले. संध्याकाळी बरोबर पांच वाजता तोंडात तुळशीपत्र ठेवले. ''***श्रीकृष्ण शरणम् मम।***'' तीनदा म्हटले आणि शरीर सोडले हा खरा देहत्याग. स्वामीजींच्या मागच्या भेटीनंतर बरोबर सहा महिन्यांनी.. आम्ही जातो आमुच्या गांवा!

पायी प्रवासात स्वामीजींनी जगन्नाथपुरीच्या रस्त्यावर कोणत्यातरी खेडेगांवात रात्री काढली. खरेतर ती दिवाळीची अमावस्या होती. पण त्या गांवच्या लोकांसाठी गटार अमावस्या. त्यामुळे गांवात कोठेही न जाता शाळेच्या ओट्यावर स्वामीजींनी रात्र काढली. 'रात्र काळी घागर काळी' दिपावलीची रात्र अंधारात अशी ही एक दिवाळी. सकाळी उठून स्वामीजी चालू लागले. तहान लागली इकडे तिकडे बघितले. एके ठिकाणी हॅण्डपंप होता. तो चालू करून स्वामीजी पाणी प्याले. तेवढ्यात कानाशी आवाज आला. ''महाराजजी तुम्हाला साहेब बोलवताहेत. तेव्हा स्वामीजींनी चमकुन वर पाहिले तर इमारतीवर बोर्ड होता 'पोलीस स्टेशन'. स्वामीजींना वाटले, पोलीस स्टेशनातील हॅण्डपंपावर न विचारता पाणी प्यालो हा पण गुन्हा झाला की काय? ठिक आहे, बघुया काय म्हणतात ते! असे मनाशी म्हणत स्वामीजी आत गेले. स्वामीजींना बघुन खुर्चीवर बसलेला फौजदार आदराने उठून उभा राहिला. समोरच्या खुर्चीकडे बोट दाखवत म्हणाला, 'बसा महाराजजी' 'चहा घेणार?' 'हो'. 'कोठून आलात आणि कोठे चाललात?' छपऱ्याहून आलो आणि जगन्नाथपूरीला जातो आहोत. तो आनंदाने म्हणाला, ''छपऱ्याहून! मी पण छपऱ्याचाच. वा चला आता जेवल्याखेरीज जाऊ देणार नाही.'' त्याने एका शिपायाला बोलवले घरी घेऊन जाऊन व्यवस्था करण्यासाठी. स्वामीजींच्या शेजारी बसलेला एक सज्जन सगळे बघत होता, ऐकत होता. तो उठला आणि हात जोडत फौजदाराला म्हणाला, ''साहेब एक विनंती. ही सेवा करण्याची संधी मला द्या मी यांना माझ्या घरी घेऊन जातो. रात्री माझ्याकडेच मुक्कामाला ठेवून घेईन. तुम्ही या जेव्हा वेळ मिळेल तेव्हा.'' ''अहो! तुम्ही तर तक्रार घेऊन आलात ना ऑफिसात चोरी झाली म्हणून, चला आता लिहून घेतो.'' मी स्वामीजींना घरी पोहचवून तक्रार लिहायला परत येतो.'' असे म्हणून तो गृहस्थ स्वामीजींना घरी घेऊन गेला.

त्या दिवशी रात्री दोघे पतिपत्नी स्वामीजींच्या आसनाजवळ येऊन बसले, मौन. पण त्यांना नेमके काय सांगायचे आहे हे न सांगताच स्वामीजींना कळत होते. ''वैशिष्टपूर्ण भारतीय मानसिकता आणि ती ही स्त्रियांची.'' दिवसभराच्या राहण्याने लक्षात आलेच होते की यांना चार मुलीच आहेत, मुलगा नाही. मोठी मुलगी असेल ११/१२ वर्षांची आणि सगळ्यात लहान ३ वर्षाची. मुलगा तर हवाच, त्यासाठी हे मंदीर ते मंदीर हा नवस तो नवस, हा महाराज तो ज्योतिषी. आणखी काय काय, ज्यांने जे सांगितले ते करायचे पण मुलगा पाहिजेच. पतिपत्नी एकमेकांना खुणावत होते. 'तू सांग तू सांग'. शेवटी बाईने हिंमत केली. महाराजजी पदर पसरते आशिर्वाद द्या. वंशाला दिवा पाहिजे. मुलगा हवा! वंश चालला पाहिजे.'' स्वामीजी त्या बाईला

म्हणाले, अवश्य आशिर्वाद देऊ, तो सफल पण होईल विश्वास ठेवा पण एका अटीवर आशिर्वाद देऊ. बाई आनंदाने म्हणाली, ''सांगा सांगा स्वामीजी मी ती पूर्ण करेन. मला खात्री झाली आहे तुमचा आशिर्वाद व्यर्थ जाणार नाही. हमखास सफल होईल. ''एवढेच करा की, रामाच्या वंशात, कृष्णाच्या वंशात, पांडवांच्या वंशात कोणी तुमच्या माहितीत असेल तर त्याची आणि आमची भेट घालून द्या.'' म्हणजे काय स्वामीजी? बाईने गोंधळून विचारले. म्हणजे ज्या वंशात भगवंतांनी जन्म घेतला राम आणि कृष्ण, ज्या वंशाच्या दिव्यासाठी कृष्णाने कांही काळ गर्भवासात प्रवेश करून ब्रह्मास्त्रापासून उत्तरेच्या गर्भातील परिक्षिताचे रक्षण केले असा वंश पुढे चालला नाही तर मग बाई तू स्वत:ला अशी काय समजते की तुझा वंश चालला पाहिजे आणि मग त्या गृहस्थाकडे बघुन स्वामीजी म्हणाले, ''तुम्ही शिक्षित आहात, सरकारी नोकरीत आहात. आता वय काय तुमच?'' '४५'. ''बर समजा याच वर्षी तुम्हाला मुलगा झाला तर त्यावेळी तुम्ही ४६ चे असाल नाही का?'' 'हो'. ''आणि ५८ व्या वर्षी रिटायर होणार त्यावेळी तुमचा मुलगा फक्त दहा-बारा वर्षाचा असेल बरोबर?'' 'होय स्वामीजी' तुम्ही कायस्थ परिवाराचे लोक. तुमच्यात मुलीच्या लग्नात काय खर्च येतो याची आम्हाला कल्पना आहे. तुमच्या या चार कन्येचे लग्न करता-करता तुमचा प्रॉव्हिडंड फंड, ग्रॅज्युईटी जे काही असेल ते संपून जाईल. कदाचित डोक्यावर थोडेफार कर्ज व्हायची पण शक्यता राहिल आणि पुढचे आयुष्य तुम्हाला पेंशनवर काढावे लागेल. (त्या काळात पेन्शनची रक्कम फार मोठी नसायची) त्या पेन्शनमधून कसेबसे घर चालेल, मग मुलाचे शिक्षण? त्यासाठी रिटायर झाल्यावर पण नोकरी शोधाल आणि घाण्याच्या बैलासारखे दुसरी बारा वर्षे म्हणजे मुलगा शिकून नोकरीला लागेपर्यंत, संसाराचा घाणा फिरवितच राहाणार. शांती नाही, विश्रांती नाही. स्वत:चे शरीर थकले असेल तरी मिळेल ती नोकरी करत वयाच्या कमीत कमी सत्तर वर्षाचे होईपर्यंत काम कराल. त्यानंतर मुलाचे शिक्षण होऊन मुलगा नोकरीला लागेल पण स्वभावाने चांगला निघाला नाही तर? तुम्हालाच घराबाहेर काढले तर? उद्याचे कोणी बघितले? आणि न करे नारायण पण दुसरी एक शक्यता मुलगा शिकून मोठा होईपर्यंत तुमचे तेवढे आयुष्य नसेल तर? मृत्यु पण शांतीने येणार नाही. मुलाकडे पाहून तडफडत म्हणाल, याला जन्माला तर घातल पण त्याच्यासाठी काही करता आले नाही. भविष्याच्या या सर्व शक्यता लक्षात घ्या. का 'मुलगा हवा' या हव्यासात स्वत:च्या पायावर कुऱ्हाड मारता? त्यापेक्षा चार मुलींपैकी कोणत्यातरी मुलीसाठी जो अनाथ असेल, गरीब असेल असा मुलगा शोधून त्याला घरजावई म्हणून ठेवून घ्या. त्यालाच मुलगा मानून घ्या.

हे सगळं ऐकून त्या गृहस्थाने स्वामीजींना सांष्टांग नमस्कार घांतला. तुमची आज्ञा शिरसावंद्य स्वामीजी. म्हणाला खरे सांगू स्वामीजी, मी स्वत: कधीच असा विचार केला नव्हता. न दुसऱ्या कोणी माझ्या हे लक्षात आणून दिले. पहिल्यांदाच आपण भेटलात असे नीट समजून सांगणारे. तुमचा शब्द न शब्द खरा आहे स्वामीजी. इतक्या दूरचा मी विचारच केला नव्हता. मी माझ्या पत्नीला पण हे सगळ पुन्हा नीट समजून सांगेन. आता हा विषय कायमसाठी बंद.

मार्गदर्शक असावा तर असा! नाहीतर फक्त भागवत, रामायण, महाभारत यावर प्रवचन करणारे पायलीचे पन्नास आहेत. त्यांचे ते प्रवचन ऐकून फक्त पुराणातल्या गोष्टी कळतात. त्यांचे ते उपदेश मार्गदर्शन म्हणजे आळवावरचे पाणी, जगण्याचे खरे सूत्र सांगत नाहीत. स्वामीजी याच गोष्टींचे तारतम्य साधुन लोकांना भ्रमातून काढून जीवन जगण्याचा खरा कानमंत्र सांगतात. प्राप्त परिस्थिती स्विकारण्याचे धाडस प्रत्येकात यावे यासाठी योग्य शब्दात कारणमीमांसा करण्याचे कौशल्य त्यांच्याजवळ आहे.

३. स्वामीजींचे स्वामीपण

आपणा सर्वांना ठाऊकच आहे की, गेल्या वर्षी म्हणजे २०१९ ला सांगली-नृसिंहवाडीला महापूर आला होता. खूप नुकसानही झाले होते. पूर ओसरल्यावर स्वामीजी त्या भागात राहणारे शिष्य आणि श्रद्धेने जुळलेल्या लोकांची विचारपूस करायला गेले. अतिवृष्टी झाल्याने तेथील हवा कांहीशी रोगटच झाली होती. स्वामीजी तेथून उमदीला जाऊन आश्रमावर परतले तेव्हा त्यांना खूपच खोकला येत होता. मी स्वामीजींना म्हणाले, मागे तुम्हाला एकदा असाच खोकला झाला होता तेव्हा आपण अंबेजोगाईला होतो. तेथे मी तुम्हाला डाळींबाचा रस टरफलासह पाजला होता दोन-तीनदा. त्याने तुम्हाला लागलीच फरक पडला होता. डाळींब मागावायची का? गुरूमाऊली माझ्याकडे पहात म्हणाली, सरू आम्ही स्वामीजी-संन्यासी, स्वत:साठी खाण्यापिण्याची कोणतीही वस्तू विकत घेत नाही तुला ठाऊक आहे ना! ते आमच्या नियमात बसत नाही. संन्याशाला पैशांचा व्यवहार कशाला? संन्यासाने फार तर भिक्षा मागावी ती पण भोजनाची. आम्ही आमच्यासाठी कांही विकत आणणार नाही. गुरूमाऊलींच्या स्वभावाशी मी चांगलीच परिचित असल्याने हे माहित झाले होते की ते त्यांचे ब्रीद पाळण्यात कधीच धरसोड करत नाहीत. हे मी माझ्यासाठी किंवा आश्रमातील इतर कोणासाठी मागवायला सांगितले असते तर स्वामीजींनी अगदी सहजतेने किंचित पण आढेवेढे न घेता आनंदाने मागवुन घेतले असते, पण स्वत:साठी नाही. हे मी प्रवासात देखील पाहिले आहे की स्वामीजी ना स्वत:साठी चहा विकत घेत ना इतर वस्तू. पाणी संपले तरी ते तशीच तहान सहन करून बसुन राहतील पण पाण्याची बाटली विकत घेणार नाहीत. स्वामीजींसोबत प्रवास करतांना मी हे अनेकदा डोळ्यांनी पाहिलं आहे हे त्यांचे स्वामीपण. डाळींब आणण्यास गुरूमाऊलीने स्पष्टपणे नकार दिल्यावर मी गप्प बसले. त्यादिवशी एकादशी होती. एक साधिका दर एकादशीला खडीसाखर व नारळ घेऊन दर्शनाला येते. त्यादिवशी पण दर्शनाला आली पण काय आश्चर्य! तिच्या हातात त्या दिवशी ना खडीसाखर होती ना नारळ.. तीन डाळींब होती. मंदीरात डाळींब ठेऊन तिने प्रणाम केला. डाळींब पाहून माझा गहिवर दाटुन आला. मनात म्हटले, ''माँ किती काळजी करतेस ग आपल्या लेकराची?''असे प्रसंग नेहमी घडतच असतात हा एक वानगी दाखल दिला.

तरसाड्यात आश्रम बांधून स्वामीजी नुकतेच आश्रमात राहायला आले होते तेव्हाची ही गोष्ट : एके दिवशी गावातील एक दरबार (येथे क्षत्रिय समाजातील लोकांना दरबार म्हणतात) आर्थिकरित्या संपन्न, जरा अहंकाराने स्वामीजींना म्हणाला, स्वामीजी तुम्हाला कांही लागले तर नि:संकोचपणे मागुन घेत जा. स्वामीजी त्याला म्हणाले, कोणी तुमच्या दाराशी येऊन मागावे असे तुम्हाला वाटत असेल आणि त्यांना तसे देण्यात तुम्हाला मोठेपणा वाटत असेल तर असे करा ४-५ भिकारी गावाबाहेर आणुन बसवा. ते रोज येतील तुमच्या दाराशी. आम्ही स्वामीजी आहोत. खरे तर अवधुत. हात पसरणे आमच्यासाठी अशक्यप्राय आणि एक गोष्ट लक्षात ठेवा, आम्ही कोण काय हे तुम्हाला अजून कळणार नाही. कदाचित कधीच कळणार पण नाही. परंतु भविष्यात एखादी वस्तू तुम्ही स्वत:हून दिली आणि आम्ही ती घेतली तर असे समजू नका की ती देऊन तुम्ही आमच्यावर उपकार केले उलट आम्ही ती स्वीकारली तर तुमच्यावर कृपा केली असे समजा. यावरून मला समर्थ रामदासांचे वचन आठवले. आम्ही कुणाचे काय खातो रे तो राम आम्हाला देतो रे।

आधीच्या निस्पृहता या लेखातून आपल्या वाचण्यात आले असेलच की, स्वामीजींचा एक नियम आहे अपरिचित व्यक्तीची सेवा स्विकारायची नाही. कुठलाही नियम घेणे सोपे आहे पण तो कटाक्षाने पाळणे तेवढेच कठीण. ती महामाया कधी आणि कशा रीतीने मोहात टाकून परिक्षा घेईल सांगता येत नाही. एके दिवशी कोल्हापूरहून टेलिफोन खात्याचे जी.एम. श्री. प्रभाकर पाटील आश्रमावर आले. त्यांची व स्वामीजींची ती

पहिलीच भेट. स्वामीजी बाहेर ओट्यावर बसले होते. थोड्यावेळाने ते गेले. नंतर काही वेळाने स्वामीजी आत आले आणि पाहिले तर मंदिरात काही रक्कम ठेवली आहे. स्वामीजींच्या लक्षात आले की हे पैसे मघाशी येऊन गेलेल्या प्रभाकर पाटीलने ठेवले असावेत. स्वामीजींनी लागलीच आश्रमाचे एक साधक किराणा दुकानदार श्री. लालजीभाईंना फोन करून बोलवले. त्यांना मंदिरातील रक्कम उचलून ती मोजायला लावली. अकरा हजार रूपये होते. स्वामीजी म्हणाले, आश्रमाशी संबंधीत मढी गावातील एक परिवार नोकरी गेल्यामुळे आर्थिक अडचणीत आहे, त्यांना त्या पैशातून वर्षभराचे डाळ, तांदुळ, तेल घेऊन द्या. यापेक्षा जास्त खर्च झाला तर आश्रमातून दिला जाईल.

माया त्यालाच ठगवु शकते जो मायेच्या आधीन होतो.

जो महामायेच्या शरणी गेला त्याला माया कसे विचलीत करणार..?

वर 'निस्पृहता' या लेखात सतलासाणा हायस्कूलचा उल्लेख आहे. आंबाघाट्याला स्वामीजींचे गुरूबंधू सुधानंद राहतात. तो आश्रम तेच सांभाळतात. स्वामीजी आंबाघाट्याला गेले असतांना त्यांना म्हणाले, सुधानंद उत्तर गुजरात भागातील सगळेच साधक आंबाघाटा आश्रमावर येतात. सतलासाणा हायस्कूलच्या नवीन इमारतीचे काम चालू आहे आणि त्यात प्रार्थना खंडासाठी बाबांचे नांव द्यावे असे आम्हास वाटते. त्यासाठी पाच लाख रूपये द्यायचे आहेत. बाबांचे उत्तर गुजरातचे सगळे दिक्षित साधक व इतर लोक येथे येतात, आपण त्यांच्यांशी चर्चा करा. अडीच लाखाची व्यवस्था होते का पहा, त्यावर सुधानंदजी उत्तरले, अडीच लाख म्हणता येथे तर अडीचशे रूपये पण येत नाहीत. मग त्यांनी अमुक एक दोन संपन्न साधकांचे नांवे घेत म्हटले, महिन्यातून एकदा आले तर पन्नास रूपये ठेवायला पण त्यांना जड जातात. स्वामीजी सुधानंदला म्हणाले, तुम्ही कां अपेक्षा करता? का त्यांच्यापुढे हात पसरता?

तुम्हाला एक गोष्ट सांगतो औरंगजेबाच्या दरबारात एक ब्राह्मण तलाठी (त्यावेळी तलाठ्याला कुलकर्णी म्हणायचे) चाकरीला होते. एके दिवशी सकाळी ते रामभक्त ब्राह्मण रामाच्या पुजेची तयारी करीत होते आणि बादशहाचा दूत निरोप घेऊन आला. बादशहांनी आत्ताच बोलविले आहे. तसा हुकूम आहे बादशहाचा. देव ताम्हणात मूर्ति काढून ठेवलेली. पूजा अभिषेक अजुन सुरू व्हायचा होता. वेळ पण बराच लागणार होता आणि बादशहाचे फर्मान आले. ते चरफडत तसेच उठून गेले. त्याचवेळी औरंजेबाला भेटायला दुसऱ्या कोणी राजाचा दूत आला असल्याने बादशहाने त्याच्याकडे लक्ष दिले नाही. दोन-तीन तास नुसते उभे करून ठेवले आणि सांगितले तू आता जा नंतर बोलवतो. मनातल्या मनात चरफडत तो ब्राह्मण घरी आला. मनात तीव्र विषाद, ग्लानी बादशहाची नोकरी म्हणून हातातली पूजा सोडून जावे लागले. खूप मानसिक यातना. शेवटी मनाशी एक निर्णय घेतला. या घटनेनंतर कांही वर्षांनी औरंगजेब बादशहाला कोणी सांगितले यमुनेच्या किनारी कोणी हिंदू 'अवलिया' आला आहे. खूप लोक दर्शनाला जात आहेत. हिंदुद्वेष्टा औरंगजेबाला संधी मिळाली. तो स्वत:च गेला यमुनातीरी परीक्षा घ्यायला बघीतले की एक संन्यासी वाळुवर शांतपणे पहुडले आहेत. कुणाकडेही त्यांचे लक्ष नाही. औरंगजेबाने त्यांच्याकडे निरखून बघितले लक्षांत आले अरे हा तर आपल्या दरबारातील कुलकर्णी. औरंगजेबाला वाटले मी याचा बादशहा मला बघुन उठून बसेल, पण संन्याशाने लक्षच दिले नाही. औरंगजेबाने खोचक शब्दात विचारले, ''क्यो पंडितजी कबसे पैर फैलाये ?'' ते उत्तरले ''जबसे हाथ फैलाना छोड दिया!'' ही कथा सांगून स्वामीजी सुधानंदाना म्हणाले, सुधानंद तुम्ही हात पसरविण्याचे काम बंद करा. जे मागायचे ते माँ भगवतीजवळ मागा, बाबांजवळ मागा. कोणा व्यक्तीकडे नाही. ते संन्यासधर्माला शोभत नाही. स्वामीजींनी सतलासणाच्या पायाभरणी समारंभात पाच लाख देण्याचे जाहीर केले आणि पुढच्या महिन्याभराच्या काळात ती रक्कम गोळा झाली. हे घडले यात काय नवल! प्रसिध्द उक्ति आहेच

तन्मे मन: शिवसंकल्प मऽस्तू ।

४. कुशल सोनार

आपल्याकडे अशी एक म्हण आहे, ''सोनारानेच कान टोचलेले बरे.'' याचा अर्थ जो उपदेश एका विशिष्ट माणसाने केला तरच समोरच्या व्यक्तीवर त्याचा योग्य तो परिणाम होतो. अन्यथा 'नळी फुंकले सोनारे इकडून तिकडे गेले वारे' असे कांहीसे होते. ही गोष्ट तर लहान मुलांच्या संदर्भात, शिशु संदर्भात आहे. सोनाराकडून कान टोचून घ्यायचे त्यासाठी स्वत:हून सोनाराकडे जावे लागते. वयाने बाल नाही पण बुद्धीने बालबुद्धीचे खूप लोक असतात आणि अशांचे कान त्यांना न दुखवता किंवा त्यांच्या लक्षात त्यांची चूक आणून देऊन त्यांना ती स्विकारावी लागेल अशा पध्दतीने कान टोचणारे सोनार विरळच. स्वामीजी अशा विरळ पण कुशल सोनारांपैकी एक.

बरे झाले स्वामीजी तुम्ही येथेच भेटलात नाहीतर मी संध्याकाळी आश्रमावर येणार होतो तुम्हाला भेटायला. समोर उभा होता छपरा शहरातील एक प्रतिष्ठित तरूण व्यापारी. त्या काळात(१९८०-८१) लखपती माणूस (आजच्या करोडपती पेक्षाही जास्त). स्वामीजींनी विचारले, ''का काय विशेष?'' विशेष असे की मी उद्या माझ्या घरी अष्टयाम ठेवला आहे त्याचे निमंत्रण द्यायला. बिहारमध्ये विशेषत: छपरा व आजुबाजूच्या परिसरात अष्टौयाम करण्याची प्रथा आहे. 'याम' म्हणजे प्रहर अष्टौयाम म्हणजे 'अष्टौप्रहर' म्हणजे २४ तास नामसंकीर्तन. उद्या सकाळी आठला 'श्रीराम जयराम जयजय राम' हे नामसंकीर्तन चालू होईल. ते परवा सकाळी आठपर्यंत. त्यानंतर हवन. मग भोजनप्रसाद-भंडारा आसपासच्या गांवातून पण काही किर्तनमंडळी बोलविली आहेत. काही साधू-संन्यासी पण येणार आहेत. तो तरूण व्यापारी म्हणाला, स्वामीजी तुम्ही उद्या मुक्कामालाच या आणि परवा भोजनादी प्रसाद ग्रहण करून मगच जा. अरूण गुप्ता नांवाचा तो व्यापारी हे सगळे स्वामीजींना आनंदाने सांगत होता. 'आता येथेच सांगितले तेवढे पुरेसे की आश्रमावरच आले पाहिजे सांगायला?' स्वामीजी म्हणाले, 'ठिक आहे आम्ही तुझ्या घरी आवश्य येऊ, पण...'' ''पण काय स्वामीजी?'' ''अरूण तुला तर माहित आहेच की आम्ही संन्यासी जेवणासाठी, कार्यक्रमासाठी कोणी निमंत्रण दिले की दक्षिणा द्यावी लागते.'' त्यात काय सांगायचे देणारच आहे सगळ्यांना. बाकीच्या साधुसंतांपेक्षा जास्तच देईन तुम्हाला. स्वामीजी म्हणाले, ''नाही अरूण आम्हाला जी दक्षिणा पाहिजे ती तू देऊ शकणार नाहीस.'' स्वामीजींना मध्येच अडवत अरूण म्हणाला, बोला किती पाहिजे? पैसेवाल्याचा अहंकार लवकर दुखावतो. चुकीचे विचारले अरूण किती पाहिजे नाही काय पाहिजे ते विचार. अरूण थोडा गोंधळला. त्याला वाटले स्वामीजींना कांही किंमती वस्तू हवी असेल. बोला काय हव? तुम्हाला हवे ते देईन. नाही अरूण तू देऊ शकणार नाहीस. आमचा शब्द खाली पडण्यापेक्षा न सांगितलेले बरे. स्वामीजींनी अरूणला मुद्दाम डिवचले. आता तर अरूणचा अहंकार चांगलाच दुखावला. मागून तर बघा काय हवे ते. मी तुम्हाला वचन देतो हवे ते देईन. स्वामीजी म्हणाले, ''मग ठिक आहे. आम्हाला तुझ्या आई-वडिलांबरोबर एका पंक्तीत जेवायचे आहे. अरूणच्या डोळ्याला डोळा भिडवत स्वामीजी म्हणाले, अरूणने खाली मान घातली.

स्वामीजींचा त्याच्या आईवडीलांशी तर खूपच निकटचा, जिव्हाळ्याचा संबंध. अरूणशी पण चांगले संबंध आणि त्यामुळे स्वामीजींना हे माहित होतेच की, अरूणचे त्याच्या आईवडिलांशी इतके बिनसले आहे की, वर्षभरापेक्षा अधिका काळ उलटला असेल एकमेकांशी बोलणे तर दूरच, एकमेकांचे तोंड देखील बघत

नव्हते. स्वामीजी पण व्यथित होते. दोघांना एकत्र कसे आणावे स्वामीजींनाही सुचत नव्हते. दोन्ही लोक जिद्दी. कशामुळे आपसात एवढे वैर झाले हे दोन्ही पक्ष कधीच काहीच बोलत नव्हते. अशा पार्श्वभूमीवर स्वामीजींना आयती संधी मिळाली. त्यांनी ती नेमकी साधली. अरूण खाली मान घालून सुंभासारखा उभा होता. त्याच्या खांद्यावर हात ठेवत स्वामीजी त्याला प्रेमाने म्हणाले, ''अरे वडिलांच्या वचनपूर्तीसाठी ज्याचा उद्या राज्याभिषेक होणार आहे तो राम एक ब्र शब्द न बोलता चौदा वर्ष वनवासात गेला. त्या रामाचे तू संकीर्तन करणार. २४ तास कशासाठी? दोन पैसे बाळगुन आहेस म्हणून, लोकांमध्ये वाहवा व्हावी म्हणून, बाहेरचे हजार लोक जेवणार, साधु संन्यासी जेवणार आणि तुझ्या घरापासून पाचव्या घरात राहाणारे तुझे आईवडील ते या कार्यक्रमाला नसतील. त्यांना तर हे सगळं कळणारच. लाऊडस्पीकर वरून किर्तन त्यांच्या कानावर पडणारच. तुझे २४ तासांचे किर्तन, त्यांची २४ तासांची पीडा, जीवघेणी घालमेल, काय मिळवणार तू हे नामसंकीर्तन करून? तुला असं वाटत या नामसंकीर्तनामुळे तो पितृभक्त पितृआज्ञापालक राम खुश होईल? ज्याचे नामसंकीर्तन तोच दुःखी होईल. तुला काय मिळणार पुण्य? मिळेल तर फक्त खोटी प्रतिष्ठा, वाहवा! जाऊ दे तुला जे योग्य वाटेल ते कर. पण आमची दक्षिणा द्यायची तुझी हिंमत झाली तर उद्या सकाळी घ्यायला कोणाला तरी पाठव नाहीतर आम्ही येणार नाही.'' आश्रमात परतल्यावर स्वामीजींनी गुरूमहाराजांना हे सगळे सांगितले. गुरूमहाराजांना पण फार आनंद झाला म्हणाले, ''बहोत अच्छा काम किया सविता तुने!'' (बाबा बहुधा सवितानंद न म्हणता सविताच म्हणायचे) दुसऱ्या दिवशी सकाळी अगदी सातच्या आधीच अरूण स्वत:च आश्रमावर आला रिक्षा घेऊन. त्याचे ते सुजलेले, लालबुंद झालेले डोळे पाहूनच लक्षात आले काय घडले असेल ते. तो बाबांजवळ गेला, डोळ्यात अश्रुधारा. बाबांनी त्याला प्रेमाने जवळ घेऊन थोपटले, शांत केले आणि स्वामीजी त्याच्याबरोबर रिक्षात बसून त्याच्या घरी गेले. दारातच त्याचे आईवडील अश्रुभरल्या डोळ्यांनी स्वागतासाठी उभे होते. एक तुटलेला परिवार, विखुरलेले कुटुंब एकत्र आले. आई-बाप-लेकाचे पुर्नर्मिलन झाले आणि स्वामीजींचा उपदेश सार्थकी लागला. संत तुलसीदास म्हणतात ना, ***संतहृदय नवनीत समाना कहा कवीपर कहा न जाना। निजताप द्रवही नवनीता। परदुःख द्रवही संत पुनीता।।***

चला आता दुसरी घटना पाहू. स्वामीजी पायी प्रवासात असतांना रांचीला पोहोचले. गांवाच्या बाहेरच माँ चे मंदिर. स्वामीजी आत गेले. माँ चे दर्शन घेतले. वेळ अजून सकाळचीच होती. संध्याकाळपर्यंत चालायचे मग सूर्यास्तानंतर येईल त्या गावात मुक्काम असा दिनक्रम. पण त्या दिवशी अंग दुखत होते. खोकला होताच, हलका ताप पण. त्यामुळे अंगात त्राण देखील नव्हते. माँ च्या मंदिरातील पुजाऱ्याने स्वामीजींची विचारपूस केली. जगन्नाथपुरीची पायी यात्रा करीत असल्याचे कळाले आणि त्या सज्जन सुजाण पुजाऱ्याच्या लक्षात आले की स्वामीजींची तब्येत ठीक नाही. त्यांना विश्रांतीची गरज आहे. त्यांचे हे बोलणे चालू असतांना दर्शनासाठी आलेले वृद्ध लोक पण तेथे थांबले. पुजारी म्हणाला, तुम्ही येथे मंदिरातच थांबा. चार आठ दिवस विश्रांती घ्या, तब्येत ठीक झाल्यावर मग पुढचा प्रवास करा. स्वामीजी म्हणाले, पायी प्रवासात एके ठिकाणी जास्तीत जास्त तीन दिवस राहता येते. पुजारी म्हणाला, ठिक आहे पुढचे पुढे बघु. तीन दिवस तर थांबा. स्वामीजी म्हणाले, आमच्या भोजनपाण्याचा तीन दिवस कोणा एकाच कुटुंबावर भार पडावा हे आम्हाला योग्य वाटत नाही. पुजाऱ्याचे आणि स्वामीजींचे बोलणे ऐकून उभे असलेले लोक म्हणाले, त्यात काय मोठेसे. आम्ही आहोत ना सहाजण. एकाकडे दुपारी एकाकडे रात्री. त्यांनी आपसात ठरवून घेतले. दुसऱ्या दिवशी भोजन करून स्वामीजी मंदिरात परतले. संध्याकाळच्या सुमारास एक ब्राह्मण आला त्याच्याकडेच उद्याचे भोजन होते. तो त्या संदर्भातच विचारण्यासाठी आला आणि म्हणाला, स्वामीजी आज कोणाकडे जेवलात? यावर स्वामीजी उत्तरले येथे आम्ही कोणाला ओळखतच नाही, कसे सांगू कोणाकडे जेवलो ते? आम्ही नांव गांव पण विचारत नाही

कुणाला. तो म्हणाला आज दुपारी तुमच्याबरोबर चालत येत तुम्हाला मंदीरात पोहोचवायला आले ते? होय त्यांच्याकडेच! काय जेवलात? वरणभात भाजी पोळी. ते ऐकून तो ब्राह्मण भडकलाच. काय? तो तर दरबार आहे. (क्षत्रिय) त्याच्या घरी वरणभात भाजी पोळी खाल्ली! तुमच्यासारख्या लोकांमुळे धर्म भ्रष्ट होत आहे. साधुसंन्यासी ब्राह्मणांनी गृहस्थाकडे का तर स्वत:च्या हाताने स्वयंपाक करून जेवावे का तर पक्की रसोई खावी. पक्की रसोई म्हणजे ज्यात पाण्याचा अंश राहात नाही. भजी, पुरी, शिरा वगैरे. दोन तीन वर्षापासून स्वामीजी बिहारमध्ये रहात असल्याने तेथील ब्राह्मणांची मानसिकता स्वामीजींना चांगली माहित झाली होती. त्यामुळे त्याच्याशी वाद घालण्यात अर्थच नव्हता. त्यानंतर थोड्या इतर गप्पा झाल्या. तेवढ्यात त्या ब्राह्मणाने खिशातून प्लॅस्टिकच्या कागदात गुंडाळलेला पानाचा विडा काढला, तोंडात टाकला. स्वामीजी म्हणाले, तुम्हाला पानाचा शौक दिसतो. हो स्वामीजी तुम्हाला विडा हवा? अजून एक-दोन आहेत खिशांत. नको आम्हाला नको आहे, पण तुमच्या या पानाच्या विड्याच्या व्यसनामुळे तुम्हाला कायम खिशात विडे ठेवावे लागत असतील. हो स्वामीजी. घरून निघतांना दोन-चार विडे तयार करून सोबतच घेऊन निघतो. अच्छा आम्हाला सांगा वाराणसी, प्रयाग, विंध्याचल, जगन्नाथपुरी कधी यात्रेला गेला आहात? ब्राह्मण उत्साहाने म्हणाला, हो ना. मग रेल्वेने एवढ्या लांबचा प्रवास करतांना विड्याचे काय करता? अहो स्वामीजी प्रत्येक स्टेशनवर मिळतोच की, होय आम्हाला तेच म्हणायचे आहे. आता आम्हाला फक्त एवढेच सांगा की त्या विड्यासाठी चुना कात तुपात भिजवलेला असतो? पाण्यातच भिजवलेला असतो ना! आणि तो पानवाला कोणत्या जातीचा हे विचारता त्याला? तो हिंदू आहे की मुसलमान हे विचारता? त्याने दोन-चार दिवसापासून आंघोळ तरी केली आहे का तेही माहित नाही. त्याला सुतक आहे का तेही माहित नाही. त्याच्या घरच्या पाण्यात भिजवलेला चुना काताचा विडा तुम्हाला चालतो. तेथे तुमचा धर्म भ्रष्ट होत नाही आणि एखादा दरबार गृहस्थ प्रेमाने घरी बोलवतो, स्वयंपाक घर गाईच्या शेणाने सारवतो, आंघोळ करून सकाळपासून घरच्या स्त्रीया स्वयंपाक करतात, त्या स्वयंपाकाने तुमचा धर्म भ्रष्ट होतो. काय हे तुमचे पाखंड. तुमच्या या पाखंडामुळे हिंदुधर्माची केवढी हानी झाली आणि होत आहे याचे भान आहे का तुम्हाला? तो ब्राह्मण तर अगदी सुन्न झाला, लज्जेने खाली मान घातली. उद्या येतो असे सांगून निघुन गेला. दुसऱ्या दिवशी त्याच्याकडे स्वामीजी जेवायला गेले. त्याने कालच्या गोष्टीबद्दल क्षमा मागितली. म्हणाला, आपण डोळ्यात चांगले अंजन घातले. मी आजपासूनच पान खाण्याचे सोडले आणि कोणत्याही हिंदूकडे जातांना पक्क्या रसोईची अपेक्षा करणार नाही. वरणभात, भाजी, पोळी खाईन मग तो कोणीहीअसो.

असाच अजून एक प्रसंग. आंबाघाटा आश्रमावर विहीर खोदण्याचे काम चालू होते. पैशांची तर अडचण होतीच पण स्वामीजींच्या अयाचक वृत्तीमुळे हात पसरणे कधी जमलेच नाही. कोणी आश्रमावर आले त्यांनी पाहिले स्वत:हून काही दिले तर ठिक. एके दिवशी चाणस्म्याहून स्वामीजींच्या ओळखीचे एक वकिल मनोजकुमार पटेल आले. सगळी परिस्थिती त्यांच्या लक्षात आली आणि ते म्हणाले, स्वामीजी पुढच्या आठवड्यात तुम्ही चाणस्म्याला या. तेथील गंज मार्केटमध्ये म्हणजे अन्नधान्याची जेथे खरेदी-विक्री होते तेथे कांही व्यापारी माझे अशील आहेत, पटेल आहेत उदार आहेत. मी शब्द टाकल्यावर देतील. आपण प्रत्येकाकडून फक्त रूपये ३५१/- घ्यायचे. विहीरीचे बांधकाम महाराष्ट्रात करतात तसे दगडविटांनी न करता, लोखंडाच्या सळ्या आणि सिमेंटने करतात. आपण तसे करूया. स्वामीजी मनोजकुमारबरोबर चाणस्म्याच्या मार्केटमध्ये गेले आणि खरेच सुरूवातीच्या ५/६ जणांनी कांही न बोलता पटापट रूपये ३५१/- रू. दिले. बोलायचे काम मनोजकुमार क्वचितच करीत होते. स्वामीजींनी मनोजकुमारला म्हटले पण की, हीच तर माँ ची लीला आहे.

पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना पुढे एका व्यापाऱ्याकडे गेलो. मनोजकुमारांनी आधीच्याप्रमाणे सगळे व्यवस्थित समजून सांगितले. त्यावर तो व्यापारी उत्तरला, ''काय मनोजकुमार तुम्ही काहीही घेऊन येता त्यापेक्षा या मार्केटमध्ये कुलर लावा. सगळ्यांना छान थंड पाणी मिळेल. त्यासाठी मी पैसे देतो. कुठे चाणस्मा कुठे आंबाघाटा. मला कोठे तेथे पाणी प्यायला जायचे आहे की मी तेथल्या विहिरीसाठी पैसे देऊ? त्याचे हे अनपेक्षित उत्तर ऐकून मनोजकुमार चकितच झाले. त्यांना थोडे अपमानित झाल्यासारखे वाटले, राग पण आला. स्वामीजींना म्हणाले, चला स्वामीजी उठा. स्वामीजींनी त्यांना इशारा केला बसा. त्यांना कळेना की कशाला बसायला सांगितले. त्याने एवढे स्पष्ट उत्तर दिले त्याच्याकडून आता कांही अपेक्षाच उरली नव्हती. स्वामीजींनी त्या व्यापाऱ्याशी वेगळ्याच विषयावर म्हणजे त्याच्या व्यापार धंद्याबद्दल बोलायला सुरूवात केली. विहीरीचा विषय सोडून गप्पा थोड्या रंगल्या. मनोजकुमार चुळबूळ करत होते. स्वामीजींनी त्यांना डोळ्यांनी इशारा करून शांत बसायला सांगितले व त्या व्यापाऱ्याला विचारले, ''तुमचा व्यापार येथे फक्त मेहसाणा, अहमदाबादपर्यंतच की अजून कोठे? ''स्वामीजी माझा माल थेट दिल्लीपर्यंत जातो.'' तो व्यापारी उत्तरला. कमाल आहे तुम्हा लोकांची. खरे व्यापारी तुम्ही. एकमेकांवर विश्वास ठेऊन लाखो रूपयाच्या उलाढाली फोनवर, फक्त शब्दावर चालतात, व्यापारी खूश. ''का हो दिल्लीहून वेळेवर पैसे येतात की कधी जावे पण लागते उधारी वसूल करायला?'' ''स्वामीजी केवळ उधारीसाठीच नाही व्यापाराचे क्षेत्र अजून वाढविण्यासाठी, इतर कामासाठी वर्षातून माझे दोन-तीनदा तरी जाणे होते.'' अच्छा कार घेऊन जाता का? ''छे हो स्वामीजी एवढी चांगली रेल्वे आहे ना मेहसाणा-अहमदाबाद..!'' ''त्यांत तर तुमचा दिवस वाया जात असेल?'' होय स्वामीजी मार्केट बंद असेल त्या दिवशी जातो. चोविस तासापेक्षा अधिक वेळ जातो. त्या व्यापाराला तर सुतराम कल्पना नाही की स्वामीजी आपल्याला कात्रीत पकडत आहेत म्हणून. स्वामीजींनी आता आपला आवाज धारदार करीत म्हटले, येथून दिल्लीला जातांना आणि तेथून परत येतांना रस्त्यावर तुम्ही जेथे पाणी पितात त्या विहिरी तुमच्यासाठी तुमच्या बापानेच बांधून ठेवल्या असतील नाही का? 'बापाचा उध्दार' होताच तो व्यापारी चमकला, त्याची घाबरगुंडी उडाली. आता स्वामीजी त्याला कांही संधी न देता म्हणाले, कोण कुठले गांव, कुठले स्टेशन तेथे मिळते ते पाणी. कोणी बांधल्या तेथे विहिरी? ते पाणी पिताना तुम्हाला लाज वाटत नाही. त्यावेळी विचार करीत नाही. मी तर या विहिरी नाही बांधल्या, माझ्या बापाने पण नाही बांधल्या. दुसऱ्या कुणीतरी बांधलेल्या विहिरीचे पाणी पिता आणि वर मला कुठे जायचे आहे आंबाघाट्याला पाणी प्यायला असे विचारता. नाही का? कां नाही विचार केला की जसे तुम्ही दुसऱ्यांच्या विहिरीचे पाणी पिता तसे तुम्ही बांधलेल्या विहिरीवर दुसरा कोणी पाणी पिईल.. ''माफ करा स्वामीजी चुकलं माझं.'' घ्या वकिलसाहेब हे पैसे'' 'नको आहेत'. स्वामीजी कडक आवाजात उत्तरले. मनोजकुमारांना इशारा केला उठण्याचा. व्यापारी गयावया करत मनोजकुमारना म्हणाला, ''घ्याना साहेब...'' आता स्वामीजींनी नाही म्हटल्याने माझा इलाज नाही. मनोजकुमार उत्तरले. तेथून निघाल्यावर मनोजकुमार म्हणाले, मी स्वत: वकिल असून मला हे सुचले नाही. चांगली कान उघडणी केली आपण. एखाद्या सोनारापेक्षा असे कान टोचले की हे त्याच्या आता आयुष्यभर लक्षात राहिल.

ज्यांनी स्वत:साठी कुणाकडून काही अपेक्षा केली नाही तेच असे निर्भिडपणे बोलू शकतात. समाजातल्या अशा काही अतीशहाण्या लोकांना धोपट मार्ग काही कामाचा नाही. त्याचा तुटलेला हात त्याच्याच गळ्यात पडला पाहिजे आणि तसे करण्याचे वाक्‌चातुर्य स्वामीजींना चांगलेच अवगत आहे.

स्वामीजी राजस्थानच्या प्रवासात बांदेकुईला मुक्कामाला होते. तेथे एका वैष्णव साधुने स्वामीजींपुढे बीडीचे बंडल धरले. स्वामीजी म्हणाले, ''आम्ही बीडी-सिगारेट पित नाही, पण जर तुम्ही याचे फायदे समजून

सांगणार असाल तर मग अवश्य पिऊ.'' साधु उत्तरला भगवान शंकर गांजा पीते है तो हम लोगों को बीडी पीने मे क्या हर्ज है?'' स्वामीजींनी विचारले, भगवान शंकराची चिलीम भरायला तुम्ही स्वत: कधी गेला होता? दुसरे असे सांगा, गांजा ही वस्तू भौतिक म्हणजे पृथ्वीवरील की स्वर्गात पण उगवते, की भगवान शंकर गांजा पिण्यासाठी शिवलोकातून पृथ्वीवर येतात?'' त्यावर तो म्हणाला, ते मला माहित नाही पण हा बघा सुखसागर ग्रंथ, भागवतावरील हिंदी टीका. त्यात असे लिहिले आहे. स्वामीजी शांतपणे म्हणाले, तो ग्रंथ समुद्रात बुडविल्याने हिंदुधर्माचे कांहीही नुकसान होणार नाही. आपल्या अनेक ग्रंथात काळाच्या ओघात अशी अनेक अनर्गल गोष्टींची भेसळ केली गेली आहे. विवेकी माणसाला त्या गोष्टी वाचून त्रास होईल अशा या गोष्टींना 'प्रक्षिप्त' म्हणतात. रामायण-महाभारतात पण अशा अनेक प्रक्षिप्त कथा नंतर घातल्या गेल्या. त्यावर भाषा शास्त्राच्या दृष्टीने अभ्यास/संशोधन झाले पाहिजे आणि अनावश्यक भाग काढून टाकला पाहिजे. मनुस्मृतीत तर अशा अनेक गोष्टींची भरमार आहे. जो मूळ मनुस्मृतीचा विषयच नव्हता. फालतू, वाह्यात, अनर्गल गोष्टी काढून टाकून शुद्धिकरण झाले पाहिजे.

हे सगळे ऐकून तो वैष्णव साधु स्वामीजींना म्हणाला, गांजा पिऊन भजनात मन एकाग्र होते. साधन भजन छान होते. त्यावर स्वामीजी उत्तरले, 'तसे असू शकेल कारण एकदा खूपच कडाक्याची थंडी पडली होती. नळाचे पाणी बर्फापेक्षा थंड. आता आंघोळ करायची कशी? मग आम्ही एक युक्ती केली. अंगावर रेनकोट घातला आणि नळाखाली बसलो. झकास आंघोळ झाली आणि थंडीपण वाजली नाही.'' हे ऐकून तो साधू म्हणाला, ''म्हणजे काय म्हणायचे काय तुम्हाला?'' म्हणायचे हे की ती आंघोळ कोणाची झाली आमची की रेनकोटची? तसे गांजा पिऊन भजन चांगले होत असेल तर ते भजन तुमचे की गांज्याचे? त्या ग्रंथात समुद्रमंथनाची कथा पण असेलच. कारण भागवतवरील हिंदी टीका आहे ना? हो आहे. मग त्यात हे ही दिले असेल की समुद्रमंथनातून हलाहल निघाले आणि ते भगवान शंकराने प्राशन केले. त्या ग्रंथाचा आधार घेऊन तुम्ही सांगता की भगवान शंकर गांजा पितात म्हणून आम्ही पण पितो. तसे भगवान शंकराने हलाहल पण प्राशन केले. तुम्ही थोडे हलाहल पिऊन बघा. त्यानंतर तुम्ही जगला वाचला तर तुमचा आयुष्यभराचा गांजा, बिडी, सिगारेटचा खर्च आमच्याकडून. स्वामीजींचे हे सगळे बोलणे त्या वैष्णव साधुला झोंबले. त्याने खिशातले बिडीचे बंडल काढले, आगपेटी काढली आणि दूर भिरकावून दिले आणि शपथ घेतली की मी आयुष्यभर बिडी, सिगारेट, गांजा पिणार नाही. चला कान टोचण्याने अजून एकजण सुधारला. स्वामीजींनी अशाच तऱ्हेने कानटोचणी करून अनेक लोकांचे व्यसन सोडवले आहे.

स्वामीजी एकदा आंबाघाट्याच्या आश्रमातून जीपने सतलासण्याला जायला निघाले. प्रवासी भाड्याची जीप थोडी पुढे गेल्यावर मुमनवासहून एक मुस्लीम जीपमध्ये चढला आणि स्वामीजींशेजारी बसला. थोडेसे फाटलेले ठिगळ दिलेले जुने मळकट कपडे त्यांच्या आर्थिक परिस्थितीची चहाडी करीत होते. जीपमध्ये बसल्या-बसल्याच त्याने बीडीचे बंडल काढले. स्वामीजींनी इशाऱ्याने ठेवायला लावले आणि त्याला विचारले, ''हज यात्रेला जाऊन आलात?'' ''महाराजजी तुम्हाला माहित आहे का की, हजयात्रेला कुठे जावे लागते आणि किती खर्च येतो..!'' तुझ्यापेक्षा चांगल्या रितीने माहित आहे..'' असे स्वामीजी म्हणाल्यावर तो म्हणाला, ''मग माझ्यासारख्या गरीबाची चेष्टा थट्टा मस्करी का करता असं विचारून!'' ''आम्हाला सांगा ही बीडी किती वर्षापासून पित आहात?'' ''वयाच्या पंधराव्या वर्षापासून.'' आता वय? पंचेचाळीस म्हणजे गेली तीस वर्ष तुम्ही बीडी पित आहात. आपण सरासरी खर्च धरू. रोजचे दोन रूपये. 'हो' बरोबर तेवढा खर्च सहज होतो. त्याला कळेना की स्वामीजी हे सगळे का विचारत आहेत. स्वामीजी म्हणाले, ''मियाजी आता आपण असे करू सतलासण्याला जीपमधून उतरल्यावर समोरच देना बँक आहे आपण तेथे जाऊ. त्याला विचारू.

रोजचे दोन रूपये रिकरींग खात्यात टाकले असते तर आतापर्यंत या तीस वर्षात किती पैसे होतील आणि भल्या माणसा तो तुला एवढा आकडा सांगेल की तुझी एकट्याची नाही तुझ्या सर्व कुटुंबाची हज यात्रा तेवढ्या पैशात होऊन जाईल. तू हज यात्रेचे पुण्य बिडीत फुंकून टाकले की नाही.. हे शेवटचे शब्द त्याला एवढे झोंबले की खिशातून बीडीचे बंडल आणि आगपेटी बाहेर काढून जीपमधूनच बाहेर फेकली आणि म्हणाला, ''अल्ला कसम पुन्हा हात लावणार नाही.''

तरसाड्याची एक घटना स्वामीजी काही कामासाठी आश्रमाचे साधक, लालजीभाईंच्या दुकानात गेले होते. त्याच वेळी तेथे एक आदिवासी बांधव आला. स्वच्छ नीटनेटके कपडे. लक्षांत आले शिकलेला आहे, व्यवस्थित आहे. त्याने पांच रूपयाची बीडी, सिगारेट कांही तरी सांगितले. स्वामीजी म्हणाले, भैय्या एक विचारू, लग्न झाले आहे ना? हो आणि मुलबाळ? दोन वर्षाचा मुलगा आहे. मग भल्या माणसा तू रोज तुझ्या व्यसनापोटी पांच रूपयाची बीडी, सिगारेट पितो. कधी पांच रूपयाचे दुध तुझ्या लेकराला पाजले आहेस? त्याने चमकून स्वामीजींकडे पाहिले. हातातील नोट खिशात ठेवली. बिडी, सिगारेट न घेताच निघून गेला. स्वामीजी ही गोष्ट विसरून गेले. पुढे एके दिवशी स्वामीजींना लालजीभाई म्हणाले, स्वामीजी आज एक गंमत झाली. एक आदिवासी तरूण तुमची खूप आठवण करीत होता. म्हणाला, स्वामीजींचे खूप उपकार आहेत माझ्यावर. त्यांना माझा नमस्कार सांगा. मी त्याला विचारले, तू ओळखतो स्वामीजींना? तर तो म्हणाला होय पांच वर्षापूर्वी एकदाच भेट झाली होती. तुमच्या दुकानावर आणि त्याने वरचा प्रसंग सांगितला. म्हणाला, स्वामीजींच्या बोलण्याने डोक्यात विचारांचे काहूर माजले. स्वत: अपराधी असल्यासारखे वाटले. खरे म्हणाले होते स्वामीजी मी रोज पांच रूपयाची विडी प्यायचो पण माझ्या मुलाला पांच रूपयाचे दूध कधी पाजले नाही. घरी जाता जाता डोक्यात याच विचारांचे थैमान. शेवटी मन शांत करण्यासाठी मी ढाब्यावरून पांच रूपयांचे दूध घेतले. घरी गेलो. बायकोला दूध गरम करायला सांगितले. लेकराला मांडीवर घेतले. स्वत:च्या हाताने त्याला दूध पाजले. त्यावेळी मुलाच्या आणि बायकोच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून क्षणभर मला वाटले की मी स्वर्गात आहे आणि त्या दिवसांपासून बिडी, सिगारेट बंद करून तेवढ्या पैशाचे दूध रोज पाजतो मुलाला. तो अगदीच किडकीडीत होता, अशक्त होता. आता अगदी गुटगुटीत आहे. स्वामीजींच्या एका वाक्याने माझे जीवन सुधरले म्हणून माझा नमस्कार सांगा.

उपदेश करणारे जीवनात खूप भेटतात. त्या तरूणाला व्यसनाचे फायदे तोटे सांगून उपयोग नव्हता. ते त्याने कित्येकदा ऐकले असतील. स्वामीजींनी नेमके त्याच्या मर्मस्थानी बोट ठेऊन त्याच्यातला बाप जागा केला. हे तुम्हा आम्हा सर्वांना शक्य नाही. त्यासाठी शब्दात तेवढी धार पाहिजे, नजरेत वेधकता पाहिजे आणि मुख्य म्हणजे ज्या समाजात आपण राहतो त्या समाजाचे काही तरी देणे लागतो ही भावना मनात दृढ असली पाहिजे. मग समोरच्या व्यक्तीवर त्याचा प्रभाव पडल्याशिवाय कसा राहणार.

५. स्पष्ट वक्ता

गुरूमहाराजांनी स्वामीजींना छपऱ्याहून आंबाघाटा गुजरातला पाठविले. तेथे अजून बरेच कांही निर्माण कार्य करायचे होते, स्वामीजी आंबाघाटाला पोहचले. आश्रमाच्या जागेपासून पहिले मोठे गांव सतलासणा, आठ कि.मी. दूर. आंबाघाट्याला फक्त माँ चे मंदिर. आश्रमासाठी जागा व रोडवर तीन हॉटेल आणि दगड फोडणाऱ्या तीन भावांची तीन घरे. स्वामीजी आश्रमावर शांतपणे बसले असता पूर्ण संन्याशाच्या वेषात एक व्यक्ती आली. स्वामीजींना वाटले कोणी संन्यासी आले. त्यांनी आपला परिचय सांगितला. सतलासण्याजवळ 'वाव' हे माझे गांव आणि माझे नांव अमृत मोदी. म्हणजे आपण गृहस्थ आहात. हो पण तुमच्यात आणि माझ्यात फरक काय? मी घरात राहूनही आश्रमात राहिल्यासारखाच, संन्यासी जीवन जगतो म्हणून ही संन्यासी वस्त्रे धारण केली. मी आता नोकरी व्यवसाय काहीच करीत नाही. शांतपणे फक्त भजन करतो. दोन्ही मुले मोठी आहेत. चांगले मोठे किराणा दुकान आहे. सगळा व्यवहार मुले सांभाळतात. मला कशातच लक्ष घालायची गरज नाही म्हणून मी संन्यासी. तुम्ही आणि मी सारखेच. शब्दाशब्दातून अहं टपकत होता. स्वामीजींनी विचारले, एका प्रश्नाचे प्रामाणिकपणे उत्तर द्याल? आता दोन्ही मुले दुकान चांगले सांभाळत आहेत, चांगली कमाई करीत आहेत म्हणून तुम्हाला लक्ष घालायची गरज नाही आणि समजा धंद्यात मुलांकडून कांही निर्णय चुकले तोटा झाला, दुकानात नुकसानी होऊ लागली, दिवाळ निघायची/दुकान बंद करायची वेळ आली तर त्यावेळी तुम्ही काय कराल? घरात बसून प्रसन्नतेने घरात बसुन प्रसन्नतेने भजन कराल की मुलांची कान उघाडणी करुन दुकानाचा कारभार पुन्हा स्वत:च्या हातात घ्याल? बोला! अशा अचानक हल्ल्याने तो तथाकथित संन्यासी (खरे तर बहुरूपी) हादरला, काही न बोलता निघून गेला. पुढे स्वामीजी त्या भागात जवळजवळ पांच वर्षे वास्तव्यास होते पण हा गृहस्थ पुन्हा कधी भेटला देखिल नाही. कधी तरी स्वामीजी दूरून जरी दिसले तरी रस्ता, गल्ली बदलून किंवा कोणाच्यातरी घरी जाऊन बसून तो स्वामीजींच्या समोरासमोर येणे टाळत राहिला.

आंबाघाटा आश्रमावर एके दिवशी असाच उंझाहून (जि. मेहसाणा) एक व्यापारी आला. पटेल आडनांव. गणेशपुरीच्या श्री मुक्तानंदाकडून दिक्षा घेतलेला. जप ध्यान करायचा. ध्यान चांगले लागायचे. आंतरिक स्थिती बरीचशी चांगली. पण या गोष्टीचा गृहस्थाला अहंकार होता. तो स्वामीजींना म्हणाला, मी गृहस्थाश्रमात आहे, व्यापारी आहे सर्व खरे पण इतके असूनही मी नियमाने जप, ध्यान करतो आणि त्यामुळे माझी स्थिती अशी आहे की, मी दृष्टा भावाने घर, परिवारात, व्यवसायात रहातो, कसलेच सुखदु:ख नाही, शांत स्थिर तटस्थपणे रहातो, द्रष्टा भावात रहातो. स्वामीजींनी त्याच्याकडे धारदार नजरेने पाहात म्हटले, एक विचारू! समजा तुमच्या गल्लीतून एखादी तरूण मुलगी कोणाबरोबर पळून गेली, गल्लीतच नाही सगळ्या गांवात चर्चा. पण तुम्ही तिकडे लक्ष देणार नाही कारण द्रष्टा भावाने रहात आहात. समजा ती मुलगी तुमच्या नात्यातली असेल तरी तुमचा द्रष्टाभाव खंडित होणार नाही, असेच ना! बरोबर? होय मी शांतपणे द्रष्टाभावात राहीन. आता समजा ती मुलगी तुमची स्वत:ची असेल तर? शब्दांना धार चढवत स्वामीजींनी प्रश्न विचारला. बिचाऱ्याचा द्रष्टाभाव संपला. उत्तर न देता उठून चालायला लागला.

आंबाघाटाहून स्वामीजी नंतर जवळच्या गांवात सतलासणाला आले. तेथील कांही समाजसेवी श्रेष्ठींना हाताशी धरून त्या भागांत अत्यंत गरजेचे असलेले एक मोठे हॉस्पिटल उभारण्याचे काम हाती घेतले. गांवात सरकारी दवाखाना पण प्राथमिक आरोग्य केंद्र ३-४ खाजगी डॉक्टर पण फार तर M.B.B.S. पर्यंतचे. त्यामुळे सिझेरियनची वेळ आली, कुणाला ॲटॅक आला तर किमान पन्नास कि.मी दूर. यामुळे अनेक केसेस दगावल्या.

या सर्व सोयी सतलासण्यात उपलब्ध करून देण्याचा निश्चय स्वामीजींनी केला आणि सतलासण्यात आले. एकदा रस्त्यावर अचानकच एका चाळीशीच्या पुढच्या ब्राह्मण व्यक्तीने जी सरकारी दवाखान्यात नोकरीला होते त्यांनी स्वामीजींना रस्त्यावर भेट झाली असता थांबवून म्हटले, स्वामीजी आठवड्यातून एक दिवस दर रविवारी आम्ही स्वाध्याय परिवाराच्या सत्संगाचे आयोजन करतो. आम्ही आपल्या सनातन संस्कृतीचेच काम करीत आहोत. तुम्ही पण या सनातन संस्कृतीचेच संन्यासी. मग तुम्ही आमच्या कार्यक्रमात का येत नाही? (त्याची फालतू बकबक-पोपटपंची ऐकण्यासाठी). त्या गृहस्थाचा एक भाऊ व त्याची पत्नी ते दोघेही स्वाध्यायी. तिसरा भाऊ दुकानदार तो पण स्वाध्यायी. बोलण्यात अहंकार टपकत होताच पण साधुसंन्याशाबद्दलच्या तुच्छतेचा भाव. (गायत्री परिवार, स्वाध्याय परिवाराकडून हे नेहमीचे अनुभव, त्यांच्या दृष्टीने साधु संन्यासी म्हणजे समाजावर भार, मानसन्मानाला नाही तुच्छतेलाच पात्र) स्वामीजींनी त्यांच्याकडे वेधकपणे पाहात म्हटले, ज्या संस्कृतीत 'मातृदेवो भव।' म्हटले जाते त्या संस्कृतीचे पाईक म्हणविणारे तुम्ही. तीन-तीन मुलांची आई असूनही या वृद्धावस्थेत ज्यांच्या आईला हाताने स्वयंपाक करून खायची वेळ येते त्यांनी संस्कृतीच्या गोष्टी बोलू नयेत. खाली मान घालून सटकला आणि यथासंभव स्वामीजींसमोर यायचे टाळायचा. पण एकदा अशीच अचानक रस्त्यावर गाठ पडली. स्वामीजींनीच त्याला थांबवले आणि म्हणाले, ''आम्ही तुमच्याशी एकशे एक टक्के सहमत आहोत.'' म्हणजे काय स्वामीजी? मला कळाले नाही. तुम्हाला काय म्हणायचे आहे ते..! आपली तर कशावर कांही चर्चा पण नाही.. कशाच्या बाबतीच सहमत..? स्वामीजींना माहित होते की त्यांची वृध्द आई आजारी आहे आणि तीन मुल, तीन सुना, नातवंडे कोणीही लक्ष देत नाहीत. स्वामीजी म्हणाले, शंभर रूपयाचे औषध एका म्हातारीच्या पोटात जाण्यापेक्षा हजार रूपयांचे लाडू लेकांच्या पोटात गेलेले अधिक चांगले नाही का? तो आ वासून स्वामीजींकडे पहात राहिला, त्याला त्याच अवस्थेत सोडून स्वामीजी पुढे निघून गेले.

स्वामीजी एकदा राजस्थानच्या प्रवासात गुलाबपुऱ्याला (जि.भिलवाडा) गेले होते. तेथे सहकारी मिलच्या एका मोठ्या ऑफिसरकडे मुक्कामाला होते. त्यांच्या घरी स्वामीजी पोहोचले. त्यावेळी एक वृद्ध स्त्री त्यांच्या घरी बसली होती. चहापाणी झाल्यावर त्या वृद्ध स्त्रीने विचारले, स्वामीजी तुमचे आज प्रवचन आहे का येथे? नाही, आम्ही दुसऱ्या कामासाठी आलो आहोत. तुम्ही साधुसंतांनी तर प्रवचन करून लोकांना चांगला रस्ता दाखवला पाहिजे. सन्मार्गाला लावलं पाहिजे. सत्संग प्रवचन करणे तर तुमचे कामच आहे. म्हातारीने तोंडाचा पट्टा चालू केला तरी स्वामीजी शांत. त्यांनी म्हातारीला हळूच विचारले, तुम्हाला सत्संग प्रवचनाची खूप गोडी दिसते. हो ना! आमचे स्त्रियांचे एक 'रामचरित मानस' मंडळच आहे. दर आठवड्याला आम्ही एकत्र येऊन त्यातील चौपाया वाचतो. आपसात चर्चा करतो. उद्याच आमचा साप्ताहिक दिवस आहे. येणार तेथे? नाही, माताजी आमच्या जवळ तेवढा वेळ नाही पण अस करा आता तुम्ही पाच मिनिटे येथे थांबा आम्ही जो सत्संग करतो तो ऐका आणि उद्या तुम्ही तो सगळ्यांना ऐकवा. सगळे तुमच्यावर खुश होतील. स्वामीजी म्हणाले, रामचरितमानसमध्ये बालकाण्डात प्रसंग आहे. रामसीतेच्या विवाहानंतर जनकपूरहून वरात अयोध्येला परतली. सीतेला घेऊन दशरथ राजा कौसल्येच्या महाली गेले आणि तिला म्हणाले, ''परघर आई। राखेहू नयन बधू लरिकनी पर घर आई। राखेहू नयन पलक की नाई।। (बालकाण्ड ३५५) परक्या घरची लेक आपल्या घरी आता सून म्हणून आली आहे. तीची तू अशी काळजी घे जशी पापणी डोळ्याची काळजी घेते. काय छान उपमा आहे. आपली त्वचा संवेदनशील आहे, तरी बऱ्याच वेळा अंगावर मुंगी चढली, एखादा किडा चढला तर तो चावेपर्यंत लक्षांत पण येत नाही. आपल्या शरीरात सर्वात सावध (अलर्ट) कार्यक्षम असेल तर ती डोळ्यांची पापणी किती सातत्याने आणि तत्परतेने डोळ्यांचा सांभाळ करत धुळ जाऊ नये, कचरा जाऊ नये म्हणून. प्रखर प्रकाशाने त्रास होऊ नये म्हणून, धुराने त्रास होऊ नये म्हणून सतत उघडझाप करीत काळजी घेत असते. जशी पापणी डोळ्यांची रक्षा करते तशी प्रत्येक सासू जर सुनेला सांभाळेल तर स्वयंपाक करतांना ना गॅसचा भडका

होणार ना चहा करताना स्टोव्ह फाटणार. (१९७० ते ९० च्या काळात अशा घटना खूप घडल्या आहेत). स्वामीजी पुढे म्हणाले, आम्हाला हे कळत नाही की, त्या निर्जिव गॅसला हे कसे कळते की आज सून स्वयंपाक करते आहे तर भडका घ्यायचा, त्या निर्जिव स्टोव्हला कसे कळते की सून चहा करते आहे तर आता फाटावे. आम्ही आजपर्यंत पेपरमध्ये कधीच वाचले नाही की सासू स्वयंपाक करताना गॅसने भडका घेतल्याने सासू मेली, की स्टोव्ह फाटल्याने सासू मेली. नेमके सुनेच्याच वेळी हे कसे घडते? प्रत्येक सासूने दशरथाने सांगितल्याप्रमाणे काळजी घेतली तर मग एकाही सूनेचा अकाली मृत्यु होणार नाही. तेवढ्यात ती म्हातारी झटकन उठली आणि पाय आपटत निघून गेली. तिचा तो फणकारा आणि वय झाले असूनही दणादण पावले टाकणे पाहून स्वामीजींना आश्चर्य वाटले. स्वामीजी ज्यांच्याकडे उतरले होते त्या बाईंना विचारले, काय झाले या म्हातारीला? का एवढी भडकली? ती बाई स्वामीजींना म्हणाली, तुम्ही नेमके तिच्या मर्मावर बोट ठेवले म्हणून. तिचे आणि तिच्या सुनेचे अजिबात पटत नाही. म्हातारी अगदी खाष्ट आहे. पण आम्ही कधी तिला कांही बोलत नाही, त्यांच्या भानगडीत पडत नाही. कारण ती यांच्या वरच्या मोठ्या साहेबांची (मिल मॅनेजर) आई आहे.

छपऱ्याला स्वामीजीची पहिली गुरूपौर्णिमा. त्या कार्यक्रमाची सर्व सूत्रे संचलन बाबांनी स्वामीजींच्या हाती सोपवले होते. पत्रिकेत गुरूपूजनाची वेळ छापली होती, सकाळी ७.१५ ची, बरोबर सव्वासातला बाबांची पूजा सुरू झाली तेथे असलेल्यांच्या उपस्थितीत पण जे जुने साधक, शिष्य होते, ज्यांच्या हातात आतापर्यंत सर्व कारभार होता ते मुख्य शिष्यगण आठ वाजता आले. जेव्हा त्यांना कळाले की बाबांची पूजा तर झाली. ते सगळे जण चिडले, संतापले, चरफडले, आरडाओरडा करू लागले. बाबांजवळ गेले. स्वामीजी शांतपणे हे सगळे पाहात होते. त्यांची धावपळ थांबली त्यानंतर शांतपणे स्वामीजी त्यांना म्हणाले, पत्रिकेत ७.१५ ची वेळ छापली होती. यापुढे प्रत्येक कार्यक्रम अगदी दिलेल्या वेळेतच होणार. कोणी येवो न येवो. कोण आले, कोणी नाही याच्याशी आम्हाला काही घेण-देण नाही. शिष्यांनी गुरूंची वाट पाहायची की गुरूंनी शिष्याची वाट पाहायची? हे योग्य होईल का की बाबांनी येथे आसनावर येऊन बसल्यावर तुम्ही लोक अजून आला नाहीत म्हणून पूजेसाठी तुमची वाट पाहात बसायची? ही गुरूमर्यादा आहे? सगळे गप्प.

तेवढ्यात स्वयंपाकी येऊन म्हणाला, स्वामीजी तुम्ही म्हणाला होता की साडेआकरा वाजचा पहिली पंगत बसली पाहिजे म्हणजे बसली पाहिजे. स्वयंपाक तयार आहे. बसवा पंगत. स्वामीजींनी लाऊडस्पीकरवर जाहीर केले सर्व लहान मुलामुलींना जेवायला बसवा. थोड्या वेळाने बाबांचा एक शिष्य, एक गुरूबंधू येऊन स्वामीजींच्या कानात कुजबुजला, बाबांचा एक मुख्य व जुना शिष्य ध्रुवदेव पांडे रागारागाने निघून गेला आणि सांगून गेला की मी आता संध्याकाळी पण येणार नाही. स्वामीजींनी विचारले, का? काय झाले? तुम्ही आधी मुलांची पंगत बसवली ना त्यात तर सगळ्याच जातीची मुले. ती आधी जेवायला बसली. स्वामीजी हा महाराष्ट्र नाही बिहार आहे. ध्रुवदेव पांडेना राग आला की आधी ब्राह्मण भोजन न करवता दुसऱ्यांना बसवतात कसे? स्वामीजी म्हणाले, त्यांना जाऊन सांगा आज गुरूपौर्णिमा आहे गुरू आणि शिष्याचा उत्सव. येथे आम्ही बाबांच्या शिष्यांना बोलवले आहे. कोणा ब्राह्मणाला नाही. ही कोणा गृहस्था घरची सत्यनारायणाची कथा नाही की वास्तुशांती नाही. हा आश्रम आहे आणि येथे कधीही ब्राह्मणभोजन असे होणार नाही. शिष्य म्हणून यायचे असेल तर या ब्राह्मण म्हणून यायचे असेल तर घरीच बसा. संध्याकाळीच काय पुढील वर्षाच्या गुरूपौर्णिमेला पण आला नाही तरी चालेल. आम्हाला काही फरक पडत नाही. एवढे स्पष्ट उत्तर ऐकून तो शिष्यच नाही तर बाकीचे उपस्थित पण चपापले. त्यांच्यापैकी कोणीतरी हे त्या ध्रुवदेव पांडेना जाऊन सांगितले. माणूस तसा सज्जन आणि विनम्र. बाबांचा जुना शिष्य, साधना चांगली, बाबांवर श्रध्दा आपली चूक त्याच्या लक्षात आली. संध्याकाळी बाबांच्या प्रवचनाला आला. येताच बाबांची आणि स्वामीजींची क्षमा मागितली. म्हणाला, स्वामीजी तुमचे म्हणणे अगदी बरोबर. चूक माझीच. पुन्हा अशी चूक होणार नाही आणि कार्यक्रमाची वेळ सुद्धा पाळेन.

६. संकटमोचक स्वामीजी

बाबांनी संन्यास स्विकारण्यापूर्वी गृहस्थाश्रम स्विकारला होता. (ही घटना बिहारची). त्यावेळी त्यांना दोन कन्या होत्या. त्यावेळी त्या लहान होत्या. आता वयात आलेल्या. बाबांचे गृहस्थाश्रमातील लहान बंधु भरतजींनी मोठ्या मुलीसाठी स्थळ शोधले. लग्न ठरले. लग्न घूरघाटला (बाबांचे जन्मगाव) न करता छपरा शहरातच करावे हे ही नक्की झाले. लग्नाच्या दिवशी भरतजींनी बाबांना श्रद्धेने, पूर्ण मर्यादा पाळून, आदराने लग्नकार्याच्या स्थळी नेले. बाबांबरोबर अर्थातच स्वामीजी पण होतेच. (खरेतर त्यावेळी स्वामीजींची संन्यासदीक्षा झाली नव्हती पण वाचकांच्या सोयीसाठी स्वामीजीच म्हणू) लग्नाचे विधी सुरू झाले. वरात दाराशी आली. वरातीचे यथायोग्य स्वागत झाले, अल्पोपहार झाला, आता सगळ्यात मुख्य आणि सर्वात महत्वाचा कार्यक्रम, 'पाणीग्रहण संस्काराचा'. भरतजी आणि वधुपक्षातली इतर ज्येष्ठ मंडळी नवरदेवाजवळ गेली आणि त्यांनी नम्रतेने विनंती केली. 'चला आत.' नवरदेव जागेवरून उठला नाही. त्याने संमतीसाठी त्याच्या मावश्याकडे पाहिलं. नवरदेवाचे मावसे सैन्यातून रिटायर कर्नल होते ते म्हणाले, आधी आम्हां सर्वांची आत बसायची व्यवस्था करा मगच नवरदेव आत येईल. 'म्हणजे'? मुलीकडच्या सगळ्यांनी आश्चर्याने विचारले. लग्नपत्रिकेत काय छापले आहे, आशिर्वाद द्यायला या. आम्ही येथे खाण्यासाठी आलो नाही, आशिर्वाद द्यायला आलो आणि म्हणून लग्नाच्या वेळी आम्ही सगळे तेथे उपस्थित राहू.

वाचकांना हे वाचून नीटसे कांहीच उलगडणार नाही म्हणून आधी बिहारकडची लग्नपध्दती जाणून घेतली पाहिजे. आपल्याकडे महाराष्ट्रात बाहेर मांडवात जाहीरपणे लग्न होतात तसे बिहारमध्ये होत नाही. घरात होतात म्हणून तेथील अधिकतर घरे चौकोनी बांधतात. चारही बाजूला खोल्या व मधला चौक मोकळा.चौकात चार बांबुचा मंडप उभा करून तेथेच लग्न लावतात आणि खास गंमत म्हणजे तेथे पुरूषवर्गापैकी फक्त दोनच जण उपस्थित असतात. एक नवरदेव व दुसरा ब्राह्मण. सगळ्यात शेवटी कन्यादानाच्या वेळी मुलीचे वडील किंवा जे कन्यादान करणार असतील ते १०-१५ मिनिटांसाठी आत येतात आणि बाकीच्या जातीच्या सर्व स्त्रीया असतात. या स्त्रीया मनमोकळेपणाने लग्नाची गीते गातात. ती बहुदा सूचक शब्दात प्रथम रात्रीच्या मीलनाचे व भावी संसाराचे वर्णन करतात. कांहीशी शृंगारीक. शिवाय कांही गीतात नवरदेव व त्याच्याकडच्या लोकांना टोमण्या शिव्यांचा आहेर. आंत कोणी पुरूष नसल्याने बाया अगदी मनमोकळेपणाने ही गीते गातात.

आता त्या नवरदेवाच्या मावश्याने भलताच प्रश्न उपस्थित केला 'आम्ही सगळे आत येणार'. मुलीकडच्या लोकांना ते स्विकार्यच होईना कारण तशी तिकडे पध्दतच नव्हती. पण काही तरी नवे करायचे, काही तरी सुधारणा करायची हे त्या मिलटरीच्या माणसाच्या डोक्यात बसलेले खूळ. तो कोणाचे काही ऐकूनच घेईना. नवरदेवाकडच्या आर्थिक अडचणीमुळे लग्नाच्या खर्चाचा अधिक भार त्यांनीच उचलला होता. त्यामुळे नवरदेवाला त्याच्यापुढे काहीच बोलता येईना आणि तो उठून आत जाईना. दोन्ही पक्षातले जेष्ठ लोक मध्ये पडले पण छे! ते मिलीटरी डोके कुणाचे काही ऐकेचना. वाद एवढा वाढला की लग्न न होताच वरात परत जाते की काय? स्वामीजी बाबांच्या चरणापाशी बसलेले. लग्नविधी अजून सुरू झाला नाही पाहून बाबांनी मुलीकडच्या एकाला बोलावून विचारले, काय चालले आहे? त्यावेळी त्याने हा सगळा किस्सा सांगितला. बाबांनी शांतपणे ऐकून घेतला. कसलीच काही प्रतिक्रिया नाही. गीतेतल्या 'स्थितप्रज्ञेचे' मुर्तिमंत उदाहरण

स्वामीजी पाहात होते. पेचप्रसंग चांगलाच गुंतला. वरात परत गेली असती तर अपयशाचे खापर भरतजींच्या डोक्यावर फुटले असते. कारण स्थळ त्यांनी शोधले होते. भरतजी अश्रूपूर्ण डोळ्यांनी बाबांजवळ आले. संन्यासधर्माप्रमाणे बाबांनी या चर्चेत स्वत: भाग घेणे योग्य नव्हते, म्हणून बाबांनी ते टाळले. बाबांना स्वामीजींवर पूर्ण विश्वास की ते यातून काही मार्ग काढतील. बाबांनी स्वामीजींना आज्ञा केली, ''सवितानंद अब इसमें से रास्ता निकालने का काम तुम्हारा. स्वामीजी प्रणाम करून उठले. आधी मुलीकडच्या लोकांचे म्हणणे ऐकून घेतले. रीतीरिवाज समजून घेतले आणि सरळ त्या मावश्याकडे गेले. औपचारिक परिचय आटोपल्यावर स्वामीजी म्हणाले, आम्ही महाराष्ट्रातून आलो आहोत. तेथे लग्न बाहेर मांडवातच होते. त्यामुळं तुम्ही आत जाव यात आम्हाला काही वावगे वाटत नाही. मिलटरीमन खूश झाला. स्वामीजी पुढे म्हणाले, ''पण तुम्ही येथील चालीरिती सांगा.'' त्यांनी स्विकारले की मुलीकडचे लोक म्हणतात ते अगदी बरोबर आहे. येथे अशीच पद्धत आहे. पण सुधारणा नको का? स्वामीजींनी त्यांना मध्येच अडवत म्हटले, ''जरा थांबा आतमध्ये स्त्रीयांना जाऊ देतात पुरुषांना नाही. बरोबर. मग आता असे करा ज्यांना ज्यांना आत जायचे आहे त्यांना घरी न्या कपडे बदला, साड्या नेसवा, तोंडावर घुंघट घ्या. मुलीकडच्या लोकांना कळणारच नाही कोण आत आले ते, कोणी घुंघट वर करून पाहाणार नाही. तुमची आत जाण्याची इच्छा पूर्ण होईल आणि मुलीकडच्यांची चालरित पण सांभाळली जाईल. सगळे एकदम हसले. हास्याचा खळखळाट थांबल्यावर, वातावरणातला तणाव निवळल्यावर स्वामीजी म्हणाले, समाज सुधारणा एका दिवसात होण्याची प्रक्रिया नाही. दीर्घकाळ, हळूहळू समाजात बदलाव आणावा लागतो. स्वामीजी हे सर्व बोलतांना आलेल्या वरातीकडे नजर फिरवून सर्व कांही पाहात होते. त्यातूनच त्यांना युक्ती सुचली आणि ते म्हणाले, तुमच्या वयाचे लोक आत गेले तर आंत असलेल्या स्त्रीयांना घुंघट करावा लागेल. त्यांच्या आनंदावर, उत्साहावर विरजण पडेल त्यांना मुक्तपणे गाता येणार नाही. सगळ्यांचा हिरमोड होईल. त्यापेक्षा आपण असे करू की वयस्क लोक बाहेर थांबू देत आणि नवरदेवाच्या वयाची त्याची जी मित्रमंडळी आणि नातेवाईक आहेत त्यांना आत जाऊ देऊ. स्वामीजी असे म्हणाल्याबरोबर मुलीकडच्या लोकांनी स्वामीजींना अडवायचा प्रयत्न केला की हे ही आम्हाला मंजूर नाही. पण स्वामीजींनी त्यांना डोळ्यानेच इशारा करून गप्प केले. मिलटरीमनला आनंद झाला. चला आपल्या शब्दाची किंमत तर राहिली. तरूण तर तरूण 'पुरूषवर्ग' तर आत गेला, त्यात पण आपला विजयच.

अशाप्रकारे त्यांना स्वामीजींनी सांगीतल्यावर मुलीकडचे लोक चुळबुळ करू लागले. स्वामीजींनी तिकडे दुर्लक्ष केले कारण त्यांना विश्वास होता की आपले नियोजन चपखल आहे. स्वामीजी मिलटरीमनकडे वळून म्हणाले, आता तुम्ही स्वत: दोन मिनिटासाठी आमच्याबरोबर आत चला आणि आत मुलांना बसण्यासाठी किती जागा आहे, किती जण बसू शकतील याचा आपण अंदाज घेऊ. मिलिटरीमन स्वामीजींसोबत आंत गेले. मुलीकडचे जुने लोक अस्वस्थ झाल, पण बोलणार काय? कारण स्वत: भरतजी गप्प बसून स्वामीजी काय करतात ते पाहात होते. न बोलता आत जाऊन बाहेर आल्यावर स्वामीजी म्हणाले, आत २० ते २५ तरूण मंडळी दाटीवाटीने बसू शकतील एवढी जागा आहे. चला कोणा कोणाला पाठवता? मिलटरीमन नवरदेवाबरोबर या विषयावर खलबत करू लागले, स्वामीजींनी एकानजरेने हेरले होते की बाहेर नवरदेवाच्या वयाचे सुमारे ७५ तरूण आहेत आणि त्यातून २५ जणांना निवडून आत पाठवणे शक्यच होणार नाही. नातलग तरूणांना आत नेले तर नवरदेवाबरोबरचे सहकारी आणि जी त्यांच्या गल्लीतली मुले जी त्यांच्या जातीची नव्हती पण मित्र म्हणून गेले दोन दिवस धांवपळ करीत होते ते ही दुखावतील. बरे सहकाऱ्यांना न्यावे तर नातेवाईक दुखावतील. कायमसाठी वितुष्ट होईल. नवरदेव आणि मावसा दोघांनाही कळेनासे झाले की, कोणाला न्यायचे आणि कोणाला नाही. सगळा विचार करून मिलटरीमन शेवटी नवरदेवाला म्हणाला, 'बाबा तू

एकटाच आत जा. उगाचच मान-अपमान, हे जवळचे ते परके असा वाद उभा रहायला नको. नवरदेव एकटाच उठला, मुकाट्याने आंत गेला. मुलीकडचे लोक खूश झाले. चुळबुळ करणाऱ्यांच्या, अस्वस्थ झालेल्यांच्या आता लक्षात आले की, स्वामीजींनी त्या मिलटरीमनला एकेका पायरीने कसे कोंडीत पकडले, जाळ्यात अडकवले. लग्न निर्विघ्नपणे पार पडले. भरतजींनी स्वामीजींना आनंदाने कडकडून मिठी मारली. त्यांच्या कपाळावर कलंक लागता लागता राहिला होता. अशाप्रकारे गुरूमाऊलीने 'ताकास तूर लागू न देता' बाका प्रसंग आपल्या बुद्धीचातुर्याने निभावला.

स्वामीजी गुजरातमध्ये येण्यापूर्वीची बिहारमधील छपरा शहरातील गंमत. रामप्रवेश मास्तर, त्यांना सगळे मास्तरच म्हणायचे. सेवानिवृत्त शिक्षक. त्यांचे बंधु पण शिक्षकच, पण अजून नोकरीत. मास्तरजींनी सेवानिवृत्तीनंतर विटाकर पाडण्याचा व्यवसाय सुरू केला. शिवाय शेती होती. त्यांच्या समाजातील कांही संपन्न लोकांपैकी ते एक होते. त्यादिवशी काही कामानिमित्त स्वामीजी मास्तरजींनाच भेटायला गेले होते तर मास्तरजी गहन चिंतेत होते. त्यांच्या बंधुंच्या चेहऱ्यावर पण चिंतेचे सावट होते. स्वामीजींनी आपले काम बाजुला ठेऊन विचारले, 'काय झाले मास्तरजी?' मास्तरजी म्हणाले, ''काय सांगू स्वामीजी तुम्हाला, आज आमच्या समाजाची मिटींग आहे. या छपरा शहरात समाजाने एक जागा विकत घेतली आहे. तेथे मुलांसाठी वसतीगृह बांधायचे आहे. आमच्या समाजात खूप लोक गरीब आहेत. शहरात राहण परवडत नाही म्हणून शिक्षण घेत नाहीत. त्यांची अत्यल्प दरात राहण्या-जेवण्याची सोय व्हावी हा मुख्य उद्देश आहे आणि दुसरा कोर्टकचेरी, कलेक्टर कचेरी वगैरे सरकारी कामासाठी आसपासच्या गावांतून लोकांना यावे लागते. काम झाले नाही की घरी परत जाऊन दुसऱ्या दिवशी परत येणे सोयीचे होत नाही आणि रात्री येथे थांबावे तर लॉजिंग बोर्डींगचा खर्च त्या गरीबांना परवडत नाही. त्यांच्यासाठी पण दुसऱ्या अजून चार खोल्या बांधायच्या असा विचार आहे आणि दोन वर्षापासून हा घोळ सुरू आहे. मिटींग होते, पैसे गोळा होतात पण अजून पाया खोदायला कुदळीचा एक घाव पण पडला नाही. पहिल्या वर्षी समाजाच्या दबावाने आम्ही रू. दहा हजार दिले. (त्या काळातले दहा हजार १९८०-८१ च्या काळात) इतरांनी काही दिले. जी कार्यकारणी नेमली होती त्यांनी ते पैसे स्वाहा केले. मागच्या वर्षाच्या कार्यकारणीनेही तेच केले. मागच्या वर्षी पण आमचे दहा हजार गेले. काहीही काम होत नाही, कोणी हिशोब देत नाही, फक्त पैसे खाल्ले जातात. आज पुन्हा मिटींग आहे. समाज आहे जावे लागणार. समाजात जी प्रतिष्ठा आहे ती सांभाळण्यासाठी आज पुन्हा दहा हजाराला चुना लागणार. न जावे तर समाजात बेईज्जत. इकडे आड तिकडे विहिर असे झाले आहे स्वामीजी. काय करावे काही कळत नाही.

मास्तरांचे हे चिंतायुक्त बोलणे ऐकून स्वामीजी म्हणाले, सोपा उपाय आहे मास्तरजी. आज तुम्हाला एक पैसाही द्यावा लागणार नाही, उलट दहा हजार दिल्याने पण होणार नाही इतकी वाहवा तुमची होईल. सगळेजण प्रशंसा करतील. खर्च काही नाही सगळे फुकटात. पण हा जुगार आहे. तशी वेळ आली तर समाजासाठी दहाच्या ऐवजी वीस हजार खर्च करण्याची तुमची तयारी आहे? पैशांचा सदुपयोग होत असेल तर गरीब विद्यार्थ्यांसाठी दहाच्या ऐवजी वीस हजार पण खर्चेन. मी स्वत: शिक्षक होतो, शिक्षणाचे महत्व मला कळते. पण महत्वाचे म्हणजे हे महाचोर, महाभ्रष्ट लोक तसे होऊ देतील तर ना? स्वामीजी म्हणाले, ''तुम्ही त्याची चिंता सोडा आजच्या मिटींगमध्ये फक्त तुम्ही एवढेच सांगा, छत भरण्याचा खर्च माझ्या एकट्याचा, मी दान म्हणून आता काही देत नाही, पण संपूर्ण छताचा खर्च माझ्याकडून.'' मास्तरांनी ऐकले, क्षणभर विचार केला. स्वामीजींनी काय सांगितले ते लक्षात येताच खळखळून हसले. वा स्वामीजी! काय रस्ता काढला. पैसे पण वाया जाणार नाहीत आणि समाजात इभ्रत प्रतिष्ठाही वाढेल. पाया खोदतील भिंती उभारतील त्यानंतर छताचा प्रश्न. बर एवढी मोठी जबाबदारी घेतल्यावर आज कोणी म्हणूही शकणार नाही की आज एवढे द्या

म्हणून. तुम्ही आधी पैसे गोळा करा, पाया काढा, भिंती उभारा, पुढचे काम माझे. स्वामीजींचा हा युक्तीवाद ऐकून दोघे भाऊ खुश झाले.

याहून एक सुंदर विलक्षण आणि गुंतागुंतीच्या प्रसंगातून स्वामीजींनी काढलेल्या मार्गाबद्दल सांगण्याआधी एक छोटासा प्रसंग. स्वामीजींनी सतलासण्याला दवाखाना उभा केला. डॉक्टर सगळे तरूण आणि नवीन, नुकतेच पास होऊन आलेले. दवाखान्यातील ट्रस्टी मंडळात एक ट्रस्टी होते जेठा काका. सगळ्यात जेष्ठ वयस्क, स्पष्टवक्ता पण स्वभावाने खूप चांगले. तितकेच धार्मिक जैन धर्माचे सगळेच नियम काटेकोरपणे पाळणारे. त्यांच्या नाकात पुळी झाली होती. डॉक्टरांनी त्यासाठी औषध दिले, सांगितले दवाखान्यातच थांबा. पण जेठा काका म्हणाले, बाकी कसलाच त्रास मला नसल्याने जातो मी घरी-डॉक्टर म्हणाले, ठिक आहे काका पण जसे पुळी फुटल्याचे जाणवेल तसे तत्काळ दवाखान्यात या, एका क्षणाचा पण विलंब करू नका आणि संध्याकाळच्या सुमारास पुळी फुटली, दवाखान्यात आणल, डॉक्टरांना जी चिंता होती तसेच झाले. ट्रस्टचे मुख्य सचिव श्री बच्चुभाईंनी डॉक्टरांना विचारले, काय परिस्थिती आहे? नाकातली पुळी फुटली त्याचा रक्तस्त्राव वरती डोक्यात गेला म्हणून ते बेशुद्ध झाले आहेत. आमचा आटोकाट प्रयत्न चालु आहे त्यांना शुद्धीवर आणण्याचा पण जर ते शुद्धीवर नाही आले तर मग कोमात जातील. त्यानंतर आमच्या हाती कांही नाही. बच्चुभाईंनी आणि जेठा काकांच्या मुलांनी डॉक्टरांना विचारले, 'अहमदाबादला न्यायचे का?' त्यावर डॉक्टर उत्तरले, ''न्यायचे असेल तर न्या पण तेथेही हेच उपचार होतील जे आम्ही येथे करतो आहोत. उपचारात फरक पडणार नाही. उलट येथून दिडशे कि.मी. चा प्रवास या स्थितीत अनुकूल येणार नाही. मधल्या काळात बच्चुभाईंनी स्वामीजींना निरोप पाठवून दवाखान्यात बोलवून घेतले. स्वामीजी दवाखान्यात पोहोचले. जो एक हॉल रिकामा होता त्यात जेठा काकांना ठेवले होते आणि पूर्ण हॉल सतलासण्याच्या जैन समाजाच्या लोकांनी भरलेला. कोणी रडत होते, कोणी दुसऱ्याला धीर देत होते, बोलत होते, गोंधळच गोंधळ. डॉक्टर म्हणाले, स्वामीजी या लोकांमुळे आमच्या कामात अडथळा येत आहे. का तर यांना अगदी गप्प बसायला सांगा नाही तर बाहेर जायला सांगा. स्वामीजींच्या लक्षात आले कोणी काहीच ऐकून घेण्याच्या मन:स्थितीत नव्हते. सांगून काही फायदा नव्हता. त्यामुळे स्वामीजी त्या लोकांकडे दुर्लक्ष करीत सरळ जेठा काकांकडे गेले. घरचे लोक जे घेरून बसले होते ते बाजूला झाले. स्वामीजी जेठा काकांच्या उशाशी बसले व त्याच्या कानाजवळ तोंड नेवून जैन धर्माचा नवाकार मंत्र म्हणायला सुरूवात केली. स्वामीजींना माहित होते की जेठा काका हा मंत्र नेहमीच दिवसभर होईल तेवढा जपत असतात. स्वामीजी सतत मंत्र म्हणत होते, कानाशी तोंड नेवून. कानांत आवाज जाईल असा. आणि २/३ मिनिटांत चमत्कार घडू लागला. जेठा काका अजून बेहोशच होते तरीपण त्यांचे ओठ मात्र फडफडू लागले. आता स्वामीजी सगळ्यांना म्हणाले, मुकाट्याने सगळेजण खाली बसा आणि सुस्वर सामुहीकरित्या नवाकार मंत्र बोला. बघा त्यांचे ओठ फडफडत आहेत म्हणजे ते मंत्र बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत. सामुहीक मंत्राचा आवाज त्यांच्या कानात गेला तर त्यांना लवकर स्मरण होईल. सगळेजण बसले, शांतपणे सुस्वर नवाकार मंत्र म्हणू लागले. जेठा काकांच्या ओठाची हालचाल अजून वाढली. हळूहळू अल्पसा ध्वनी निघू लागला आणि दहा मिनिटातच बेशुद्धावस्थेतले जेठा काका स्पष्ट मंत्र बोलू लागले. डॉक्टरांनी सुटकेचा श्वास सोडला. म्हणाले, कोमात जाण्याची शक्यता टळली. आम्ही आमचे प्रयत्न करतो त्यांना शुद्धीवर आणण्याचा, तुम्ही तुमचा करा. १५/२० मिनिटांनी जेठा काकांनी डोळे उघडले. स्वामीजींचा प्रयोग यशस्वी झाला. जेठा काकांच्या जीवावरचे संकट टळले. भावावेगाने बच्चुभाईंनी स्वामीजींना मिठी मारली. खांद्यावर डोके ठेऊन मौन अश्रुपात होऊ लागला. मुले, सुना, नातू स्वामीजींच्या नमस्कारासाठी धांवले. स्वामीजींनी इशारा केला, थांबविले आणि म्हणाले, काकांना भेटा, आधी नातवंडांना भेटू द्या मग तुम्ही

त्यामुळे ते लवकर सावरतील आणि कोणाचा प्रणाम न घेताच जणू कांही केलेच नाही, काही घडलेच नाही अशा तटस्थपणे स्वामीजी निघून गेले. अशा वेळी आठवते ती ज्ञानेश्वरीतील समर्पक ओवी – ***हे मजचिस्तव जाहलें। परी म्यां नाही केले। ऐसे जेणे जाणितले। तो सुटला गा।।***

स्वामीजी ज्यावेळी आंबाघाटा आश्रमावर रहायचे. बरोबर साध्वी दयामयीताई (गृहस्थाश्रमाच्या नात्याने स्वामीजींच्या जेष्ठ भगीनी) राहायच्या. स्वाभाविकच स्वयंपाकासाठी आवश्यक ते सगळेच आणावे लागायचे. त्यामुळे स्वामीजींना ३/४ दिवसातून एकदा सतलासण्याला यावे लागायचे आणि त्या दिवशी असेच कामानिमित्त आले होते. उशीर झाला होता आणि आंबाघाट्याला थांबणाऱ्या शेवटच्या बसची वेळ होत आली होती. ती बस चुकली तर दोनच पर्याय का तर रात्री सतलासण्याला मुक्काम करा नाहीतर आठ कि.मी. पायी चालत जा. रात्रीच्या वेळी अंधारात रोडवर लाईट पण नव्हते. स्वामीजी घाईने निघाले. तेवढ्यात स्वामीजींच्या कानावर आवाज आला, स्वामीजी थांबा थांबा जरा इकडे या. स्वामीजींनी आवाजाच्या दिशेने पाहिले. डाह्याभाई सोनीचे दुकान आणि दुकानात डाह्याभाई स्वत:, बच्चुभाई शहा (पूर्वी उल्लेख आला आहे ते) आणि डॉ. नटुभाई पटेल बसले होते. आवाज नटुभाईनी दिला होता. स्वामीजी म्हणाले, डॉक्टर ही आम्हाला शेवटची बस आहे आणि तीची वेळ होत आली. काही काम असेल तर उद्या येऊन भेटू. डॉ. नटुभाई म्हणाले, स्वामीजी इकडे या आणि बसा. बस गेली तर जाऊ द्या. मी माझ्या जीपने तुम्हाला आश्रमावर पोहचवून देईन. पण आम्ही आता एका मोठ्या प्रश्नात अडकलो आहोत. काही रस्ता सुचत नाही. डोक्याचा पार भुगा झाला आहे विचार करून. गेले दोन अडीच तास झाले आम्ही विचार करतो आहोत. 'का काय झाले?' स्वामीजींनी विचारले, ''हे पत्र वाचा म्हणजे तुमच्या लक्षात येईल. नटुभाईंनी स्वामीजींच्या हातात एक अन्तर्देशीय पत्र ठेवले. स्वामीजींनी वाचले आणि वाचून होताच तत्क्षणी म्हणाले, यात काय मोठेसे? सहज सोपा रस्ता आहे. तिघे आ वासून स्वामीजींकडे पाहात राहिले. गेली दोन अडीच तास आम्ही डोके धरून बसलो आहोत आणि तुम्ही वाचल्या-वाचल्याच म्हणत आहात, 'यात काय मोठेसे?' सोपा रस्ता आहे. स्वामीजींनी त्यांचा प्रश्न कसा सोडवला हे समजून घेण्यासाठी त्या पत्रातील मजकुर आणि त्यामागची पार्श्वभूमी समजून घेतली पाहिजे. डाह्याभाई सोनी (सोनी म्हणजे सोन्याचांदीचा आणि दागिने बनवून विकण्याचा व्यवसाय. आर्थिकरित्या अगदी संपन्न परिवार.) त्यांचा मावसभाऊ तो पण तसाच. तोच व्यवसाय आणि तशीच आर्थिक संपन्नता. त्या मावसभावाचा १८/२० वर्षाचा तरूण मुलगा व्यावसायिक कामासाठी सूरतला गेला असता सूरतहून तीन वर्षापूर्वी अचानक बेपत्ता झाला. कोठे काहीच पत्ता लागेना. पोलीस, मांत्रिक, तांत्रिक, ज्योतिषी, बुवा-भगत सर्व उपाय करून झाले त्याला शोधण्यासाठी जवळ-जवळ रूपये ५० हजार खर्च झाले होते. कोणी सांगितले तो हरिद्वारला गेला, साधु झाला. हे लोक हरिद्वारला गेले. सगळ्या आश्रमात तपास केला. कोणी सांगितले कुंभमेळ्यात सापडेल. काही नाही. पैशाचे पाणी झाले. सगळे निराश झाले आणि अशा या पार्श्वभूमीवर ते अन्तर्देशीय पत्र आले होते. ज्यात लिहिले होते की, तुमचा मुलगा आमच्या ताब्यात आहे. मुलगा परत पाहिजे असेल तर पांच तोळे सोने (त्यावेळी तोळ्याचा भाव रू. चार हजार तोळा होता) आणि रूपये दहा हजार रोकडा पालनपूरला जायच्या रस्त्यावर अमूक गावाच्या बाहेर रोडपासून शंभर मीटर दूर जे वडाचे झाड आहे त्या झाडाखाली अमूक अशा पेटीत (मुलांची शाळेत जायच्या दप्तराची ॲल्युमिनिअमची पेटी त्या काळी होती) अमूक दिवशी, इतक्या वाजता ठेवून द्यायची. आम्हाला हे सगळे मिळाल्यावर मुलाला आम्ही पाठवून देऊ. जर पोलिसांची मदत घेतली तर मुलाला मारून टाकू.'' असा हा सगळा पत्रातला मजकुर डाह्याभाई म्हणाले, स्वामीजी आम्हाला तिघांना वाटते की कोणीतरी ओळखीच्या पैकी, नातेवाईकां पैकी ज्यांना आमच्या या मुलाबद्दलच्या भावना चांगल्या माहीत आहेत त्याने आमच्या भावनांचा फायदा घेऊन आम्हाला उल्लू बनवून पैसे काढण्यासाठी हे पत्र

लिहिले आहे. त्यामुळे ते कचऱ्याच्या टोपलीत फेकून द्यावे. पण दुसरा विचार असा येतो की, खरच त्याच्याजवळ असला तर? आपण सोने आणि पैशाच्या लोभात मुलाला गमवू. आतापर्यंत पन्नास हजार गेले. अजुन हे गेले तर गेले. मनात डंख तर राहाणार नाही. पत्र लिहिणारा या भागातलाच असावा. पत्र जरी अहमदाबाद पोस्टातून आले आहे तरी. कारण त्याने जी जागा निवडली आहे ती, रोडपासून शंभर फुटावरील वडाचे झाड तेथून सुमारे २००/३०० फुटावर एक टेकडी आहे आणि त्या टेकडीवर खूप मोठे मोठे दगड आहेत. त्या दगडाआड लपून कोणी पाहात असेल तर आपणास तो दिसणार नाही. त्याला आपण दिसू. त्यामुळे पोलीस जरी गेले तरी तो साफ पळून जाऊ शकतो. टेकडीच्या दुसऱ्या बाजुने उतरून शिवाय तेथे गुराखी पण येतात गुरे चरायला. त्यातला कोणी एक असेल तर कसे पकडणार? जागा अशी निवडली आहे की पोलीस काही करू शकणार नाही. पत्रांच्या शिक्क्यावरून, अक्षरावरून पण काहीच कळत नाही की कोणी पाठवले, कुठून पाठवले मनाची द्विधा स्थिती झाली आहे. पैसे देऊन मुलगा आला नाही तर ती फसवणुक, नाही दिले तर तो पण मनाला चुटपुटा त्याच्याकडे खरोखर मुलगा असेल तर? बरे ही गोष्ट आम्ही घरातल्या स्त्री वर्गाला कळू दिली नाही. त्यांना कळले तर काय गोंधळ होईल त्याची तर कल्पना करवत नाही. अशा पेचप्रसंगात फसलो आहोत आणि तुम्ही म्हणता त्यात काय मोठेसे? आता सांगा यावर उपाय-स्वामीजी म्हणाले, डाह्याभाई आम्ही एक तऱ्हेने तुम्हाला जुगार खेळायला सांगतो आहोत. कारण बाजी उलटली तर याच्या दुप्पट द्यायची तुमची तयारी आहे? अवश्य देऊ, सांगा तरी काय करायचे ते? स्वामीजी म्हणाले, मग तुम्ही सांगितल्या दिवशी, सांगितल्या वेळी, सांगितल्या ठिकाणी जा. सांगितल्याप्रमाणे पेटीत ठेऊन या. पेटीत सोने की नोटा यापैकी काही ठेवायचे नाही. फक्त पत्र ठेवायचे. त्या पत्रात लिहायचे की तुम्ही जे पांच तोळे सोने मागीतले त्याच्या दुप्पट म्हणजे दहा तोळे सोन व दहा हजाराच्या ऐवजी वीस हजार देखील आम्ही मुलासाठी द्यायला तयार आहोत. पण आमची अडचण अशी आहे की, असेच एक दुसरे पत्र दुसऱ्या गँगकडून आम्हाला आले आहे आणि त्यांचेही असे म्हणणे आहे की मुलगा त्यांच्या ताब्यात आहे. त्यामुळे आम्हाला कळत नाही की मुलगा खरोखर कोणाजवळ आहे. तुमच्याजवळ की त्यांच्याजवळ? म्हणून कृपया तुम्ही मुलाचा आताचा फोटो आणि त्याच्या अक्षरातील चिठ्ठी आम्हाला लागलीच पाठवा. आम्ही ठरलेल्या रकमेपेक्षा दुप्पट देऊ.'' उत्तर आले तर दुप्पट द्यायची तयारी ठेवा. नाही आले तर समजा त्याचा डाव उलटला. तुम्ही मूर्खपण बनणार नाही आणि तुमच्या मनात सलही राहणार नाही.

स्वामीजींचा हा चातुर्यपूर्ण युक्तीवाद ऐकून तिघही म्हणाले, वा! कमाल आहे स्वामीजी तुमची. काय रस्ता काढला आणि तुम्हाला हे इतक्या पटकन सुचले कसे? स्वामीजी म्हणाले, लहानपणापासून कोडी सोडवत होतो म्हणून.

७. नाठाळाचे माथी हाणू काठी

प्रसिद्ध संत तुकोबांच्या उक्तीप्रमाणे नाठाळाचे माथी हाणू काठी किंवा संत तुलसीदास रामचरितमानस या ग्रंथात उत्तरकांड मध्ये म्हणतात *अति संघरषन जौ कर कोई। अनल प्रकट चंदन ते होई।।* सहाणेवर थोडे पाणी टाकून चंदन घासले तर गंध तयार होईल सुगंध येईल कारण शीतलता सुगंध त्याचा जन्मजात स्वभाव आहे. पण या उलट वर चौपाईत म्हटल्याप्रमाणे चंदनाच्या लाकडावर दुसरे लाकूड घासले तर काय होईल? ठिणगी पडेल. अग्नी प्रकट होईल. चंदन शीतल असेल पण त्यातून प्रकट होणारा अग्नी नक्कीच शीतल नसणार.

स्वामीजी वेळप्रसंगी सात्त्वीक संतापाने रूद्रावतार पण धारण करतात तर काही वेळा शांत राहून अचूक शब्दांनी समोरच्याला खिंडीत गाठतात. ते गंमतीने म्हणतात बाजीप्रभु देशपांडे सारखे समोरच्याला ''पावन खिंडीत'' कोंडायचे; न पुढे येता येते न मागे परत जाता येते, तेथेच ''धराशायीच'' पडणार. स्वामीजींनी आपला सात्त्वीक संताप बाहेर प्रकट न होऊ देता पण नाठाळांच्या माथी काठी कशी मारली ते मजेचे प्रसंग वाचा.

एकदा स्वामीजी गुरूमहाराजांबरोबर दार्जिलिंगला गेले होते. आठवड्याभरानंतर छपरा आश्रमात आले. त्यावेळी आश्रमावर एक तरूण ब्रह्मचारी रहात होता. लहानपणापासून अनेक वर्ष हृषिकेशला वेगवेगळ्या आश्रमात राहून संस्कृत शिकलेला पण व्यवहारज्ञान काहीच नाही, असणार तरी कोठून? बालपणापासून संस्कृत विद्यालयात/आश्रमात त्यानंतर त्याला अध्यात्माकडे वळावेसे वाटले आणि इकडून तिकडे भटकत छपऱ्याला गुरूमहाराजांजवळ आला, राहिला सेवा केली. मूळ नाव न देता आपण त्याला वैशाखानंद या नावाने संबोधू.

बाबा आश्रमावर पोहचले त्यावेळी हा वैशाखानंद बाबांना प्रणाम करायला बाबांच्या खोलीत गेला. त्याच्यावर नजर टाकताच बाबा, ''अन्तर्यामी महापुरूष'' स्वामीजींना म्हणाले, ''अरे सविता इसकी तो बाबाके प्रति श्रध्दा हिल गई है। अंदरसे विचलीत हो गया है। क्या बात है?'' बाबांनी त्याला ज्यावेळी खडसावून विचारले, त्यावेळी तो म्हणाला, की तीन-चार दिवसापूर्वी एक कबीर पंथी तरूण आश्रमावर त्याच्याशी वादविवाद करून गेला आणि असे समजावून गेला की कबीरपंथाशिवाय दुसऱ्या कोणत्याही पद्धतीने आत्मज्ञानाची प्राप्ती शक्य नाही. वर्तमानकाळात फक्त त्याचेच गुरू खरे आत्मज्ञानी संत आहेत, त्यावर बाबा त्याला म्हणाले, ''तर मग तू त्याच्या गुरूकडे जाऊ शकतोस, येथे तुला कोणी बांधून ठेवले नाही. आत्ताच निघून जा'' त्यावर तो गयावया करीत विनवण्या करीत चूक झाली क्षमा करा असे म्हणत राहिला.

आठवड्याभरानंतर पुन्हा एकदा बाबा स्वामीजींसह दुसऱ्या गावी गेले. चार-पाच दिवसांनी परत आले आणि शब्दश: वरचाच प्रकार पुन्हा. वैशाखानंद नमस्कार करायला आला आणि त्याच्यावर दृष्टी जाताच बाबा पुन्हा उद्गारले, 'फिर वही बात' त्याने सांगितले तो तरूण पुन्हा आला होता आणि पुन्हा वाद घालून त्याची श्रद्धा हलवून गेला.

ते दिवस उन्हाळ्याचे होते आणि आश्रमाच्या काही कामासाठी स्वामीजी सायकल वरुन छपरा शहरात आले होते. भर दुपारची वेळ. कलेक्टर कचेरीत कोणाला तरी भेटायला जायचे होते आणि अचानकच माँ

भगवतीचा आदेश आला आताच तत्काळ मागे वळ आणि आश्रमावर परत जा. कसलाही विचार न करता स्वामीजी तडक मागे फिरले. आश्रमावर पोहोचले. सायकल ठेवली. हातपाय धुतले, गुरूमहाराजांजवळ गेले. बाबा (गुरूमहाराज) आश्रमात असलेल्या शिसमच्या झाडाच्या सावलीत लाकडी पलंग टाकून त्यावर बसले होते. बाबांनी विचारले, ''एवढ्या उन्हात परत का आलास?'' स्वामीजी उत्तरले, माहित नाही बाबा अचानकच भगवतीचा आदेश झाला की आश्रमावर परत जा. बाबा पण काही क्षण विचारात पडले आणि तितक्यात वैशाखानंद धावत बाबांजवळ आला आणि म्हणाला तो येतो आहे तोच तो कबीरपंथी तरूण ज्याने त्याला दोनदा विचलित केले होते आणि आता तो थेट बाबांशी वादविवाद करायला येत आहे. तसे तो सांगून गेला होता, इतक्यात तो तरूण आश्रमात आला आणि मानभावीपणे कृत्रिम प्रणाम करून बसला. स्वामीजींनी विचारले, बोला तो तरूण म्हणाला काही नाही महाराजांना प्रणाम करण्यासाठी आलो होतो दुसरे काही काम नव्हते. स्वामीजींनी त्याच्याकडे वेधक नजरेने रोखून पहात म्हटले, ''खोटे बोलतो आहेस तू जे मनात आहे ते सांगून टाक'' असे म्हणताच नागाला डिवचताच तो जसा फणा काढतो तसा तो तरूण बाबांकडे कटाक्ष टाकीत म्हणाला, लोक आपल्याला आत्मज्ञानी म्हणवतात पण कबीरपंथाशिवाय आत्मज्ञान शक्य नाही तर अशा तथाकथित आत्मज्ञानी म्हणवणाऱ्यांना तर गोळी घातली पाहिजे, ही भाषा त्याची. स्वामीजी तर मानसशास्त्राचे चांगले जाणकार. भल्याभल्यांना पुरून उरणारे, त्याच्या त्या अनर्गल विधानाने चिडून न जाता उलट अगदी थंडपणे म्हणाले, मग बंधुराया हातात हे नोटबुक आणण्याऐवजी सरळ पिस्तुलच आणायचे होते ना! घातली असती आम्हा लोकांना गोळी. तुला अडवणारे पण येथे कोणी नव्हते आणि वरून हसत म्हणाले, बघ बाबांच्या अंगावर तर साधी बंडी देखील नाही; आमच्याही नाही. गोळीला काहीच अडचण नव्हती. स्वामीजींच्या या थंड उत्तराने तो तरूण गोंधळला. त्याला वाटले होते असे प्रक्षोभक शब्द बोलल्यावर स्वामीजी व गुरूमहाराज चिडतील. मग आपल्याला वादविवाद करता येईल. झाले उलटे गुरूमहाराज तर एकही शब्द बोलले नाहीत वर स्वामीजींनी तर अगदी बर्फाचे थंड पाणी ओतून दिले.

स्वामीजी शांतपणे म्हणाले, ''हे बंधू आम्हाला एवढेच सांग की, आम्ही असे काय बिघडवले आहे की तू गोळी घालण्याची भाषा करतोस. त्यावर तो तरूण म्हणाला, 'माझ्या कानी असे आले आहे की येथे एक आत्मज्ञानी संत राहतात. पण कबीरपंथाशिवाय जर आत्मज्ञान शक्यच नाही तर मग असा खोटा प्रचार का? स्वामीजी पुन्हा शांतपणे म्हणाले, काय म्हणालास तू की कबीरपंथाशिवाय आत्मज्ञान शक्यच नाही. त्यावर तो तरूण ठामपणे म्हणाला, होय कबीरपंथाशिवाय आत्मज्ञान शक्य नाही. स्वामीजी म्हणाले ठिक आहे आता आम्हाला सांग की हा कबीरपंथ संत कबीरांच्या पण आधी होता की त्यांच्या नंतर सुरू झाला? स्वामीजींच्या अज्ञानाची किव करीत तो उत्तरला अर्थातच संत कबीरांच्या नांवावरून हा पंथ नंतर सुरू झाला. अच्छा याचा अर्थ असा होतो की स्वत: कबीर कबीरपंथी नव्हते. 'म्हणजे काय?' त्या तरूणाने गोंधळून विचारले. म्हणजे असे की हा पंथ कबीरानंतर सुरू झाला तर याचा अर्थ स्पष्ट आहे की स्वत: कबीर कबीरपंथी नव्हते! बरोबर? तो घुटमळला. स्वामीजींच्या या अनपेक्षीत प्रश्नाचे काय उत्तर द्यावे हे त्याला कळेच ना. शेवटी 'हो' म्हणाला, मग हसत स्वामीजी त्याला कोंडीत पकडत म्हणाले, जर तू हे स्विकारतो आहेस कबीर स्वत: कबीरपंथी नव्हते तर तू मगाशी केलेल्या विधानाप्रमाणे स्वत: कबीर आत्मज्ञानी संत नव्हते आणि ते जर आत्मज्ञानी संत होते असे तुला म्हणायचे असेल तर आत्मज्ञानी होण्यासाठी कबीरपंथी होणे गरजेचे नाही. आता या दोन पैकी तुला कोणते विधान स्वीकार्य आहे. कबीर आत्मज्ञानी नव्हते हे विधान की आत्मज्ञानी व्हायला कबीरपंथी होणे गरजेचे नाही हे विधान. तो तरूण गोंधळून बुचकळ्यात पडला. आपल्यावर असा उलटा वार होईल हे त्याला अगदी अनपेक्षित होते. त्याने स्वामीजींना विचारले, स्वामीजी तुम्ही काय शिकला आहात? स्वामीजी त्यावर

हसत उत्तरले. आम्हाला सही करता येते, एवढे सांगणे पुरेसे आहे. त्यावर तो तरूण म्हणाला, स्वामीजी मी हरीद्वार, हृषिकेश, वाराणसी (बनारस), प्रयाग अयोध्या अनेक ठिकाणी अनेक आश्रमात गेलो तेथल्या मंडलेश्वर, महामंडलेश्वरांशी दोन-दोन, तीन-तीन तास वाद घालून त्यांची बोलती बंद केली आणि येथे तर तुम्ही फक्त दोनच प्रश्नात मला चितपट केले.

स्वामीजी म्हणाले, बाकीच्या गोष्टी सोड. आम्हाला फक्त एवढेच सांग तुला तुझ्या गुरूंनी आत्मज्ञानाची काय व्याख्या सांगितली आहे? त्यावर तो तरूण म्हणाला, ''आत्मज्ञानी को सबकुछ आना चाहिये, सब चीजका ज्ञान चाहिये.'' स्वामीजी म्हणाले, ''ठिक आहे आता आम्ही तुझ्या गुरूशी या विषयावर चर्चा करायला येतो पण आमची अट अशी आहे की आम्ही हिंदी किंवा इंग्रजीतून बोलणार नाही आम्हाला फ्रेंच आणि जर्मन भाषा पण येते. (खरे तर ही थाप. कॉलेजमध्ये असताना स्वामीजी थोडेफार जर्मन आणि फ्रेंच शिकले होते पण न बोलता येत होते न वाचता) आम्ही त्या भाषेत त्यांच्याशी बोलू आणि त्यांनी त्याच भाषेत त्यावर उत्तर द्यावे..'' तो तरूण गोंधळून म्हणाला, पण त्यांना तर फ्रेंच आणि जर्मन भाषा येत नाही. स्वामीजी म्हणाले, का? तुझे गुरू जर आत्मज्ञानी संत आहेत असे तू म्हणतोस आणि आत्मज्ञानीला सगळे काही आले पाहिजे असेही म्हणतोस तर त्यांना फ्रेंच, जर्मनच काय चीनी जपानी पण आले पाहिजे. तेलगु, तामीळ, कन्नड पण आली पाहिजे. मेडिकल, इंजिनिअरिंग, आर्किटेक्चर, गायन-वादन-नर्तन-लेखन-शिल्पकला हे ही ज्ञान असले पाहिजे. तो तरूण स्वामीजींच्या भडिमारापुढे तोंड वासून पाहात राहिला आणि पटकन बोलून गेला, ''इसका मतलब गुरूमहाराजने हमको आत्मज्ञान का अर्थ गलत बताया, हमे बेवकूफ बनाया!'' स्वामीजींनी त्याच्याकडे पाहात शेवटचा डावपेच टाकला. म्हणाले, आम्हाला संत कबीरांबद्दल आदर आहे. त्यांची काही भजन आम्ही आश्रमातून लवकरच छापणाऱ्या पुस्तकात घेणार आहोत. ते ऐकताच तो तरूण भान विसरून उत्साहाने बोलून गेला, 'स्वामीजी कबीरांच्या भजनांपेक्षा आमच्या दादागुरूंची भजने जास्त छान आहेत. स्वामीजी त्याच्याकडे रोखून पाहात म्हणाले, याचा अर्थ असा होतो की, जे शब्दज्ञान तुझ्या दादागुरूजवळ होते तसे शब्दज्ञान संत कबीराजवळ नव्हते आणि म्हणून संत कबीर तुझ्या व्याख्येप्रमाणे आत्मज्ञानी नव्हते. कारण त्यांना सबकुछ येत नव्हते. भजने देखील चांगली लिहिता आली नाहीत. आता मात्र तो तरूण सपशेल हवालदिल झाला. घाबरून त्याला दरदरुन घाम फुटला. काही न बोलता मुकाट्याने उठून बाबांना प्रणाम करून स्वामीजींसमोर हात जोडून निघून गेला. त्यानंतर बाबांनी वैशाखानंदाला हाक मारली आणि त्याला म्हणाले, की जर याचे गुरू खरोखर आत्मज्ञानी असतील आणि साधनेमधली काही जाण असेल तर याला त्यांच्या आश्रमात पाय देखील ठेऊ देणार नाहीत. कारण त्याने स्वमुखाने स्पष्टपणे गुरूनिंदा केली आहे आणि आता सविताने त्याला असे गुंतवले आहे की लवकरच तो बाबांची शरण मागायला आश्रमावर येईल आणि घडले तसेच. पंधरा दिवसांनी तो आला बाबांना कळवळून विनंती केली, दिक्षा देण्यासाठी प्रार्थना केली. बाबांनी नकार दिला. परत पाठविले. त्यानंतर स्वामीजींना कळले की तो जवळ-जवळ तीन वर्ष सतत बाबांजवळ येऊन प्रार्थना करत होता.

छपरा शहरातील स्वामीजींकडून ऐकलेला दुसरा मजेशीर प्रसंग! हरिहरप्रसाद गुप्ता नावाचे एक किराणा व्यापारी. खरे तर त्यांनी साधना बाबांच्या मार्गदर्शनाखालीच केली होती. पण त्यावेळी बाबा गृहस्थाश्रमात होते आणि बाबांचे भांड्यांचे दुकान होते. हा हरिहरप्रसाद वाचाळ आणि वायफळ माणूस. शिवाय प्रतिष्ठेसाठी हपापलेला. त्याला इतर लोकांनी म्हणावे की त्याची साधना खूप झाली आहे, असा त्याचा प्रयास. पण मग गुरू म्हणून नाव कोणाचे सांगायचे? बाबा गृहस्थाश्रमात. भांड्याचे दुकानदार त्यांचे नाव कसे घेणार? एकदा छपरा शहरात एका आश्रमात हरिद्वारहून एक वयस्कर संन्यासी आले होते आणि हरिहरप्रसादला त्याच्या प्रश्नाचे उत्तर

सापडले. यांना गुरू करून घेऊ. यांचे नांव सांगता येईल. झाले तसेच स्वामीजींना ही सगळी माहिती कळाली. बाबांशी द्रोह करणाऱ्या व्यक्तीला एकदा चांगला धडा शिकवायचा हे त्यांनी मनाशी नक्की केले आणि एके दिवशी अनायास ती संधी चालून आली. हे सद्‌गृहस्थ एकदा आश्रमावर आले. गप्पांच्या ओघात स्वामीजींना म्हणाले, माझ्या जीवाचे शिवाशी मीलन झाले, विलय झाला आहे आता माझ्यात जीव उरला नाही. स्वामीजींनी अचूक संधी साधली आणि विचारले की एखादा माणूस मेला की म्हणतात, त्याचा जीव निघून गेला, तो निर्जीव झाला. तसा जर तुमच्यात जीव नाही तर तुमच्या या जीवंतपणाचे रहस्य काय? जीव नाही तर शरीराचे संचालन कोण करतो? त्याने त्वरेने उत्तर दिले. 'स्वयं तो परमात्मा'. ठीक आहे, आता असे सांगा की तो परमात्मा आपल्या शास्त्रात सांगीतल्याप्रमाणे जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी सगळ्यात व्याप्त आहे बरोबर ना! 'होय' मग तो लाकडात देखील आहे, दगडात पण आहे तसा तो त्या निर्जीव शरीरात प्रेतात पण व्याप्त असलाच पाहिजे नाही का? ''हो बरोबर.'' आणि गडी येथेच अडकला. मग आम्हाला आता एवढेच सांगा तुमच्यात आणि प्रेतात आता नेमका फरक काय? कारण प्रेतात जीव नाही तसा तुमच्यात पण जीव नाही, प्रेतात परमात्मा व्याप्त आहे तसा तुमच्यात पण व्याप्त आहे तर मग दोघांत आता नेमका काय फरक उरला आहे? आणि मग आवाजाला धार चढवत स्वामीजी म्हणाले, ''जर फरक नसेल तर आताच चिता रचून त्यावर तुम्हा बसवून पेटवून देऊ का?'' ''बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर'' नेमका फरक काय आहे ते सांगा नाही तर चला चितेवर. हरीप्रसादची चांगली तत पप झाली. कशीतरी बाबांची रजा घेत स्वामीजींना म्हणाले, आता मला वेळ नाही पुन्हा भेटू त्यावेळी सांगेन.

आठवड्याभरानंतर कांही कामासाठी स्वामीजी छपरा शहरात आले असता यांचे दुकान ज्या गल्लीत होते त्याच रस्त्याने जाणे झाले. त्यानी स्वामीजींना हाक मारली आणि हाताशी शेजारीच ठेवलेली दोन पुस्तके काढून म्हणाले, 'तुम्ही हे घेऊन जा यात तुमच्या त्या दिवशीच्या प्रश्नाचे उत्तर मिळेल. स्वामीजी म्हणाले, सध्या आमच्या जवळ वाचनासाठी वेळच नाही. नंतर केव्हातरी घेऊन जाऊ. पण जाता जाता एक गोष्ट सांगतो. एक अतिशय दरिद्री माणसाच्या घरात चुकून एक चोर शिरला. हा जागाच होता. चोराची खडबड ऐकून उठून बसला. चोर घाबरून पळ काढणार तोच तो त्याला म्हणाला, बाबारे घाबरून पळून जाऊ नकोस. मी तुला काही करणार तर नाहीच उलट तू अंधारात शोधतो आहे त्यापेक्षा मी कंदिल पेटवून देतो त्या उजेडात शोध. मी इतकी वर्षे या घरांत राहतो आहे अजून मलाच कांही सांपडले नाही तुझ्या नशिबाने तुला काही सांपडले तर अर्धे तू घेऊन जा आणि अर्धे मला देऊन जा. क्षणभर थांबून शांतपणे स्वामीजी पुढे म्हणाले, या पुस्तकातुन त्यादिवशीच्या प्रश्नाचे उत्तर आम्ही शोधणे म्हणजे तुम्ही आम्हाला कंदिल पेटवून देण्यासारखे आहे. 'कांटो तो खून नही' इतके सुन्न झाले ते गृहस्थ. स्वामीजी त्यांना त्याच स्थिती सोडून शांतपणे निघुन गेले.

आश्रमावर एकदा एक तरूण त्याचे ज्ञान पाजळण्यासाठी साधुसंन्याशांपेक्षा आपल्याला अधिक ज्ञान आहे हे दाखविण्यासाठी रामचरितमानस हा ग्रंथ घेऊन आला आणि स्वामीजींना म्हणाला, स्वामीजी या बालकाण्डात एक चौपाई आहे. त्याचा मला अर्थ लागत नाही, समजत नाही. जरा समजून सांगाल का? त्याचा हेतू पटकन स्वामीजींच्या लक्षात आला. त्याला म्हणाले, अरे वा वा! तू तर शेकडो चौपाई वाचून एवढा पुढे गेला जेथे तुला ती चौपाई कळाली नाही. याचा अर्थ असा होतो की याच्या आधीच्या चौपाई तुला चांगल्या कळाल्या. आम्हाला तर अजून पहिलीच चौपाई नीट कळाली नाही. आता तू जरा पहिल्या चौपाईचा अर्थ आम्हाला नीट समजावून सांग मग त्यापुढची चौपाई. तो तरूण उठला आणि न बोलताच चालायला लागला.

एके दिवशी स्वामीजींची तब्येत ठीक नव्हती. डोके दुखत होते. म्हणून झोपून होते. बाहेर बसून वैशाखानंद आश्रमावर आलेल्या कांही लोकांशी बोलत होता. तेवढ्यात एक आगंतुक तेथे आला.

वैशाखानंदाने त्याला विचारले, बोला कोठून आलात? आपले नांव काय? त्यावर तो तरूण मोठ्या आढ्यतेने म्हणाला, ''मी तर आत्मा आहे. काय नांव असणार माझे?'' त्याचे ते उत्तर ऐकून वैशाखानंद आणि इतर लोक गोंधळले. कोणाला काही सुचेना त्याला काय सांगावे? आणि त्याला तेच हवे होते आपले, आपल्या पंथाचे, संप्रदायाचे म्हणणे सांगण्यासाठी. परिस्थिती लक्षांत घेऊन स्वामीजी बाहेर आले आणि एकाला म्हणाले, ''तेथून ती चप्पल उचला आणि ठेवून द्या याच्या थोबाड्यात. दोन्ही बाजूला दोन.'' ते ऐकताच तो तरुण चवताळला काय बोलताहेत? स्वामीजी शांतपणे म्हणाले, ''अरे बाबा तू तर आत्मा तुला थोडीच चप्पल लागणार आहे.'' नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः।''. आम्ही तर फक्त चप्पलच मारायला सांगितली. ते ऐकताच तो तरुण वरमला नांव गांव सांगितले. त्याचा आत्मा अंतर्धान पावला.

आश्रमाशी संबंधित एका सज्जनाच्या ओळखीने एक गृहस्थ बाहेर गांवाहून रात्री आश्रमावर आला. सकाळचे नित्यकर्म आटोपून बाबांजवळ जाऊन बसला. बाबांना काही सांगू लागला. बाबा म्हणाले, 'सविता को बुलाओ' बाबा कधीच कोणाशी वाद घालायचे नाहीत. त्यांचे लिखित प्रबोधिनी भाष्य वाचले तर अध्यात्मातल्या त्यांच्या अत्यंत गहन ज्ञानाने माणूस विस्मित होतो. पण गुरूमहाराज कबीरांच्या त्या दोह्यात सांगितल्याप्रमाणे ज्यांना कस्तुरी म्हणजे काय तेच माहित नाही त्यांच्यापुढे कस्तुरीची पोटरी सोडायची नाही. अनावश्यक विषयावर बाबा बोलणे टाळायचे म्हणून त्यांनी सांगितले सविताला बोलव. बाबा म्हणाले, ''हा गृहस्थ काय म्हणतो ते ऐक आणि त्याला योग्य ते समजून सांग'' स्वामीजी त्या गृहस्थाकडे वळून म्हणाले, बोला, त्यावर तो म्हणाला, मी बाबांना विनंती केली की माझा स्विकार करा. मला संन्यास दिक्षा द्या आणि आता कायमसाठी आश्रमातच राहू द्या आणि जर बाबांनी माझी विनंती स्विकारली नाही तर मग मी या जीवाच काही बरं वाईट करून घेईन. स्वामीजींच्या लक्षात पटकन सगळी परिस्थिती आली की एक तर याचे घरात पत्नीशी मोठ भांडण झाले असेल, त्रागा करून घरून निघाला, स्मशानवैराग्य आले आहे. तात्पुरते, मोठा आव आणून सांगतो आहे. स्वामीजी शांतपणे म्हणाले, जीवाचे बरेवाईट करण्यासाठी कोणता मार्ग पसंत कराल? पाण्यात बुडून मरायचे असेल तर हा पहा आश्रमा शेजारीच तलाव पाण्याने पूर्ण भरला आहे. गळ्याला फास लावायचा असेल तर हे बघा झाड पण आहे आणि दोरी पण आहे, रेल्वेखाली जीव द्यायचा असेल तर तो बघा समोरच रेल्वेचा ट्रेक आहे आणि घाई करा. ट्रेनची वेळ पण होत आली आहे. जर विष खाऊन मरायचे असेल तर मग मात्र थोडे थांबावे लागेल. शहरात कोणाला तरी पाठवून मागवावे लागेल. बोला कोणता रस्ता पसंत कराल? हे अगदीच अनपेक्षित उत्तर ऐकून तर तो तर असा हबकला की त्याच्या तोंडून शब्द फुटेना आणि मग स्वामीजींनी त्याला असे धारेवर धरले की त्याला पळता भुई थोडी झाली. थोड्यावेळाने मुकाट्याने उठून तो निघून गेला.

प्रवचनासाठी स्वामीजी यावलला (जि. जळगांव) गेले होते. प्रवचनासाठी तेथे एक शब्दपंडीत विद्वान स्वामीजींशी वाद घालण्यासाठी आला आणि म्हणाला, स्वामीजी या भगवद्‌गीतेच्या ९ व्या अध्यायात श्लोक ४ आणि ५ मध्ये इतका विरोधाभास आहे ते एकमेकांच्या इतके विरूद्ध आणि विसंगत आहे की कांही कळतच नाही. या दोन्हीपैकी कोणता श्लोक खरा! भगवंताची वाणी अशी कशी? काहीतरी चुकते आहे असे नाही का वाटत तुम्हाला? स्वामीजींनी त्यांच्याकडे पाहात शांतपणे म्हटले, ''तुमचा स्वतःबद्दल एवढा गैरसमज कां की तुम्ही हे दोन श्लोक' समजायला पात्र झाला आहात? एकच वाक्य एकच प्रश्न तो गृहस्थ अगदी थंडगार. काही न बोलता थोडावेळ बसून मुकाट्याने निघून गेला. स्वामीजी ज्यांच्या घरी उतरले होते ते तेथील विद्यालयाचे प्राचार्य आणि ज्ञानेश्वरीचे चांगले अभ्यासक. तो गृहस्थ गेल्यावर ते म्हणाले, स्वामीजी फार छान खोड मोडली या माणसाची. गावात कोणीही आले की हा पोहचतो त्यांच्याजवळ वादविवाद करायला. स्वतःला काय

समजतो कुणास ठाऊक. पण तुमच्या एकाच प्रश्नाने अगदी चितपट झाला.

एकदा बाबांबरोबर स्वामीजी गुजरातमध्ये खेडब्रह्माला गेले होते. माँ च्या मंदिरात दर्शन करून आल्यावर बाबांच्या शिष्याने त्यांना दुसऱ्या मंदिरात नेले तेथे दर्शन करून बाबा बाहेर आले. मंदिराच्या महंतने विचारले, आपण गिरी, पुरी, भारती, तीर्थ कोण? बाबा म्हणाले, यांतले कोणी नाही. म्हणजे तुम्ही मनमुखी संन्यासी, दशनामी पैकी नाही? मग कसला तुमचा संन्यास. तेवढ्यात स्वामीजी तेथे पोहचले आणि त्यांनी त्या संन्याशांला म्हणाले. तुमच्या प्रश्नाचे आम्ही उत्तर देतो. त्या आधी तुम्ही हे सांगा की तुम्ही काय शिकला आहात? आणि इतिहासाचा, पुराणांचा काय अभ्यास केला आहे? म्हणजे काय? म्हणजे असे की, हजारो वर्षापूर्वी लिहिल्या गेलेल्या पुराणात संन्यास शब्द आहेच कारण आपल्या सनातन संस्कृतीतच चार आश्रम सांगितले आहेत. त्यात चौथा आशि शेवटचा आश्रम संन्यासच. पुराणात संन्यास धर्माबद्दल त्याच्या आचारविचाराबद्दल खूप कांही सांगितले आहे पण आम्हाला एक तरी पुरावा दाखवा की त्यात कोणी संन्यासी गिरी, पुरी, भारती, तीर्थ वगैरे दशनामीपैकी एक कोणता तरी असेल. आदि शंकराचार्यांनी-आधी शंकराचार्यांच्या चार गाद्या स्थापल्या त्यातुन कालांतराने सात आखाडे (अगदी कुस्त्यांचेच! आपसात वादविवाद, भांडण, कुंभमेळ्यात बघा) त्यातुन कोण कोणत्या आखाड्याचे ते लक्षात यावे म्हणून दशनाम. आता हे सर्व अलिकडच्या ५०० वर्षाच्या काळातले. खरे तर त्यापेक्षाही अर्वाचीन मग वेदउपनिषद काळात पुराणकाळात जे संन्यासी होते त्यांना तुम्ही मनमुखी हौसेने मौजेने-स्वेच्छेने झालेले संन्यासी म्हणणार? खरे तर त्यावेळी संन्यासचे दोन प्रकार होते. विदृत संन्यास आणि विदिशा संन्यास. विदृत संन्यास म्हणजे गृहस्थाश्रमातच साधना करून आत्मज्ञान झाल्यावर जगत् कल्याणासाठी गेरूवा वस्त्र धारण करून संन्यास घेणे आणि विदिशा संन्यास म्हणजे अशा अधिकारी संन्याशाजवळ राहून साधना करून आत्मज्ञान प्राप्तीसाठी तळमळणाऱ्या साधकाला बाहेरच्या जगाकडून उपसर्ग होऊ नये, त्याच्या घर परिवाराच्या लोकांनी त्याला जबरदस्तीने पुन्हा घरी नेऊ नये म्हणून आत्मज्ञान होण्याआधीच सुरक्षिता म्हणून संन्यासाची गेरूवा वस्त्र धारण करणे आणि असे हे संन्यासी तुमच्यासारखे गंजेडी भंगेडी नसायचे. तुम्ही संन्यासी असून तुमच्या हातात विडी आहे. दाखवा आम्हाला कोणत्या धर्मशास्त्रात संन्याशाला व्यसन करायला परवानगी आहे? तो महंत असा हादरला की बोलणे सुचेना. बाबांच्या लक्षात आले की सविता आता याचे बिनपाण्याने मुंडन करणार म्हणून हाक मारून बोलवून घेऊन गेले.

या सगळ्या गोष्टी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या अध्यात्माशी संबंधित पण घर गृहस्थीच्या बाबतीत? त्यातही स्वामीजी सहज कुशलतेने समोरच्याला नामोहरम करू शकतात. या संदर्भात एक गमतीदार प्रसंग.

बाबांच्या गृहस्थाश्रमातील नात्याने अगदी जवळचा परिवार. त्यात वाटणी वरून वादविवाद होत होते. दोन्ही पक्ष येऊन बाबांपुढे आपली गाऱ्हाणी मांडायचे. बाबा म्हणायचे मी संन्यासी या प्रकरणात लक्ष घालणे योग्य नाही. तुम्ही आपसात सोडवा किंवा दुसऱ्या कोणाची मदत घ्या. पण तरी त्यांनी ही जबाबदारी बाबांवरच टाकली. मध्यस्थ म्हणून तुम्हीच कोणाला पाठवा. बाबा म्हणाले ठिक आहे. एके दिवशी बाबांनी शिष्यवर्गापैकी दोन जण जे अतिशय व्यवहारकुशल, शांत व कोणत्याही अडचणीत मार्ग काढू शकतील असे. वाटे हिस्से करून देण्याचे पूर्वीचे अनेक अनुभव असे दोन ज्येष्ठ शिष्य त्यातील एक तर त्या परिवाराचे जावईच. सर्वात मोठे जावई. सर्वांना आदरणीय. दुसरी व्यक्तीपण नात्यांतीलच. दोन्ही पक्षांना हे लोक मध्यस्थ म्हणून स्विकार्य होते. पण का कोणास ठाऊक बाबांनी या दोघाबरोबरच स्वामीजींना पण जाण्याची आज्ञा केली आणि हे तिघे त्यांच्या गावी पोहोचले. बैठक सुरू झाली. एकीकडे मोठी सून व सासरे. मोठ्या सूनेचे नांव तर शान्तिदेवी पण सगळ्यांसाठी अशान्तिदेवी होती. मराठीत म्हण आहे तशी 'नांव सोनूबाई हाती कथलाचा

वाळा..' दुसरीकडे त्या वृद्धाचे छोटे पुत्र. बाप-बेट्याचे आधीपासूनच आपसांत कधीच जमले नाही.

बैठकीच्या सुरूवातीलाच शेतीचा विषय निघाला. गांवाच्या पूर्वेला सोळा बिघे आणि पश्चिमेला पंधरा बिघे आणखीन पण ३/४ बिघे शेती इकडे तिकडे होती. मध्यस्थांनी सांगितले यापैकी एका बाजुला शेती एकाने ठेवायची दुसऱ्या बाजूची दुसऱ्याने आणि एक बिघ्याचा फरक आणि जमीनीच्या किंमतीत असलेले अंतर समोरच्या व्यक्तीला द्यावेत. अशान्तिदेवीला कोणाच्या तरी चढविण्यावरून (बहुदा त्यांच्या भावाच्या) हे स्वीकार्य नव्हते. त्यांचा हट्ट प्रत्येक बाजूच्या जमीनीचा अर्धा-अर्धा भाग करा. आठ-आठ बिघे आणि साडेसात साडेसात बिघे. दोघी मध्यस्थांनी समजावल की शेती करण्याच्या दृष्टीने ते दोघांना अनुकूल होणार नाही. अस करू नका, पण अशान्तिदेवी आणि तिच्या सासऱ्याने एकच हट्ट धरला. सारखे अर्धे-अर्धे. मुलाने वेगळा प्रस्ताव ठेवला की जमीनीचे दोन भाग तुम्ही तुमच्या पद्धतीने ठरवा आणि मग त्यातला कोणता भाग पसंत करायचा तो पहिला अधिकार माझा किंवा मी माझ्या पद्धतीने दोन भाग करतो. पहिल्या पसंतीचा अधिकार तुमचा उरलेला भाग माझा. हाही प्रस्ताव योग्य होता. वास्तव होता. पण समोरच्यांना तेही मान्य नव्हते. वडिलांचे/सासऱ्यांचे म्हणणे, दोन भाग मी करेन आणि मीच ठरवीन की यातला कोणता भाग सुनेला द्यायचा व कोणता भाग मुलाला द्यायचा. इतक्या वर्षाच्या अनुभवाने मुलाच्या लक्षांत आले की यातही झुकते माप अशान्तिदेवीकडे जाणार आणि मग माझे व माझ्या परिवाराचे काय होणार? तीन मुलं दोन मुली सर्व अजून लहान. स्वाभाविकच मुलाने ते नाकारले. दोन्ही मध्यस्थांनी दोन्ही पक्षांना समजविण्याचा आटोकाट प्रयत्न केला पण सगळी मेहनत वाया गेली. आता निराश होऊन परत जायची वेळ आली. बाबांनी सोपविलेले काम करू शकलो नाही याची खंत वाटली.

त्या दोघांनी स्वामीजींकडे बघितले. आतापर्यंतच्या चर्चेत स्वामीजींनी भाग घेतलाच नव्हता. शांतपणे सगळे पाहात होते, ऐकत होते. त्यांनी विचारले स्वामीजी जायचे परत? स्वामीजी म्हणाले पाच मिनिट थांबा. त्यांनी वृद्ध गृहस्थाला विचारले. शेतीशिवाय भाग करण्यासारखे आणखिन काय आहे? हे घर, सोन्याचांदीचे दागिने, काही मोठमोठी भांडी वगैरे. घराचे काय करणार? घर चौकोनी बांधलेली. मधली जागा मोकळी सहा खोल्यांच घर. वृद्ध म्हणाले आणि अशान्तिदेवी पण म्हणाली, सहा खोल्यापैकी तीन आमच्या तीन यांच्या. स्वामीजी म्हणाले नाही चालणार. प्रत्येक खोलीच्या मध्ये एक भिंत बांधून प्रत्येक खोलीचे दोन समान भाग, तसेच दागिन्यांचे सोन्याची एक चेन याला एक त्याला हे पण चालणार नाही. पुढच्या वेळी आम्ही येऊ त्यावेळी सोनाराला पण बरोबर आणू. प्रत्येक चेनचे, बांगड्या पाटल्यांचे, पायातल्या साखळ्या पैंजणाचे अर्धे-अर्धे दोन-दोन भाग. तसच मोठ्या भांड्यांचे एक याला एक त्याला हे पण स्वीकार्य नाही. त्यांचे पण छिन्नी हातोडी वगैरे वापरून प्रत्येक भांड्याचे दोन तुकडे, बरोबर मधोमध. एक याचा एक त्याचा. वृद्ध गृहस्थ व अशान्तिदेवी अवाक होऊन पाहात राहिले. दोन्ही मध्यस्थ गृहस्थ हसले आणि म्हणाले अगदी बरोबर. पुत्र म्हणाला, मला पण स्वीकार्य आहे आता अशान्तिदेवी आणि वृद्धाची पंचाईत झाली. काही न बोलता स्वामीजी व मध्यस्थ उठून छपऱ्याला निघून गेले आणि पुन्हा जाण्याची वेळ पण आली नाही.

८. श्रोत्यांची कुवत

मी पूर्वी उल्लेख केल्या स्वामीजी संत्संगासाठी आलेल्या लोकांची बौद्धिक क्षमता आणि विषय समजण्याच्या पात्रतेचा अंदाज घेत तदनुसार विषयाची मांडणी करतात. त्याची कांही बोलकी उदाहरणे आपण पाहू.

स्वामीजी आंबाघाटा, जि. मेहसाणा येथील आश्रमावर वास्तव्याला असतानाचा प्रसंग. एके दिवशी संध्याकाळी आठ-दहा लोक स्वामीजींच्या दर्शनासाठी व सत्संगासाठी आले. स्वामीजींनी त्यांचे यथोचित स्वागत केले. स्वामीजींनी कधीच गरीब-श्रीमंत, शिक्षित-अशिक्षित वगैरे भेदभाव केला नाही. सगळ्यांसाठी समभाव. संत तुकाराम आपल्या अभंगात म्हणतात ना, ''दया करणे जे पुत्रासी। तेच दासा आणि दासी।'' त्याप्रमाणे एकदा एका मंत्र्याचा पी.ए. स्वामीजींजवळ येऊन म्हणाला, ''मंत्रीसाहेब येत आहेत.'' त्यादिवशी गुरूपौर्णिमा होती. अनेक लोक बसलेले होते. सत्संग चालू होता. स्वामीजी म्हणाले, ''या सर्वांबरोबर बसायची त्यांची तयारी असेल तर त्यांनी अवश्य यावे, त्यांच्या बसण्याची वेगळी व्यवस्था होणार नाही.'' हे थोडे विषयांतर झाले. आलेल्या लोकांना स्वामीजींनी विचारले, ''काय करता तुम्ही?'' ''आम्ही सर्वजण हिरा घासतो.'' ''सर्वजण अगदीच अल्पशिक्षित, पण काहीतरी सत्संगाचे चार शब्द कानी पडावे म्हणून उत्सुक. स्वामीजींनी त्यांना विचारले, ''संगमरवर दगडाच्या मोठ्या पाटीचा भाव जास्त की लहान पाटीचा?'' सर्वजण एका सुरात म्हणाले, 'मोठ्या पाटीचा.' सागवान लाकूड दर चौरस फूटाच्या हिशोबाने विकले जाते, तर ओंडक्याचा भाव जास्त की लहान तुकड्याचा? स्वामीजींच्या या प्रश्नाचे सर्वांना आश्चर्य वाटले तरी ते उत्तरले, 'मोठ्या ओंडक्याचा भाव जास्त' यावर स्वामीजी म्हणाले, मग आता आम्हाला सांगा तुम्ही हिरा घासता, हिरा घासल्याने तो तर आहे त्यापेक्षा थोडा लहान होतो खरे नां? 'हो'. मग त्याची किंमत कमी व्हायला पाहिजे की जास्त? सर्वजण क्षणभर गोंधळले आणि म्हणाले, घासलेल्या हिऱ्याची, पॉलीश केलेल्या हिऱ्याची तो लहान झाला तरी त्याची किंमत खूप जास्त वाढते. कारण त्याला चमक येते आणि आम्ही त्याला विशेष आकार देतो, पैलू पाडतो त्यामुळे तो थोडा लहान झाला तरी त्याची किंमत वाढते.' स्वामीजी त्यांना हसत हसत म्हणाले, हाच तुमच्यासाठी सत्संग. तुम्ही पण फक्त स्वत:च्या संसारापुरते पाहू नका. एकमेकांना-शेजाऱ्यापाजाऱ्यांना, गावातल्या लोकांना जमेल तशी मदत करण्यासाठी स्वत: झीजा. त्याने तुमची चमक वाढेल. समाजात किंमत वाढेल. सेवाकार्यात स्वत:ला घासल्याने ईश्वराशी जवळीक साधेल. सर्वांना खूप आनंद झाला. मला तर वाटते स्वामीजींच्या वाणीला माँ भगवतीने हिऱ्याप्रमाणेच पैलू पाडले असावेत. कारण प्रत्येकवेळी त्यांच्या वाणीतून चकाकणारा वेगळाच पैलू बाहेर येतो आणि तो झगमगणारा प्रकाश समोर बसलेल्या व्यक्तीवर प्रभाव पाडल्याशिवाय राहात नाही. मग ती व्यक्ती कोणीही असो.

स्वामीजी एकदा एका मुख्य पोस्टमास्तरकडे मुक्कामाला होते. पोस्ट ऑफिस आणि त्याचे सरकारी निवासस्थानमध्ये फक्त दरवाजा होता. पोस्ट ऑफिस दुपारच्या वेळी बंद असल्याने त्यावेळी सत्संगाला सगळा कर्मचारी वर्ग येऊ इच्छित होता. स्वामीजींची पूर्ण परवानगी घेऊन सगळे आले. स्वामीजींनी विचारले, ''तुमच्यापैकी पोस्टमन कोण आहे?'' दोघांनी हात वर केले. स्वामीजी म्हणाले, ''आधी आम्हाला आमच्या प्रश्नांची उत्तरे द्या मग आपण सत्संगाला सुरवात करू. तुम्ही पत्र-पाकीट-तार (त्यावेळी टेलिग्रामची व्यवस्था

होती. लोकांकडे साधे लॅण्डलाईन फोन पण नव्हते.) द्यायला लोकांच्या घरी जाता. एखाद्याकडे मनिऑर्डर पोहचवली त्यावेळी तो तुम्हाला गळ्याला मिठी मारून म्हणतो का की, तुम्ही किती चांगले आहात,'' ते म्हणाले, ''नाही असे कधीच कोणी करत नाही.'' बर याच्या उलट कोणती दु:खाची बातमी, निधनाची बातमी पोहचवली तर ते शिव्या देत मारायला अंगावर धावून येतात का?'' ''नाही असे कसे कोणी करेल?'' स्वामीजी त्या सर्वांकडे पहात म्हणाले, ''सुखी आनंदी प्रसन्न जीवन जगण्याचे आणि ईश्वरभक्तीचे रहस्य यात लपले आहे. प्रत्येकाला कळते की पोस्टमन त्याच्या खिशातून मनिऑर्डरचे पैसे देत नाही की कोणाला नोटीस देत नाही. तो कोणाला मुद्दाम आनंदाची बातमी किंवा दु:खाची बातमी पण देत नाही. तो फक्त पोहचवण्याचे काम करतो. तसेच तुमच्या जीवनात तुमच्या प्रारब्धकर्माने सुख आणि दु:खे येतात. जगातील कोणतीही व्यक्ती तुम्हाला सुख आणि दु:ख देत नाही. तुमच्या जीवनात येणारी प्रत्येक व्यक्ती फक्त पोस्टमनचे काम करते. तुमच्या नशिबात तुमच्या प्रारब्धानुसार असणारे सुख-दु:ख पोहचवण्याचे. ती स्वत: सुख देत नाही फक्त निमित्त बनते, स्वत: दु:खही देत नाही फक्त माध्यम बनते, पोहचविण्याचे पोस्टमनसारखे. पण जीवनाचे हे रहस्य समजून न घेतल्यास तुम्ही लोक ज्याच्यामुळे तुम्हाला सुख मिळते त्याच्याबद्दल तुम्हाला आपलेपणा-मोह-ममता-आसक्ती वाटू लागते. ज्यांच्यामुळे दु:ख मिळते त्याच्याबद्दल घृणा-कटूता-तिरस्कार वाटू लागतो. याचा परिणाम समोरच्या व्यक्तीवर काय होतो याचा विचार बाजूला ठेवा, पण या दोन्ही गोष्टी तुमच्यासाठी घातक ठरतात. कारण त्या 'बंधन' होतात. संसाराच्या मायापाशात बांधतात, ईश्वरापासून दूर ठेवतात. सर्वजण शांतपणे ऐकत होते. विषय सहजगत्या सर्वांच्या हृदयात उतरला.

स्वामीजी एकदा एका खेडेगांवात तेथील मंदीराच्या जीर्णोद्धारानिमित्त गेले होते. संध्याकाळी सत्संग प्रवचन. गांवातले बहुसंख्य लोक शेतकरी. शेती करणारे आणि गायी म्हशी चारणारे. सत्संगात स्त्री वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित. सर्व अशिक्षित किंवा अल्पशिक्षित होते. स्वामीजींनी नेहमीप्रमाणे साध्या प्रश्नोत्तराने सुरुवात केली. ''तुमच्याकडे सगळ्यांच्या घरी वीज (लाईट) आहे?'' 'हो'. समजा त्याचे बिल नाही भरले तर? मग सरकार लाईट कट करते. बर तुमच्या गावात नळाचे पाणी येते? 'हो'. ग्रामपंचायतीत पाण्याचे बिल पाणी पट्टी भरावी लागते? 'हो'. नाही भरली तर? ग्रामपंचायत पाणी बंद करेल. तुमची ग्रामपंचायत पाणी तयार करते? नाही. ती फक्त नदीचे किंवा बोअरचे पाणी तुमच्या घरापर्यंत पोहचवते आणि तरी पाणीपट्टी वसूल करते. तर मग ज्या ईश्वराने तुम्हाला हे पाणी दिले. त्याच्या पाणीपट्टीचे काय? तसेच वीज बील नाही भरले तर लाईन कट. पण तो ईश्वर तुम्हाला आयुष्यभर सूर्य चंद्राचा प्रकाश देतो आहे त्याचे बिल कोण भरणार? तुमच्या घरात कोणी आजारी पडला, तब्येत खूप बिघडली, श्वास घेता येत नाही त्याला ऑक्सिजन दिला तर दवाखान्याच्या बिलात त्या ऑक्सिजनचे पण बिल असते आणि त्या ईश्वराने तुम्ही गर्भात असल्यापासूनच मरेपर्यंत तुम्हाला ऑक्सिजन पुरवला त्याचे बिल?

एवढे बोलून स्वामीजी म्हणाले, ''आम्हाला सांगा तुमच्यापैकी कोणाकडे गायी-म्हशी आहेत? अनेक स्त्रियांचे हात वर झाले. ठिक आहे तुम्ही गाय-म्हैस पाळता. स्वाभाविकच त्या गायी-म्हशीच्या दुधावर तुमचाच हक्क. 'हो'. एका सुरात उत्तर. तुम्ही त्यांना चारायला नेतात तो चारा तुम्ही उत्पन्न केला? नाही. तो भगवंताने दिला. तुम्ही गायी-म्हशींना पाणी पाजता ते पाणी तुम्ही उत्पन्न केले? नाही ते पाणीही ईश्वराने दिले. मग चारापाणी ईश्वराने दिला तर दुधावर त्याचा हक्क नाही, त्यात त्याचा भाग नाही? एवढे मोठे गाव असून गावात एवढ्या गायी-म्हशी असून सकाळ संध्याकाळ आरतीला तूप विकत का आणावे लागते? तुम्ही घरीच फुलवाती करून तुपात भिजवून थोड्या तुपासह का नाही पाठवत? तेवढाच मंदीराचा खर्च कमी होईल ना? स्वामीजींचे हे बोलणे ऐकून सर्वांना आपल्या चूकांची जाणीव झाली. सर्वांनी माना खाली घातल्या आणि मग

स्वामीजींना वचन दिले की आम्ही आमच्या गावाच्या मंदीरासाठी आता बाहेरून तूप आणू देणार नाही.'' स्वामीजी म्हणाले, सकाळ संध्याकाळ मंदीरात सामूहिक भजन किर्तन आरती करा तसेच घरी पण करत जा. हीच त्याची पाणीपट्टी आणि लाईट बिल समजून नियमित भरणा करा. त्याने तुमचेच कल्याण होईल.

आता याच्या अगदी उलट उच्च शिक्षितांशी संवादाचे एक उदाहरण. एकदा एका उच्चशिक्षित पण तरी अध्यात्मात रस असलेल्या व्यक्तीने बाबांना प्रश्न विचारला, जीव ईश्वराला जाऊन मिळतो की ईश्वर जीवाचा आपल्यात विलय करून घेतो? ''गुरूमहाराज प्रसन्नतेने हसत म्हणाले, 'छान प्रश्न'. जीवाची एवढी क्षमताच नाही की तो त्या शिवाशी स्वत:हून एकरूप होऊ शकेल. ईश्वरच जीवावर कृपा करून आपल्यात सामावून घेतो.'' त्यावर मग त्याचा दुसरा प्रश्न. ''जर असे आहे तर मग जीवाने साधन भजन तरी का करावे? त्याची आवश्यकता काय?'' गुरूमहाराजांनी स्वामीजींकडे इशारा करीत म्हटले, 'याचे उत्तर हा देईल' गुरू आज्ञा शिरसावंद्य मानून स्वामीजींनी त्या जिज्ञासूला प्रतिप्रश्न केला, लोहचुंबक लोखंडाला आपल्याकडे आकर्षीत करेल की लोखंड लोहचुंबकाला? ''जिज्ञासू खूपच अभ्यासू आणि बुध्दिमान होता. मनापासून खळखळून हसत म्हणाला, ''तुमच्या या एकाच प्रश्नाने माझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळाली.'' स्वामीजींच्या सांगण्याचा उद्देश होता, लोहचुंबक लोखंडाला आपल्याकडे आकर्षीत करेल, ओढेल हे तेवढेच खरे पण त्यासाठी लोखंड त्या 'आकर्षण कक्षेत' पोहोचले पाहिजे आणि दुसरे ते मातीने, चिखलाने माखलेले किंवा आवरणात वेटाळलेले नसावे. निरावरण व शुध्द स्वच्छ असावे हीच गोष्ट साधकाला लागू पडेल.

एकदा एका विज्ञानाच्या अहंकाराने ठासून भरलेल्या तरूणाने बाबांना विचारले, ''तुम्ही आता प्रवचनांत जे आत्मा-परमात्म्याबद्दल सांगितले ते विज्ञानाने सिद्ध करणे शक्य आहे का? गुरूमहाराजांनी स्वामीजींकडे बोट दाखवित म्हटले, ते याला विचारा तो विज्ञानाचा विद्यार्थी आहे. त्या तरूणाने स्वामीजींकडे मोर्चा वळवला. स्वामीजी म्हणाले, ''आम्ही तुझ्या प्रश्नाचे उत्तर नंतर देतो. तू आधी आमच्या एका छोट्या प्रश्नाचे उत्तर दे. समज तुझ्या हातात पैशांचे पाकीट आहे आणि एखाद्या चोराने झडप घालून ते हिसकावले व तो पळाला. आता त्याला पकडण्यासाठी तू त्याच्या मागे धावला. अर्थातच त्याला पकडण्यासाठी तुला त्याच्यापेक्षा अधिक वेगाने धावावे लागेल. कदाचित सायकलीने. चोर जर सायकलीवर असेल तर तुला स्कुटर/मोटरसायकलने बरोबर? 'हो' तो तरूण कांहीसा गोंधळून म्हणाला. कारण त्याला त्याचा प्रश्न आणि स्वामीजींचा प्रतिप्रश्न यात काही संबंधच वाटेना. उगाचच भलताच विषय वाटला. स्वामीजी म्हणाले, याचा अर्थ एखादी वेगवान वस्तू पकडण्यासाठी त्यापेक्षा अधिक वेगवान वाहन तुमच्या जवळ असायला हवे बरोबर? 'हो'. सध्याच्या तुमच्या विज्ञानाच्या ज्ञानाप्रमाणे सर्वात अधिक वेग प्रकाशाचा आहे. एका सेकंदाला तीन लाख किलामीटर आणि जेव्हा तुम्ही याहून वेगवान वाहन करण्याचा प्रयत्न कराल तेव्हा तुमचे वाहन वाहनस्वरूपात राहणार नाही. आईनस्टाईनच्या सिद्धांताप्रमाणे तो जड स्थूल पदार्थ न राहाता प्रकाशरूप होईल हे खरे ना? 'होय' तो चाचरत म्हणाला, स्वामीजी पुढे म्हणाले, मग सांग की प्रकाशगतीपेक्षाही मनाची गती अधिक आहे हे तुम्ही स्वीकारता की नाही? 'हो' मग सांग की कोणत्या वैज्ञानिक उपकरणाने तुम्ही मनाला पकडू शकाल? तुम्ही स्वत:च स्वीकार करता की तुमच्याजवळ मन आहे आणि तुम्ही ते कोणत्याही वैज्ञानिक पध्दतीने ना पाहू शकत, ना शोधू शकत, ना पकडू शकत. मग आता आम्हाला सांगा जो आत्मा परमात्मा तुमच्या या मनबुद्धीच्या पण पलिकडे आहे तो तुम्ही विज्ञानाने कसा शोधणार? कसा सिद्ध करणार? त्या योग्यतेचे विज्ञान आहे का? स्वामीजींच्या या प्रतिवादाने तो निरूत्तर झाला व त्याने मुकाट्याने काढता पाय घेतला.

अशाच आणखीन एका विज्ञानाच्या अहंकाराने भरलेल्या तरूण मुलाला घेऊन त्याचे आईवडिल स्वामीजींच्या दर्शनासाठी उमदीला योगेशकडे आले. त्यांनी सांगितले आमचा हा मुलगा म्हणतो, विज्ञानाने देव

सिद्ध झाल्याखेरीज मी काहीही मानणार नाही, ऐकणार नाही. मध्येच तो मुलगा म्हणाला आजचे हे युग विज्ञानयुग आहे. बघा केवढी वैज्ञानिक क्रांती झाली आहे. आम्ही आजचे तरूण जे विज्ञानाला स्वीकार्य असेल सिद्ध झाले असेल तेच स्विकारू. अहंकाराने फुगुन तो बोलत होता. त्याचा असा स्वाभाविक समज होता की, स्वामीजींना विज्ञानातले काय कळते? स्वामीजींनी त्याच्याकडे वेधक नजरेने पाहात त्याला पुर्णत: अनपेक्षित भलताच प्रश्न केला, ''तुझे हे विज्ञान फक्त तुझ्या जीभेने बोलण्यासाठीच आहे की जगण्यासाठी पण आहे?'' अर्थात आम्ही आमच्या जीवनांत विज्ञानाला उतरवतो म्हणून तर देव मानत नाही. स्वामीजी शांतपणे उत्तरले, देवाची गोष्ट सध्या आपण बाजूला ठेवू. आता आम्हाला एवढेच सांग तू आता अंगावर जे कपडे घातले आहेत टाईट जिनपॅण्ट आणि टी शर्ट हे येथल्या हवामानाला, वातावरणाला धरून वैज्ञानिक पध्दतीचे आहे? मुलगा गोंधळला त त प प करू लागला. येथील आणि आताचे हवामान लक्षात घेता तुला सुती धोती आणि ढिला सुती सदरा घालायला हवा.. बरोबर? मुलगा गप्प... पहिल्याच प्रश्नात चितपट. बरे जाऊ दे... "What is third law of thermodynamics?' स्वामीजींच्या तोंडातून असा अचानकच भौतिक विज्ञानाचा प्रश्न ऐकून त्याची चांगलीच तारांबळ उडाली. उत्तर देता येईना. स्वामीजी म्हणाले, ठिक आहे घरी जाऊन पुस्तकांत शोध, वाच आणि चिंतन मनन कर म्हणजे तुला थोडेसे अध्यात्मातले रहस्य कळेल. बर आता पटकन सांग "What is the boiling point of water? पाण्याचा उत्कलन बिंदू काय आहे? तो तरूण पटकन म्हणाला १०० डिग्री सेल्सियस, स्वामीजी हसून म्हणाले, चुकीचे आहे उत्तर. १०० डिग्री सेल्सियस हे शुध्द पाण्याचे N.T.P. च्या स्थितीत आहे. साध्या पाण्याला उकळण्यासाठी एवढ्या अटी, शर्ती आहे. Distilled water (शुध्द पाणी) आणि Normal temperature and pressure condition आणि तू ईश्वरासाठी विज्ञान वापरायला निघालास? बरे ते जाऊ दे रेषेची व्याख्या काय? सांगता येईना. स्वामीजी म्हणाले, ठिक आहे आम्हीच सांगतो. भूमितीमध्ये रेषेची व्याख्या दिली आहे. जिला लांबी आहे पण रूंदी नाही आणि भूमितीची-गणिताची ही व्याख्या स्विकारली तर तुला रेषा कागदावर काढताच येणार नाही. कारण कितीही बारीक रेषा काढली तर तिला सूक्ष्म रूंदी तर असणारच आणि तरी म्हणणार लांबी आहे पण रूंदी नाही. वा रे तुझे विज्ञान आणि गणित. बरे बिंदूची व्याख्या काय? Point has no dimension आणि ही व्याख्या स्विकारली तर बिंदू कागदावर काढताच येणार नाही. (आणि हा दृष्टांत नेमका ज्ञानेश्वरीत दिला आहे.) बिंदू व रेषावाचून भूमितीचे अस्तित्व नाही आणि मग तुमचे विज्ञान? मुलगा चांगलाच थंडावला आणि त्यानंतर स्वामीजींनी तासभर त्याला अध्यात्म-पूजा-पाठ-मंत्र याबद्दल खूप छान समजावून सांगितले. शांतपणे निरूत्तर झालेल्या त्या मुलाने ते ऐकून स्विकारले.

९. का गुदमरसी आत कुढूनी?

धन तमी शुक्र बघ राज्य करी
रे खिन्न मना बघ जरा तरी
ये बाहेरी अंडे फोडुनि
शुद्ध मोकळ्या वातावरणी
का गुदमरशी आतच कुढुनी
रे मार भरारी जरा वरी
फूल गळे, फळ गोड जाहले
बीज नुरे, डौलात तरू डुले
तेल जळे बघ ज्योत पाजळे
का मरणि अमरता ही न खरी?
मना वृथा का भिसी मरणा
दार सुखाचे ते हरि करूणा
आई पाही वाट रे मना
पसरोनी बाहु कवळण्या उरी

प्रस्तुत कविता गुरूमाऊलींची अत्यंत आवडती कविता आहे. या कवितेस अनुरूप असे काही प्रसंग

माझे मामा आणि मामी आदर्श दंपती. दोन शरीर एक आत्मा असे दोघेही तरूण वयापासूनच दत्त उपासनेला लागले. सेवानिवृत्तीनंतर दोघांनी स्वत:ला पुर्णत: दत्तचरणी समर्पित करून उपासनेत लीन झाले आणि एके दिवशी सकाळी दोघे नेहमीप्रमाणेच उपासनेला बसले असता मामा म्हणाले, मला दत्तगुरूंचे बोलवणे आले मी चाललो आणि नेमके काय घडते आहे हे कोणाच्या लक्षात येण्याआधीच मामांचे शरीर सुटले. मामींना खूपच आघात लागला. स्वामीजींना हे कळताच त्यांनी फोन करून मामींना सांत्त्वना दिली पण संन्यासधर्माच्या नियमाप्रमाणे प्रत्यक्ष भेटीला सव्वा महिन्यानंतरच गेले. त्यावेळी मामींनी काकुळतीने स्वामीजींना विचारले, स्वामीजी माझी उपासना कोठे कमी पडली? माझे कोणते पाप आडवे आले की हे मला सोडून गेले? अजून काय उपासना, साधना-भजन करायला हवे होते? का हे वैधव्य आले? अनेक ह.भ.प. आणि प्रवचनकार, किर्तनकार, पोथी पंडीत बायांच्या डोक्यात हे भरवत असतात की सौभाग्यवती मरण येण हे भाग्याचे लक्षण, पुण्याचे लक्षण. वैधव्य येणे पाप. माझी आई सांगायची की तिची आई म्हणजे माझी आजी व तिच्या बरोबरीच्या पाच सहा जणी सौभाग्यवती मरण यावे, वैधव्य येऊ नये म्हणून अशा तथाकथित धार्मिक लोकांनी सांगितलेले सर्व व्रत, उपवास, उपासना करायच्या आणि काय दुर्दैव त्या सगळ्यांच्या नशीबी वैधव्यच आले. याच संस्कारामुळे मामी पण व्याकुळ होती. मनोमनी अत्यंत कष्टी व दु:खी होती. स्वामीजींनी मायेने तिच्या डोक्यावरून हात ठेवीत फक्त एकच वाक्य उच्चारले आणि मामी क्षणभरातच पूर्ण शांत झाल्या. सर्व ओझं उतरल. स्वामीजी म्हणाले, ''हा प्रश्न आम्हाला विचारण्यापेक्षा प्रभू रामचंद्राची आई कौसल्येला विचार.''

स्वामीजींचा सांगण्याचा उद्देश की जर वैधव्य आले म्हणून जर कौसल्या पापी तर मग रामाने तिच्या पोटी जन्म कसा घेतला? भगवान रामाची आई म्हणून अत्यंत पुण्यशाली तर मग विधवा कां झाली? त्यानंतर आणखीन काही प्रेरक वाक्य सांगत सत्संग करीत समजूत घातली. मामी पूर्णपणे शांत व मानसिकरित्या स्थिरावली. पूर्ववत साधना-भजन-उपासना सुरू झाली.

एकदा एक वयाच्या सत्तरीच्या पुढची ब्राह्मण स्त्री स्वामीजींना प्रणाम करून म्हणाली, ''स्वामीजी आशिर्वाद द्या'' स्वामीजींनी विचारले, या वयात तुम्हाला कसला आशिर्वाद पाहिजे? ''सौभाग्यवती मरणाचा.'' वर उल्लेख केली तीच मनोदशा त्याच कारणाने. स्वार्थी भोंदू लोकांनी आपल्या स्वार्थासाठी धर्माला इतक्या विकृत स्वरूपात स्त्री वर्गात आणि अशिक्षित/अल्पशिक्षित समाजात पसरवले की त्याचे दुष्परिणाम आजही समाज भोगतो आहे. दुर्दैवाने शंकराचार्य, गादीपती महंत, विविध संप्रदायाचे आचार्य, मंडलेश्वर, महामंडलेश्वर ज्यांचा समाजावर विशेष प्रभाव आहे ते पण त्यांच्या स्वार्थासाठी अशा गोष्टींकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करून मौन पाळतात. स्वामीजी नेहमीच म्हणतात की, **दुर्दैवाने भारतात धर्मसत्ता आणि राजसत्ता अनाधिकाऱ्यांच्या हातात आहे म्हणून भारत सर्वच क्षेत्रात दु:खी आहे व मागे पण पडला आहे.** आता कोठे उर्जितावस्थेचा अंधुकसा प्रकाश दिसतो आहे. पुढे माँ भगवतीची मर्जी. स्वामीजींनी त्या वृध्द स्त्रीला शांतपणे विचारले, ''तुमचे तुमच्या नवऱ्यावर मनापासून प्रेम आहे? तुम्ही आधी गेल्यावर त्यांनी उरलेले आयुष्य अत्यंत दु:ख कष्टात काढावे असे तुम्हाला वाटत का? तसे वाटत नसेल तर हा आशिर्वाद कधी मागू नका. नीट विचार करा. तुम्ही गेलात. पती स्वत: स्वयंपाक घरात जाऊ शकणार नाही. तो पूर्णत: तुमच्या सुनेवर अवलंबून राहील. बाशी भाकरी मिळाली तरी खावी लागेल. सुनेला दोन दिवस माहेरी जायचं असेल पण दाराशी 'म्हातारा' बसला आहे म्हणून पायात बेडी पडली म्हणून त्याच्यावर जळफळाट करेल, त्रागा करेल. गेली तर शेजारपाजारचे लोक, नातेवाईक नांव ठेवतील म्हणून माहेरी जायचे असून जाऊ शकत नाही. हे दु:ख-संताप कोणत्या ना कोणत्या रूपाने म्हाताऱ्यावर निघेल. समजा ते आधी गेले तुम्ही मागे राहिला तर सुनेला दोन दिवस माहेरी जाता येईल. कारण तुम्हाला स्वत:पुरती एक भाकरी टाकता येईल किंवा शेजारच्या कोणाला बोलवून घेता येईल. सुनेची कुचंबना होणार नाही. तुम्ही आधी गेलात नंतर तुमचे पति आजारी पडले, संडास लघवी कपड्यातच व्हायला लागली, अंथरूणावरच व्हायला लागली तर कोण सेवा करणार? पुरुषांकडून अशी सेवा होत नाही म्हणून तुमचा मुलगा सेवा करू शकणार नाही आणि संकोचाने मर्यादामुळे सून पण कपडे बदलून देणार नाही. त्यांना किती यातना भोगाव्या लागतील. त्यांच्यासाठी ही सेवा फक्त तुम्हीच करू शकता. ते आधी गेले तुम्ही मागे राहिला आणि तुमची अशी अवस्था झाली तर सून त्यावेळी तुम्हाला सांभाळू शकेल. स्वामीजींनी अशी अनेक व्यावहारिक उदाहरण देत पापपुण्याबद्दल कौसल्या/कुंती वगैरे अनेक उदाहरण देत तिच्या मनातला सगळा कचरा दूर गेला. इतका वेळ गंभीरतेने मार्गदर्शन करणाऱ्या स्वामीजींचा गंमतीशीर स्वभाव परत उफाळून आला. ती वृध्द स्त्री शांत झाली पाहून स्वामीजींनी गंमतीने विचारले, जन्मोजन्मी हाच नवरा मिळावा म्हणून इतकी वर्ष वटसावित्रीची पूजा केली ना? या नवऱ्यावर खरेच प्रेम आहे ना? पुढच्या जन्मात हाच नवरा हवा आहे ना? हा प्रश्न एकुन त्या वयातही ती बाई लाजली. स्वामीजी म्हणाले, मग त्यांना आधी जाऊ द्या. तुम्ही आधी गेलात ते मागे राहिले त्यामुळे तुमचा पुनर्जन्म आधी झाला त्यांचा नंतर झाला तर तुम्ही मोठ्या ते लहान पुन्हा जोडी जमणार कशी? त्यासाठी पण त्यांना आधी जाऊ द्या. त्याठिकाणी उपस्थित सर्वजण खळखळून मोकळ्या मनाने हसले.

स्वामीजी अगदी गंभीर आणि उद्विग्न मनस्थितीच्या व्यक्तीलादेखील सहजगत्या त्यातून बाहेर काढतात. स्वामीजी नागपूरला असताना रेल्वेस्टेशनवर जात असतांना स्वामीजींचा फोन वाजला. स्वामीजींनी

फोन घेतला. एका दिक्षित साधिकेच्या रडण्याचा आवाज, हुंदके देत म्हणाली, तुमच्याशी माझे हे शेवटचे बोलणे. ही माझ्या आयुष्यातील शेवटची रात्र. उद्या सकाळी मी या जगात नसेन. स्वामीजी किंचितही अस्वस्थ न होता शांतपणे म्हणाले, बेटी जगण्याचा किंवा मरण्याचा स्वत:साठी निर्णय घेण्याचा अधिकार तू त्याच दिवशी गमावलास ज्या दिवशी तू 'आई' झालीस. आता तुझे जीवन एक स्वतंत्र स्त्री म्हणून पत्नी म्हणून नसून 'आई' म्हणून आहे. पतीशी झालेल्या भांडणातून, विवादातून तू भावनेच्या भरात आत्महत्या करून घेशील त्याने तुला काय मिळेल? पाप/पुण्य याची आम्ही चर्चा करीत नाही. आता तारूण्याच्या उंबऱ्यावर पाऊल ठेवणाऱ्या तुझ्या कन्येचे काय होईल याचा विचार कर. तू गेलीस तर तुझा नवरा काय करेल? काही महिन्यांनी दुसरे लग्न करेल. त्यावेळी तुझ्या मुलामुलींचे काय हाल होतील? मुलगा धड लहान नाही, धड मोठा नाही की परिस्थिती समजू शकेल. त्यांच्या आयुष्याचे नुकसान होईल. किशोरी अवस्थेत आलेल्या मुलीला त्या वयात कोणी सावरले नाही, सांभाळले नाही तर तिच्या भविष्याची तिच्या पुढच्या आयुष्याची काय स्थिती होईल? कोठे दलदलीत फसली तर त्यावेळी तुझा आत्मा किती तडफडेल? हळूहळू समोरची स्त्री शांत झाली. तिच्यातली आई जागी झाली. स्वतंत्र स्त्री/अस्मिता/पत्नी पेक्षा मातृत्वाचे पारडे भारी झाले. शांतपणे फोन खाली ठेवला. त्यानंतर स्वामीजींनी तिच्या नवऱ्याला फोन केला. झालेल्या भांडणामुळे, फार विचारामुळे, गैरसमजामुळे तो बाजारात - रोडवर इतस्तत: भटकत होता. त्यांची चांगली कानउघाडणी करून त्याला घरी परत पाठविले. त्या घटनेला आता तीन-चार वर्ष झाली त्यांचा संसार चांगला चालू आहे.

कल्याणचे एक सज्जन - बँक मॅनेजर म्हणून नोकरी केलेली, शिवाय स्वत: L.L.B. असल्याने सेवानिवृत्तीनंतर अनेक बँकेची 'कोर्ट मॅटर' बघायचे त्यामुळे आर्थिकरित्या संपन्न. कल्याणला स्वत:चा छानसा बंगला, आर्थिक संपन्नता, घरात लग्नाच्या वयाची दोन तरूण मुले, पुढच्या सुखी आयुष्याची स्वप्ने पाहात असतांना कोणत्यातरी 'अगम्य' कारणाने मोठ्या मुलाने आत्महत्या केली. त्या धक्क्यातून सावरण्याच्या आतच/ सहा महिन्यांच्या आतच धाकटा मुलगा रेल्वे ॲक्सिडेंटने गेला. दोन्ही तरूण मुले सहा महिन्याच्या अंतराने गेली. शब्दातीत, कल्पनातीत धक्का बसला. मनात सतत आत्महत्येचे विचार येऊ लागले. पण पापभीरू स्वभाव. आत्महत्या हे जघन्य पाप आहे हे कधीतरी वाचलेले, ऐकलेले तर दुसरीकडे जीवनातला सगळा रस संपून गेला. कशासाठी जगायचे हा प्रश्न अनुत्तरीत रहायचा. आत्महत्येचे विचार प्रबळ व्हायचे. पूर्वी त्यांनी स्वामीजींची पुस्तके वाचलेली म्हणून स्वामीजींचे मार्गदर्शन घेण्यासाठी त्यांनी आधी स्वामीजींना सविस्तर पत्र लिहून सर्व वस्तुस्थिती व व्यथा व्यक्त केली. पत्र हाती पडताच, वाचल्यावर लागलीच स्वामीजींनी त्यांना फोन केला. फोनवर बराचवेळ बोलून त्यांना शांत केले. हातातील सर्व कामे बाजूला ठेवून त्यांच्या पत्राचे उत्तर दिले. दोनतीन महिने फोन व पत्राचा क्रम चालू राहिला. तो गृहस्थ त्या मानसिक हताशेतून बाहेर पडला. आता देशासाठी-धर्मासाठी-समाजासाठी जगण्याचा निर्धार करून स्वत:ला वेगवेगळ्या कामात गुंतवून घेतले आहे. स्वामीजींचे त्याबद्दलचे उद्गार. 'चला पुन्हा एकदा आमचे संन्यास घेणे सार्थ झाले'. एवढीच स्वामीजींची प्रतिक्रिया. ज्ञानेश्वरीच्या ओव्यांची आठवण करून देत ***हे मजचिस्तव जाहलें। परी म्यां नाही केले। ऐसे जेणे जाणितले। तो सुटला गा।।***

एक दिक्षित साधक तरसाडा येथील स्थानिक परिवार. त्यांच्या भाचीचे नुकतेच लग्न झालेले. तिचा तिच्या सासरहून मोबाईलवरून मामाला फोन यायचा. ''मामा मला आत्महत्या करावीशी वाटते.'' असे म्हणून रडायला लागायची, दुसरे काही बोलायचीच नाही. चिंतातूर मामा-मामी विचारायचे, तुला सासरी काही त्रास आहे का? तब्येत बिघडली आहे का? वगैरे. ती काहीच उत्तर न देता रडत रडत फोन खाली ठेवायची. स्वामीजींशी पण पूर्व परिचय असल्याने तिने एकदा स्वामीजींना फोन केला. स्वामीजी तिला म्हणाले,

आश्रमावर ये आपण बोलू. स्वामीजींनी तिच्या मामाला सांगितले, एकदा तिला येथे घेऊन या. तरसाड्यापासून ती फार दूरच्या गावी नसल्याने तिचे मामा तिला घेऊन आले. ती आली आणि आत्महत्या का करावीशी वाटते, मनात काय विचार येतात हे काहीही न सांगता गप्प बसून राहिली. समोरच्या व्यक्तीचे मानसशास्त्र चांगले ओळखू शकणारे आणि भगवतीच्या कृपेने, गुरूकृपेने समोरच्याच्या मनातले विचार पण जाणू शकणारे स्वामीजी तिच्याकडे वेधक नजरेने पाहात तिला म्हणाले, आम्ही तुला एक छोटीशी गोष्ट सांगतो नीट लक्ष देऊन ऐक.

एकदा एक आठ नऊ वर्षाची मुलगी पाठीला तिच्या तीन वर्षाच्या भावाला बांधून पहाड चढत होती. ते पाहून तिला कोणीतरी विचारले, ''पाठीवर हे एवढे ओझे घेऊन तू एवढीशी मुलगी पहाड कसा चढू शकते? त्या मुलीने आश्चर्याने उत्तर दिले, माझ्याजवळ ओझे कुठे आहे, हा तर माझा भाऊ आहे.'' स्वामीजींनी तिच्याकडे बघत म्हटले, समज तिच्या भावाच्या वजनाइतकेच एखादे गाठोडे तिच्या पाठीवर दिले असते तर ती पहाड नक्कीच चढू शकली नसती. तिला तो भार वाटला असता पण हे ओझे नव्हते तिचा भाऊ होता. गणिताच्या भाषेत भले वजन सारखे असेल पण भावनेच्या नात्याने जमीन-अस्मानचा फरक होता. म्हणून तिचा भाऊ ओझे वाटत नव्हता. तुझी स्थिती ही आहे की, तुला सासू-सासऱ्यांजवळ रहायचे नाही. नवऱ्याजवळ रहायचे आहे. तुझा नवऱ्याला आता नुकतीच नोकरी लागली आहे. त्याला स्थिर व्हायला व घर शोधायला अजून चार-सहा महिने तरी वेळ जाईल. तेवढा काळ तू लग्न करूनही माहेरी राहशील का? म्हणून सासू-सासऱ्याजवळ ठेवले पण तुला तुझे सासू-सासरे तुझे वाटत नाहीत. किंचित पण आपलेपणा वाटत नाही, नको असलेली जबाबदारी वाटते म्हणून निराशेने तू असे आत्महत्येचे वाह्यात विचार करते आहेस. ज्या दिवशी तुला सासू-सासरे आपले वाटतील, त्यांच्यात तू तुझे आईवडील पाहशिल त्या क्षणी तुझ्या मनातून आत्महत्येचे विचार निघून जातील. मूर्खपणा करून जीवनाचे मातेरे करू नकोस. परिस्थिती लक्षात घे आणि शहाणी हो, त्यानंतर त्या मुलीने कधीच तक्रार केली नाही. जिच्या मनात सारखे आत्महत्येचे विचार येत होते ती आता सुखाने संसार करत आहे.

१०. वेगळे व्यक्तीत्व

घटना राजस्थानची आहे पण ती सांगण्याच्या आधी एक विशेष गोष्ट तुमच्या लक्षात आणून देते, ''आम्ही अल्लाशिवाय कोणाला मानत नाही, कोणालाही वंदन करणार नाही'' अशी मुस्लीम लोकांची दृढ धारणा असते. पुढच्या तीन गोष्टी वाचा या तीनही गोष्टी मुस्लिम बांधवांना संबंधित आहेत आणि त्यातून प्रगट होणारे स्वामीजींचे एक आगळे वेगळे विलक्षण व्यक्तीत्व म्हणून तर मी म्हणते **सदा सर्वदा योग तुझा घडावा.**

प्रसंग आहे राजस्थानातील भिलवाडा जिल्ह्यातील मांडल गावचा, तेथे एक माध्यमिक शिक्षक श्री. पुंसालाल भट्ट यांची स्वामीजींशी झालेली पहिली भेट आणि त्यानंतर त्यांच्यात झालेले परिवर्तन ही एक वेगळी विलक्षण घटना आहे. त्याविषयी नंतर केव्हा तरी सांगेन. पुंसालाल भट्ट यांच्या घराच्या गल्लीतल्या एका ओसाड जागी एक मुस्लिम फकीर पडून असायचा. फक्त भिक्षा मागायला गावात चक्कर मारायचा. भिक्षा बहुधा मुस्लिम वस्तीतच मागायचा. कधी मिळायची कधी नाही. श्री. पुंसालालजींच्या लक्षात ही गोष्ट आली आणि ते त्या मुस्लिम फकीराला म्हणाले जेव्हा तुम्हाला गावात कोठेही भिक्षा मिळाणार नाही त्यावेळी सरळ माझ्या घरी येऊन पोटभर जेवून जायचे कसलाच संकोच न ठेवता, मी घरी असो वा नसो. घरच्या लोकांना मी सांगून ठेवतो. त्यानंतर तो मुस्लिम फकीर आठवड्यातून एकदा तरी त्यांच्याकडे जेवायला असायचा. घरच्या सगळ्यांची ओळख झाली. पुंसालालची लहान मुलगीपण त्यांच्यात चांगली मिसळली. एके दिवशी त्या फकीराने पुंसालालजीना विचारले, तुमच्याकडे नेमके कोण येणार आहे? कारण एक मुलगी म्हणते दादा येणार आहेत. दुसरी म्हणते आजोबा येणार आहेत, तर तिसरी म्हणते स्वामीजी येणार आहेत. तुमची पत्नी म्हणते, महाराजजी येणार आहेत. नक्की कोण येणार आहेत? पुंसालालजी म्हणाले सगळेजण सांगतात ते बरोबरच आहे. माझे गुरुमहाराज येणार आहेत. संन्याशी असल्याने त्यांना कोणी स्वामीजी म्हणतं कोणी महाराजजी म्हणतं लहान मुले त्यांना दादा, आजोबा, जे मनात येईल ते, तोंडात येईल ते म्हणतात त्या फकीराने आश्चर्याने विचारले त्यांना या गोष्टीचा राग येत नाही? त्यांना कसला राग. त्यांना कोणी कोणत्याही नांवाने हाक मारा काही फरक पडत नाही, ते नाराज पण होत नाहीत. रागवण्याची गोष्ट तर दूरच. फकीर काही क्षण आश्चर्याने त्यांच्याकडे पाहात म्हणाला, जेव्हा येतील तेव्हा सांगा मी येईन दर्शनाला. दोन चार दिवसांनी स्वामीजी मांडलला पोहचले पण आधी गेले बा साहेबांकडे (श्री. लाभ शंकर जोशी) संध्याकाळी तेथे दर्शनाला गावातील काही लोक आले होते. पुंसालाल भट्ट व काही सहकारी शिक्षक पण आले होते, त्या मुस्लिम फकीराला सूचना मिळाल्याने तोही आला. सरळ स्वामीजींसमोर जावून उभा राहिला. क्षणभर नजरेला नजर भिडली आणि काय घडले कोणास ठाऊक सर्वांना आश्चर्य वाटेल अशी घटना! मशिदीत नमाज पढावा तसा नमाज पढत आणि नंतर स्वामीजींसमोर डोक जमिनीवर ठेवून नमस्कार केला. सर्वांना आश्चर्य वाटले. त्यांना कोणीतरी विचारले तुम्ही असे का केले? त्यांनी हसून त्या व्यक्तीकडे पहात म्हटले ''आप लोग इनको नही पहचान पाएंगे की वो कौन है और क्या है मैने पहचाना इसलिए इबादत की, नमाज पढा और सिर जमीनपर लगाकर प्रणाम किया।''

दुसरी घटना राजस्थानचीच. स्थान अजमेर. स्वामीजी त्यावेळी श्री. उदय फडकेकडे उतरले होते. त्यावेळी उदय फडके कॉलेजचे विद्यार्थी होते. त्यांचे वडील अजमेर शहराचे मुख्य पोस्टमास्तर होते. त्यांच्या परिचयाचे दोन सज्जन रोज सत्संगासाठी, दर्शनासाठी संध्याकाळी यायचे. एके दिवशी असेच ते दोघे आले.

उदय स्वतः आणि त्यांचे वडील (ती. आप्पा) पण स्वामींजीजवळ येऊन बसले. सगळ्यांना आशा की स्वामीजी आता काही बोलतील आणि आपल्याला ऐकायला मिळेल. पण त्या दिवशी स्वामीजी गप्प. कोठेतरी हरवल्यासारखे. जणू कोणाची वाट पहात आहेत. कोणीतरी वेगळीच, अनपेक्षित अशी व्यक्ती समोर येईल असे त्यांना आंतरिक प्रेरणेने सूचना मिळत होती. स्वामीजी शांत बसले आहेत, काही बोलत नाहीत हे बघून आलेले दोघे उठून जाण्याच्या तयारीत होते. स्वामीजींनी त्यांना इशारा करुन बसायला सांगितले आणि त्यानंतर पाचच मिनिटांनी सर्वांना आश्चर्याचा धक्का बसावा अशी घटना घडली. अजमेरच्या प्रसिध्द दर्गा शरीफ मधील एक मौलवी त्यांच्या शागीर्दासह उदयचा मित्र अरविंद शेवडे बरोबर आला. अरविंद शेवडे त्या मौलवींना ओळखत होता. कधीतरी स्वामीजींविषयी बोलणे झाले असेल त्यांनी अरविंदला सांगून ठेवले होते की स्वामीजी आल्यावर कळव. त्याप्रमाणे ते तिघे आले. हातांनी विणकाम केलेला सुंदर रुमाल झाकलेले ताट त्या मौलवीने त्यांच्या शागीर्दच्या हातातून घेतले स्वामीजींसमोर काही क्षण ते धरुन उभे राहिले. नंतर स्वामीजींच्या शेजारी असलेल्या स्टूलावर ठेवून रुमाल बाजूला केला. त्या ताटात फळ, मिठाई, अत्तर, अगरबत्तीचा पुडा, फूले, फुलांचा हार, पानाचा विडा यांनी सगळे ताट भरले होते. ताट ठेवल्या ठेवल्या त्या मौलवीने काही क्षण स्वामीजींच्या चेहऱ्यावर एक टक पाहिले. त्यानेही नमाज पढल्यासारखी कृती केली आणि स्वामीजींसमोर खुर्चीवर न बसता खालीच बसले आणि स्वामीजींचा वाणी प्रवाह सुरु झाला. एका मुस्लीम मौलवीला आणि तोही अजमेरच्या दर्गा शरीफच्या मौलवीला स्वामीजींनी कुराणातला कोणता तरी प्रसंग घेऊन त्याचे सूक्ष्म अध्यात्मीक रहस्य उलगडून सांगितले आणि त्याचा समारोप मौन प्रार्थना संबंधी मार्गदर्शन करीत केले. मौलवी भारावल्यासारखा मंत्रमुग्ध होऊन ऐकत होता. बाकीच्यांची पण हीच स्थिती. पुन्हा एकदा प्रणाम करुन मौलवींनी भारलेल्या अंतःकरणाने स्वामीजींचा निरोप घेतला.

तिसरी घटना स्वामीजींच्या एका पुस्तकात दिली आहे. स्वामीजी त्यावेळी सतलासणाच्या दवाखान्याच्या निर्मितीसाठी राहात होते. दवाखान्याच्याच कामाच्या संदर्भात विसनगरला गेले होते. परतीचा प्रवास बसने करीत होते. शेजारची जागा रिकामी होती. कोणीतरी बसमध्ये चढले आणि स्वामीजींच्या शेजारी येऊन उभे राहिले आणि विचारले, स्वामीजी मी येथे बसू शकतो? स्वामीजींनी त्यांच्याकडे न पाहता उत्तरले, बसू शकता. बसल्यावर त्या गृहस्थाने स्वामीजींना विचारले, आपण स्वामी सवितानंद ना? होय. स्वामीजींनी चमकून त्याच्याकडे पहात उत्तर दिले. सतलासण्याला जाणार ना? होय स्वामीजीना थोडे आश्चर्यच वाटले. कारण एका अपरिचीत व्यक्तीला आपले नाव पण माहित आहे, कोठे जाणार तेही माहित आहे. त्यानंतर त्या गृहस्थाने स्वामीजींना आपला परिचय देत म्हटले. मी मीरसाहेब येथे विसनगरला कॉलेजात फिलॉसॉफीचा विभागाध्यक्ष आहे. तुमचे नाव सतलासणा हायस्कूलचे प्राचार्य अरविंदभाईकडून कळाले. त्याच हायस्कूलमध्ये माझा धाकटा भाऊ शिक्षक आहे. त्याच्याकडून आणि सतलासण्यासचे डॉक्टर नटूभाईकडून खूपदा ऐकले आहे. त्यामुळे भेटायची तर खूप इच्छा होती. मी फिलॉसॉफीचा प्राध्यापक असलो तरी माझी ईश्वरावर श्रध्दा नाही म्हणून मी आलो नाही. स्वामीजी शांतपणे उत्तरले आमची अशी कोणतीच अट नाही की ईश्वरावर श्रध्दा असेल तरच आमच्याकडे या! आपण ईश्वराशिवाय इतर कोणत्याही विषयावर चर्चा करु शकलो असतो. थोडे इतर विषयावर बोलणे झाले त्यानंतर स्वामीजी प्राध्यापकांना म्हणाले,तुम्हाला एक प्रश्न विचारु ? मला ? मी काय सांगणार? स्वामीजी शांतपणे त्याच्याकडे रोखून पाहात सहज हसत म्हणाले, 'ईश्वरावरची अश्रध्दा ही स्वतःच्या बुध्दीवरची अंधश्रध्दा तर नाही ना? ' प्राध्यापक चपाचले. काहीही उत्तर न देता शांतपणे डोळे मिटून बसले विसनगर ते सतलासणा सुमारे दिडतासाचा प्रवास पण प्राध्यापक महाशय तेवढा वेळ डोळे मिटून शांतपणे बसून राहिले एका शब्दाने पण पुन्हा संभाषण झाले नाही. सतलासणा आले. स्वामीजी बसमधून खाली उतरले.

त्या प्राध्यापकांना पुढे जायचे होते पण तेही खाली उतरले सतलासणा बस स्टँडवर येणारे जाणारे प्रवासी व आसपासच्या दुकानामुळे सुमारे शंभराच्या वर लोक होते आणि त्यांच्यापैकी बहुतेक जणांचा मीरसाहेबांशी परिचय होता. ते खाली उतरले आणि इतक्या लोकांसमोर खाली वाकून स्वामीजींना चरण स्पर्श करीत म्हटले,'स्वामीजी, तुमच्या एकाच प्रश्नाने मला आतून हादरुन टाकले. मी या प्रश्नाचे प्रामाणिकपणाने उत्तर शोधेन आणि मगच तुमच्यासमोर येईन.' स्टँडवर उभे असलेल्यांना दोन गोष्टींचे आश्चर्य वाटत होते एक मुस्लिम व्यक्ती खाली वाकून एका हिंदू संन्याशाला चरणस्पर्श करते आहे आणि ती व्यक्ती नामांकित प्रोफेसर.

आणखिन एक वेगळीच घटना. स्वामीजी एकदा जन्मगावी बेटावदला जायला निघाले. धुळ्याहून बसने. बस होती धुळे-मुडावद. बसमध्ये खूप गर्दी होती. स्वामीजींना उभे रहावे लागले. स्वामीजींना त्याचे काही वाटत नाही. कोणी कारमधून नेले काय आणि बसमध्ये उभे राहून जावे लागले काय दोन्ही परिस्थितीत तसेच शांत, प्रसन्न, तटस्थ, स्थितप्रज्ञ. स्वामीजींच्या शेजारीच एक बाई येऊन उभी राहिली. तिच्या कडेवर एक-दिड वर्षाचे लेकरु. त्या लेकराला कडेवर घेऊन ती कशीबशी उभी होती. बस ड्रायव्हरने अचानक ब्रेक मारला तर तिचा तोल जायचा व मूल पडायची भिती. तिची ती तारांबळ बघून स्वामीजी पटकन जवळ गेले व त्या मुलाला घेऊन उभे राहिले. कोणीही बसायला जागा दिली नाही. पुढच्या स्टेशनला स्वामीजी उभे होते त्याच सीटवरचा मनुष्य खाली उतरला स्वामीजी त्या बाईला म्हणाले, बेटी आता येथे बैस म्हणजे तुला मुलाला नीट घेऊन बसता येईल. ती बाई बसली पण तिचेच मूल तिच्याजवळ जाईना. स्वामीजींना घट्ट पकडून ठेवले. आईने घ्यायचा प्रयत्न केला तर जायचे नाही. शेवटी ती बाई उठली आणि म्हणाली, बाबा मुलाला घेऊन तुम्हीच येथे बसा. आणि ते मूल बेटावद येईपर्यंत स्वामीजींच्या मांडीवरच खेळत राहिले. बेटावद आले आता गाडीत गर्दी अजिबात नव्हती. स्वामीजींना खाली उतरायचे होते. बाईला पुढे आठ किमी जायचे होते मुडावदला. पण मूल त्या बाईजवळ जाईचना. ड्रायव्हर कंडक्टरला पण आश्चर्य वाटले. आईने घ्यायचा प्रयत्न केला तर रडून तोंड फिरवून घ्यायचे. शेवटी कंडक्टर म्हणाला महाराजजी तुम्ही आता गाडीतच बसा आमच्याबरोबर मुडावदला चला आणि याच बसने परत या, शेवटी तसेच करावे लागले.

मी ही गोष्ट अनेकदा बघितली आहे की कोणतेही लहान मूल स्वामीजींकडे गेले की मग ते त्याच्याच आईवडीलांजवळ देखील जात नाही. स्वामीजी जेव्हा त्या बाळाला म्हणतात, 'बाळा आता जा' त्यावेळी ते जाते. बऱ्याच वेळा स्वामीजी एवढेच म्हणतात, 'शब्दाविण संवादिजे' प्रत्यक्ष बोलत नाहीत पण मूल त्यानंतर जाते. एखादे शिशू त्याच्या आईला जसे चिकटून जाते, पकडून ठेवते तशी सर्वच लहान मुले स्वामीजींना असे पकडतात. जसे त्यांच्या आईला. त्यांना स्वामीजींच्या स्पर्शात मातृवात्सल्यच जाणवते की काय कुणास ठाऊक? पण मी हे अनेकदा बघितले आहे की स्वामीजी जोपर्यंत त्या बाळाला प्रत्यक्षात किंवा मनोमन जा म्हणून सांगत नाही तोपर्यंत मूल कोणाकडे म्हणजे कोणाकडेच जात तर नाहीच हात पण लावू देत नाही. याचे रहस्य माँ भगवतीच जाणे.

११. वेगळा दृष्टीकोन

स्वामीजी मला असे कळाले की, या गरीब आदिवासी बाईच्या ऑपरेशनचा व औषधाचा खर्च तुम्ही करणार आहात. एक डॉक्टर म्हणून माझे मत असे आहे की हा तुमचा खर्च वाया जाणार आहे. मी पेशंटचे सगळे रिपोर्ट पाहिले आहेत कॅन्सरची मोठी गाठ आहे गर्भाशयात. कॅन्सर A+ म्हणजे तिसऱ्या शेवटच्या टप्यात पोहचला आहे. ऑपरेशन केले किंवा नाही केले तरी ही बाई फार फार तर तीन महिने जगू शकेल. ऑपरेशन करुन फारसा काही फायदा होणार नाही. एक अतिशय प्रतिष्ठीत कुशल एम.डी. फिजिशियन डॉक्टर स्वामीजींना सांगत होते, स्वामीजींनी त्यावर जे उत्तर दिले ते ऐकून डॉक्टर आश्चर्यचकित तर झालेच त्यांचेही ऊर भरुन आले. ते भारावले स्वामीजींना काय उत्तर दिले ते नंतर सांगते. पण त्या आधी सगळी घटना थोडक्यात समजून घेऊ.

तरसाडा येथे किराणा दुकान असलेले दोन्ही भाऊ, लालजीभाई आणि सुखरामभाई, दोन्ही परिवारासह दिक्षीत साधक एके दिवशी दुपारी लालजीभाई स्वामीजींना भेटायला आले आणि म्हणाले, स्वामीजी माझा एक ग्राहक आहे. आदिवासी वस्तीत त्याचे छोटेसे किराणा दुकान आहे. तो माझ्या कडूनच सगळे किराणा सामान घेऊन जातो. दोन वेळ पोटभर खाण्याइतके दोन पैसे कमवायचे यापेक्षा त्याच्याजवळ जास्त कांही नाही. गेली सहा महिने त्याच्या पत्नीची तब्येत ठिक नाही. नेहमीप्रमाणे त्यांनी आधी आदिवासी कोणी बुवा भगत कडे जाऊन झाडफुंक, तंत्रमंत्र केले. कांही फरक पडला नाही. डॉक्टरकडे गेले औषधांचा कांही उपयोग झाला नाही. शेवटी थोडे पैसे गोळा करुन मोठ्या डॉक्टरकडे गेले. (वर उल्लेख केलेल्या) डॉक्टर खरेच खूप हुशार त्यांनी बाईकडे नुसते बघितले आणि विचारले फॅमिली प्लॅनिंगचे ऑपरेशन झाले आहे का? होय साहेब. मग तुम्हा लोकांना हे कळत कसे नाही की सहा महिन्यांच्या गर्भवती स्त्री सारखे हिचे पोट मोठे दिसत आहे. तर पोटात मोठी गाठ असेल. ज्या डॉक्टरकडून तुम्ही आतापर्यंत औषधे घेतली त्याच्याही का लक्षात आले नाही? तुम्ही आधी हिची सोनोग्राफी करा. डॉक्टरांचा अंदाज खरा ठरला. तिच्या पोटात गर्भाशयात सुरण एवढी गाठ. गाठीची बायोप्सी केली तर निदान झाले कॅन्सरचे आणि तेही शेवटच्या टप्प्यातील. बारडोली, सुरतच्या डॉक्टरांनी एकंदर परिस्थिती लक्षात घेऊन ऑपरेशनसाठी हात वर करुन दिले आणि सांगितले अहमदाबादला घेऊन जा.

वरील सगळी हकीकत स्वामीजींना सांगून लालजीभाई त्याच व्यक्तीबद्दल आपुलकीने आणि सहानुभूतीने म्हणाले, स्वामीजी, माणूस खूप चांगला आहे. कसलेच व्यसन पण नाही पण परिस्थिती नाजुक. अहमदाबादला त्यांच्या कोणी ओळखीचे नाही. ऑपरेशन नंतर औषधे नंतर ट्रीटमेंट शिवाय तेथे राहण्या–जेवणाचा खर्च. याला शक्यच नाही. बिचारा रडतो आहे. स्वामीजी लालजीभाईना म्हणाले, चिंता करु नका. त्याला येथे बोलावून घ्या. थोड्यावेळाने लालजी त्या सज्जन व्यक्तीला त्याचे नांव गोविंद आश्रमावर घेऊन आले. स्वामीजी त्यांना म्हणाले घाबरुन जाऊ नका, चिंताही करु नका तुम्ही उद्या बडोद्याजवळ वाघोडीयाच्या रस्त्यावर गोरज कॅन्सर हॉस्पिटल आहे तेथे पत्नीला घेऊन जा. चॅरिटेबल ट्रस्टचे हॉस्पिटल आहे, एका संन्यासिनीने उभे केले आहे, मी येथे थोडे विषयांतर करुन सांगते की ही अतिशय सेवाभावी संस्था आहे.

त्यांचे विविध क्षेत्रात सेवेचे अनेक प्रकल्प आहेत. जनसेवा हीच ईश्वर सेवा या श्रध्देने निष्ठेने सेवा करीत आहेत. कॅन्सर हॉस्पिटल शिवाय सर्व रोगोपचार करणारे सरकारी सिव्हिल हॉस्पिटल सारखे दुसरे मोठे हॉस्पिटल आहे. मंदबुद्धीच्या मुलींना पण सांभाळत आहे. अंदाजे सत्तरपेक्षा अधिक मुली तेथे आहेत. गरीब आदिवासी मुलांसाठी शाळा व शिक्षण व्यवस्था आहे. वृध्दाश्रमपण आहे. ज्यांना असे वाटते की, ते करीत असलेल्या दानाचा सदुपयोग व्हावा त्यासाठी ही एक उत्तम संस्था आहे.

स्वामीजी गोविंदभाईना म्हणाले, तेथील ट्रस्टच्या अध्यक्षांची आमची चांगली ओळख आहे त्यांना फोन करुन सगळे सांगतो. जो काही खर्च येईल तो आम्ही आश्रमावरुन त्यांना पाठवून देऊ. तुम्हाला कशासाठी पण एक पैसा खर्चावा लागणार नाही. ऑपरेशन नंतर औषोधोपचार पुढची ट्रीटमेंट वगैरे आणि तेथे राहण्या-जेवण्याचा खर्च जे काही बील येईल ते आम्ही येथून देऊ, तुम्ही उद्याच जा. एवढे बोलून स्वामीजी थांबले नाहीत त्यांनी लागलीच गोरजला संस्थेच्या अध्यक्षांना फोन केला आणि सर्व काही सांगितले. ते उत्तम प्रतिसाद देत म्हणाले उद्या पाठवून द्या. आधी माझ्या ऑफीसकडे येऊ द्या. मी व्यक्तीगत लक्ष देवून सगळी व्यवस्था करतो. त्याप्रमाणे सगळी व्यवस्था झाली, आवश्यक त्या सर्व तपासण्या करुन, ऑपरेशनची तारीख नक्की झाल्यावर, गोविंदभाई स्वामीजींना भेटून गेले त्यांनी आणलेले सगळे रिपोर्ट वर उल्लेख केल्याप्रमाणे डॉक्टरांनी पाहिल्यावर स्वामीजींना एक निष्णात डॉक्टर म्हणून त्यांचे मत सांगितले.

यावर स्वामीजी शांतपणे म्हणाले डॉक्टर तुमचा हा समज चुकीचा आहे की आम्ही त्या बाईसाठी हा एवढा खर्च करतो आहोत. आम्ही हा खर्च तिच्या पतीसाठी, मुलांसाठी, परिवारासाठी करीत आहोत. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे तीन महिन्यात तर काय ऑपरेशन करता करता ऑपरेशन टेबलवर ती बाई गेली तरी आम्हाला पैसे वाया गेल्यासारखे वाटणार नाही. आम्ही हा खर्च अशासाठी करत आहोत की, तिच्या नवऱ्याला, तिच्या मोठ्या मुलाला आयुष्यभर ही टोचणी राहू नये की, आपल्याजवळ पैसे नव्हते आपण ऑपरेशन करु शकलो नाही म्हणून पत्नीला, आईला वाचवू शकलो नाही. सर्व काही करुनही ती बाई जगली नाही तर सगळ्यांच्या मनात एवढा संतोष तर राहिल की आपण सर्व प्रयत्न केले पण तिचे आयुष्यच तेवढे होते. त्याला कोण काय करणार? परंतु ऑपरेशन केले नाही आणि ती बाई अशीच महिन्या दोन महिन्यात गेली तर घरातील या दोघांना आयुष्यभर टोचणी राहिल, शल्य टोचत राहिल की, पैसे नसल्याने आपण उपचार करु शकलो नाही. कदाचित वाचली पण असती. का त्यांनी आयुष्यभर मनावर हे ओझे बाळगावे ? ही टोचणी, हे शल्य सहन करावे? तशी वेळ त्यांच्यावर येऊ नये म्हणून हा सर्व खर्च करत आहोत. स्वामीजींचे बोलणे ऐकून डॉक्टर भारावले आणि म्हणाले खर आहे स्वामीजी तुमचे म्हणणे. त्यानंतर स्वामीजी स्मितहास्य करीत डॉक्टरांना म्हणाले Doctor is pleader between God and patient. He is not the judge. डॉक्टर हा पेशंट आणि ईश्वर यांच्यामध्ये एखाद्या वकीलासारखा आहे तो स्वतः जज्ज नव्हे. डॉक्टर क्षणभर आश्चर्याने स्वामीजींना पहात राहिले आणि म्हणाले स्वामीजी थांबा मी हे वाक्य लिहून घेतो आणि मोठ्या अक्षरात लिहून माझ्या खूर्चीच्या मागे भिंतीवर बोर्ड लावतो म्हणजे येथे येणाऱ्या पेशंटना आणि नातेवाईकांना पण वस्तुस्थिती कळेल. लोक आमच्याकडून खूप अपेक्षा ठेवून येतात कधी कधी त्यांच्या अपेक्षांचा असह्य बोज वाटतो. छान आणि सार्थक आहे हे वाक्य आणि गंमत अशी की, त्या बाईचे ऑपरेशन झाले ती पुर्ण स्वस्थ झाली. घरी येऊन हळूहळू ती घरची कामे आणि प्रकृती सुधारल्यावर शेतीची सर्व मेहनतीची कामे करु लागली व ऑपरेशन नंतर सुमारे १३ वर्षे जगली. आता सहा महिन्यापूर्वी तिचा स्वर्गवास झाला आणि तो कॅन्सरमुळे नव्हे तर दोन्ही किडनी फेल झाल्याने.

या संदर्भात येथे एक विशेष घटना सांगते ऑपरेशन नंतर स्वामीजींनी त्या बाईला रोज अर्धा ग्लास तरी गोमूत्र घ्यायला सांगितले रस्त्यावर भटकणाऱ्या गाईचे नाही तर पाळलेल्या गाईचे त्यासाठी गोविंदभाईनी दूध डेअरीकडून कर्ज घेऊन त्यांच्या योजनेचा लाभ घेत एक गाय विकत आणली. त्यामुळे बाईला रोज सकाळी ताजे गोमूत्र ग्लासभर मिळायचे ती ते घ्यायची. ऑपरेशन नंतरही सूमारे सहा महिने पर्यंत दरमहिन्याला डॉक्टर तिला पुनर्तपासणीसाठी बोलवायचे. प्रत्येक वेळी कॅन्सरचा रिपोर्ट 'नील' (शून्य अजिबात कॅन्सर नाही) यायचा. तेथील स्पेशालिस्ट डॉक्टर म्हणायचे बाई आम्हालाच आश्चर्य वाटते कारण गाठ एक तर खूप मोठी होती ऑपरेशन करुन काढून घेताना त्यातून थोडा तरी भाग पसरुन कॅन्सरच्या पेशी आत राहतात पुन्हा वाढतात म्हणून आम्ही काळजी घेण्यासाठी तपासणी करीत आहोत. तुझा रिपोर्ट एवढा नॉर्मल कसा? ती बाई म्हणाली मी रोज सकाळी एक ग्लास गोमूत्र पिते.

आता सांगायची विशेष गोष्ट ही की, आश्रमातल्या ताईंना (साध्वी दयामयी) डॉक्टरांनी रोज संध्याकाळी थोडे तरी दुध पित जा म्हणून सांगितले होते ते गोविंद भाईना कळाल्यावर त्यांनी रोज संध्याकाळी अर्धा लिटर दूध आश्रमावर पोहचवायला सुरुवात केली. त्याचे कधीच पैसे घेतले नाहीत. कृतज्ञता म्हणून तेही सेवा करीत राहिले. एक गरीब आदिवासी परत फेडीची भावना म्हणून पाच-सात वर्षे पर्यंत रोज संध्याकाळी अर्धा लिटर दूध देऊन जायचा. ही कृतज्ञता तर बऱ्याच वेळा वरच्या वर्गाच्या लोकात पण पहायला मिळत नाही. त्याचे कटू अनुभव स्वामीजींना आहेत. पण ते त्या विषयी कधी काही बोलत नाहीत. आपण कोणासाठी काही केलच नाही असे म्हणून हात झटकून मोकळे होतात.

स्वामीजींनी आतापर्यंत अनेक मुलामुलींना त्यांच्या उच्चशिक्षणासाठी आर्थिक व इतर मदत केली पण त्या प्रत्येकाला स्वामीजी एवढेच सांगतात आम्ही स्वतः काही पैसे कमवत नाही, हे समाजाचे पैसे आहेत माँ भगवतीने आमच्या हाती सोपवले त्याचा सदुपयोग व्हावा म्हणून. त्यामुळे आम्ही तुमच्यावर कोणताही उपकार करीत नाही. त्यामुळे हे पैसे तुम्ही आम्हाला परत करायची गरज नाही पण तुम्ही नोकरीला लागला, स्थिरस्थावर झाला की तुमच्या सारख्या गरजू विद्यार्थ्यांना मदत करा, त्यांना शिकवा म्हणजे आम्ही उसने दिलेले पैसे परत आले. कर्नाटकमधील बारावीचा विद्यार्थी अभ्यासाच्या दबावाने अचानकच मानसिक हताशेचा, डिप्रेशनचा शिकार झाला. त्याच्या शिक्षणासाठी त्याच्याकडे लक्ष देता यावे म्हणून त्याच्या आईने बँकेची नोकरी सोडली. या परिस्थीतीने ती बाईपण हवालदिल झाली. त्या काळात योगायोगाने त्यांनी स्वामीजींचे स्तोत्रमंत्राचे विज्ञान हे पुस्तक वाचले. कर्नाटकात रहात होते तरी परिवार मूळ महाराष्ट्रीयन. ते पुस्तक वाचून त्यांनी स्वामीजींशी संपर्क केला. साधारणतः स्वामीजी व्यक्तीगत प्रश्नांची उत्तरे देणे टाळतात. पण एकंदर परिस्थिती आणि एका हुशार मुलाचे भविष्य लक्षात घेऊन स्वामीजींनी त्यांना मार्ग दाखवला, उपाय सांगितला. दोन-तीन महिन्यातच मुलगा मानसिक हताशेतून पूर्णपणे बाहेर आला, स्वस्थ झाला आणि मग तो आईला म्हणाला, स्वामीजींमुळे मी या परिस्थितीतून बाहेर आलो तर मी आता तीन महिने स्वामीजींच्या जवळ जाऊन त्यांची सेवा करीन. तसा त्या बाईंनी फोन केला. त्यावर स्वामीजी म्हणाले, सेवा करण्यासाठी इतक्या दूर येण्याची गरज नाही. तेथे कोणत्याही मंदिराची, कोणत्याही साधू संन्याशाची किंवा कोणत्याही निराधार वृध्दांची वा विकलांगाची सेवा केली तर ती आमची सेवा झाली असे आम्ही स्वीकारु .

स्वामीजी काही काळ सतलासणा जिल्हा मेहसाणा येथे होते. तेथे त्यांनी एक मोठे हॉस्पिटल उभारले. स्वामीजींना व्यक्तीगत आणि सामाजिक मानसशास्त्राचे चांगलेच ज्ञान आहे हे अनेक प्रसंगातून सर्वांच्या लक्षात येते. येथे हॉस्पिटलमध्ये त्यांनी एक अभिनव प्रयोग केला. समाजाचा नर्सेस बद्दलचा दृष्टीकोन

स्वामीजींना चांगलाच माहित आहे. तोंडाने तिला सिस्टर म्हणत असले तरी नजर मात्र कामविकाराने विषारी असते. स्वाभाविकच दवाखान्यात काम करणाऱ्या नर्सेसला कोणाकडून काही उपसर्ग होऊ नये म्हणून स्वामीजींनी दवाखान्यात रक्षाबंधनाच्या दिवशी मोठा कार्यक्रम आयोजित केला. सतलासणा आणि आसपासच्या गावातील काही समजदार व प्रतिष्ठीत लोकांना एकत्रीत केले आणि सर्व नर्सेसनी त्या सर्वांना राखी बांधली. त्यावेळी स्वामीजी उपस्थित सर्वांना म्हणाले या सर्व मुलींच्या रक्षणाची जबाबदारी आता तुमची. या कार्यक्रमाला अहमदाबादच्या बी. जे. मेडीकल कॉलेजच्या गायनॅक विभागाच्या प्रमुख डॉक्टर बाई उपस्थित होत्या. त्यांनाही हा अभिनव कार्यक्रम खूप आवडला. त्याच कालावधीत स्वामीजींनी त्या डॉक्टर बाईच्या सहयोगाने आसपासच्या सुमारे २५ खेड्यात स्त्रीयांना व तरुण मुलींना त्यांच्या गायनॅक प्राब्लेमच्या मार्गदर्शनासाठी शिबीरांचे आयोजन केले. कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून सर्व लेडीज डॉक्टरच होते. उपस्थिती पण स्त्रीयांची व तरुण मुलींचीच. त्यामुळे अगदी मन मोकळ्या वातावरणात प्रश्नोत्तरे, शंका समाधान व यथायोग्य मार्गदर्शन झाले. एवढे सर्व करुनही एकदा एका खेडेगावातील सरपंचाने दवाखान्यातील एका नर्सला छेडण्याचा वाह्यात प्रयत्न केला. ते कळताच स्वामीजींनी कठोरपणे त्या सरपंचाला असा धडा शिकवला आणि त्याची माहिती सतलासण्यासह आसपासच्या खेडे गावात अशा पद्धतीने पोहचवली की त्या नंतर कोणीही कधीही कोणत्या नर्सच्या वाट्याला गेला नाही.